॥श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ॥

# श्रीगुलाबरावमहाराजांचा परिचय १

**''स्त्रीजन्म म्हणऊनी न व्हावें उदास ।**
**साधुसंतां ऐसें केलें जनी'' ॥ जनाबाई.**

आपल्या देशांतील स्त्रियांची स्थिती आजकालच्या काळात अत्यंत शोचनीय होऊं पाहात आहे व त्यांच्या उद्धाराकरितां अनेक प्रयत्नही चालू आहेत. परंतु त्या प्रयत्नाला श्रुतिसंतांचा पाठिंबा जोपर्यंत मिळत नाहीं तोंपर्यंत त्याला यश येणें कधीही शक्य नाहीं. ''स्त्रियांनां विशेषेंकरून मोठा आधार स्त्रियाच होत अशी अनादि परंपरा पृथ्वीवर चालत आलेली आहे'' असें वचन महाभारतांत आहे –

**''स्त्रियश्चैव विशेषेण स्त्रीजनस्य गतिः परा ।**
**गौर्यां गच्छति सुश्रोणि लोकेष्वेषा गतिः सदा''**
*(अनुशासनपर्व अ. १४६/१०)*

याकरितां ज्या स्त्रियांनां वेदांतसिद्धांत कळला आहे, धर्माच्या यथार्थ स्वरूपाविषयीं ज्यांची मती व्यामोहित होत नाहीं, जगताला सदैव वाहून नेणारा प्रचंड जोरदार व अंकुंठित असा जो स्वभावरूपी प्रवाह त्यांतून तरून जाण्याकरितां ज्ञानरूपी नौकेचें ज्यांनीं धैर्यानें अवलंबन केलें आहे व स्वतःकरितां ज्यांनां कांहींच कर्तव्य उरलें नसून केवळ आपल्या भगिनींची दैना पाहून अंतःकरणाला पीळ पडल्यामुळें ज्या वेदैकनिष्ठ होऊन कर्तव्यांत गढून गेल्यासारख्या दिसतात अशा परम पुण्यपावन स्त्रियांच्या सान्निध्यानेंच स्त्रीवर्गाची घडी नीट बसण्याचा संभव आहे.

सांप्रत स्त्रीसमाजांत शिरूं पाहणारें पतीची बेपरवा, स्वतंत्र वागण्याची आवड, दुराचरणाचें पीक, ईश्वरीप्रेमाची गडीफू, दयाशून्यता, प्रापंचिक कामाची हेळसांड इत्याद्यनेक दोष देशधडी होऊन पतिप्रेम, सदाचरण, ईश्वरभक्ती दीन अनाथांची दया, संसारांत दाक्षिण्य इत्याद्यनेक दैवी गुणांचा उत्कर्ष होण्याला व कुलीनपणाच्या सन्मान्य पदावर प्रत्येक स्त्रीला आरूढ होण्याला अत्यंत शुद्ध अशा अंतःकरणांतून निघालेल्या विचारांचा संस्कार त्यांच्या मनावर झाला पाहिजे. **''यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः''** असें यद्यपि स्मृतिवचन आहे तथापि **''न स्त्री स्वातंत्र्यमर्हति''** असेंही स्मृतीचेंच वचन आहे व (य४-१)



''पुरुषांनीं आपणाला मान द्यावा अशी महत्वाकांक्षा जिला आहे ती कुलीन स्त्रीच नव्हे'' असें देवी कौसल्येने वाल्मिकी रामायणांत म्हटलें आहे[१] म्हणून अशी महत्कांक्षा सोडून देऊन वरील वचनांच्या समन्वयपूर्वक केवळ आपल्या वांटणीस आलेल्या कर्तव्यकुसुमानीं परमात्म्याचें पूजन करणारी माधानच्या[२] माहाराची बायको जरी असली तरी ती उच्चवर्णाच्या कर्तव्यविन्मुख स्त्रीपेक्षां श्रेष्ठ होय व नैष्कर्म्यसिद्धि तिलाच अचुक मिळेल.

ज्याच्या वांट्याला जें कर्तव्य आलें असेल तेंच ईश्वराचें मनोगत होय व तें केले असतां तो निर्भ्रांत सांपडतो असे तातांनींही म्हटलें आहे. परंतु धर्म कोणता व अधर्म कोणता, ह्याचा निश्चय विद्वानांसही कळणें कठीण असल्यामुळें ज्याचे समस्त दोष क्षीण झाले आहेत, अशा आप्तांचें वचन प्रमाण मानून श्रुतिपरायण होणें हाच कल्याणाचा आत्यंतिक श्रेयस्कर मार्ग होय व तो आज आपल्याला श्रीयुत गुलाबराव महाराज यांच्या सान्निध्यानें सुलभ झाला ही आनंदाची गोष्ट होय.

हे महाराज मधुराद्वैत दर्शनाचें आचार्य, स्वतःला ज्ञानेश्वरकन्या व श्रीकृष्णपत्नी म्हणविणारे, भगवान् नारदाचार्यांनांही भक्तीमध्यें प्रमाणभूत अशा व्रजगोपिकांच्या संप्रदायातले, प्रत्यही स्त्रीवेश धारण करून कुलवनितांना आचरणीय अशीं व्रतें करणारे व समस्त श्रुतिशास्त्रपुराणादिकांचें रहस्य जाणून त्यांचा समन्वय करण्यांत प्रसिद्ध अशा अधिकाराचे असल्यामुळे उपरि निर्दिष्ट केल्याप्रमाणें स्त्रीसमाजाला फारच आधारभूत आहेत व त्यांच्या उन्नत्यर्थ यांचा यत्न चालू असून यांचें पतिव्रताचरितादि ग्रंथ लवकरच बाहेर पडावयाचे आहेत.

ह्यांनीं एके ठिकाणीं शिक्षणाचे स्वरूप असें दाखविलें आहे :- **शिक्षण म्हणजे सुसंस्कार भांडाराचें दान करणें होय.** संस्कार वस्तुज्ञानजन्य असतो. अपरिछिन्नानंद प्राप्ति हें शिक्षणाचें फळ होय. यथार्थ वस्तूचें ज्ञान हेंच अपरिच्छिन्नानंद प्राप्तीला हेतुक असतें, म्हणून तदीय संस्कार तें शिक्षण म्हणावें. *(सूक्तिरत्नावली द्वि. यष्टी उत्तरार्ध. पृष्ठ १६)* ह्या सुसंस्कार-पालनाविषयीं

*(टीप :-१ ''नैषा हि सा स्त्री भवति श्लाघनीयेन धीमता । उभयोर्लोकयोर्लोके पत्या या संप्रसाद्यते'' ॥*
*२ - माधान हें वऱ्हाडांत एक खेडे असून श्रीगुलाबराव महाराजांचे मूळ राहण्याचें ठिकाण आहे. तेथील एका माहाराच्या स्त्रीविषयीं हा उल्लेख आहे. तिच्या अत्यंत कडक पतिनिष्ठेमुळें महाराज तिला 'काकी' म्हणत व तिची योग्यता फार मोठी मानीत.)*

महाराजांची कळकळ, त्यांचें औदार्य व आर्त भूतांचा अधिकार ओळखून तदनुरूप उपायांची यथायोग्य योजना ह्यांत त्यांचें विलक्षण सामर्थ्य दिसून येतें.

आज प्रसिद्ध होत असलेल्या स्तीगीतावरूनही हीच गोष्ट सिद्ध होईल. घरगुती कामें करितांनां किंवा फावल्या वेळीं झोपाळ्यावर बसून अथवा अनेक मंगल प्रसंगीं गाणीं म्हणण्याकडे स्त्रियांची स्वाभाविक प्रवृत्ति, त्यांच्या नेहमींच्या संवयीतल्या चाली, आवडती गाणीं वारंवार म्हणावीशी वाटत असल्यामुळें त्यांच्या आवर्तनानें मनावर होणारा साहजिक परिणाम, आदिकरून गोष्टींचा विचार केला असतां ही स्त्रीगीताची योजना किती सुंदर आहे हें कळून येईल. हीं गाणीं बहुतेक सोपीं, सरळ, व प्रेमभरीत असून स्त्रीपुरुषांनां आपापल्या वृत्तींचा परिचय करून देणारीं असल्यामुळें त्यांचा अर्थ चटकन लक्षांत येऊन तीं मनुष्याला विचार करावयास लावतात, व दुसरें त्यांत श्रुतिस्मृतींच्या अभिप्रायानुसार निरनिराळ्या परिस्थित्यनुरूप प्रक्रिया व सख्य-वात्सल्यादि भक्तीचे प्रकार गोवलेले असल्यामुळें,

**बाई माझ्या ग दारावरुनी ।**
**रंगीत गाड्या गेल्या । भावानं बहिणी नेल्या''**

अशा निरर्थक व ग्राम्य गाण्याचा संस्कार नष्ट करून त्यांच्या जागीं -

**काळ्या वर्णाची ओवी । काळोख चित्तीं आणी ।**
**म्हणोनि स्मरावा तो ग बाई । नंदनंदन चक्रपाणी ॥**
**ओवी ती गावी तया । नित्य क्रीडे जो वृंदावनीं ।**
**सांडुनी सर्व कांहीं ग बाई । ध्यावे पायचि सदा मनीं ॥**
**आपुल्या विद्याबळें । वडिला बोलो नये ग ।**
**तयांच्या आशिर्वादें । साधूंची भेट होय ग ॥**
**सौभाग्यवती बाळा । हृदयीं निज पती ग । (य४-३)**
**धरोनि सहजगति । त्या कैवल्या मेळविती ग ॥**
**धना या दगडाचा । लोभ तो धरूं नये ग ।**
**भुकेल्या अतिथीचे । पुजावें प्रेमें पाय ग ॥**





इत्यादि नियमादृष्ट[३] उत्पन्न करणारे सुसंस्कार दृढ करण्यांत त्याचें केवढें सहाय्य होते हें निराळें सांगावयाला नको.*(टीप :-[३] निश्चयाने चित्तशुद्धि करणारे.)*

ह्या गाण्याचे **'स्त्रीगीत** व **'स्त्रीगीतसंग्रह'** असे दोन भाग आहेत.

स्त्रीगीताची पांच प्रकरणें असून त्यांचा विषयक्रम वाचकांच्या सोयीसाठीं निराळा दिला आहे. हीं पांच प्रकरणें पूर्वी द्वितीय यष्टीच्या उत्तरार्धांत विषयदिग्दर्शनासह येऊन गेलीं आहेत. तींच येथें पुन्हा आरंभीं ओवीबद्ध मंगल व गाण्याच्या निरनिराळ्या चाली देऊन छापलीं आहेत.

स्त्रीगीतसंग्रहांतील दुसऱ्या भागांत स्फुट गाणीं आली आहेत व त्यांतील कांही गाणीं यद्यपि सकृद्दर्शनीं कठीणशीं वाटतात तथापि ती ज्या प्रसंगीं म्हटलीं गेलीं. तत्कालीन श्रोत्यांच्या अंतःकरणावर महाराजांच्या मोहक वाणीचा झालेला संस्कार, तेथील स्थलमाहात्म्य, महाराजांच्या सत्संगतीचा प्रभाव, स्वतः महाराजांची भक्तिरसपरिप्लुत चित्तवृत्ति व सख्य-वात्सल्य-माधुर्यादि निरनिराळ्या भावनांप्रमाणें त्यांच्या हृन्मंदिरांत होणारा रामकृष्णादि भगवन्मूर्तींचा आविर्भाव व तशाच अनुसंधानानें निघणारे त्यांचे उद्गार, गाण्याच्या भिन्न भिन्न मनोवेधक चाली व त्यातील सामवेदीय स्वरांची छटा; इत्यादि गोष्टींचा स्थिरचित्तानें विचार केला असतां त्यांतील काठिण्यावभास मावळून मन प्रेमरसांत तल्लीन झाल्यावांचून राहणार नाहीं.

## अधिष्ठात्री देवता

येथे एक फार महत्वाची गोष्ट सांगावयाची राहिली ती हीच कीं तातादि संतांनी श्रीमद्भगवद्गीतेची अधिष्ठात्री देवता जशी 'पार्थ' मानिली आहे तशीच ह्या गीताची अधिष्ठात्री देवता **सौ. मणिकरणिका आई** (महाराजांची पत्नी) मानल्यास बाध येणार नाही. ह्या मायबाई प्रस्तुत गीताच्या जनयित्री होत हें मागें द्वि. यष्टी पूर्वार्धांत सांगितलेंच आहे. ह्या बाई महाराजांच्या जशा अत्यंत पतिनिष्ठ पत्नी होत्या. तशाच त्या सच्छिष्याही होत्या. ह्यामुळें **''आधीच सोन्याचें वरि जडावाचें''** ह्या कव्युक्तिप्रमाणें त्यांचा अधिकारही तसाच मोठा होता. ह्यांचें कंठमाधूर्य महाराजांच्या तोडीचेच असल्यामुळें त्या व महाराज मिळून गाणीं म्हणूं लागत तेव्हां त्या प्रसंगाला अपूर्व बहार येत असे व

श्रोतृसमूहाच्या मुखांतून 'वा फारच मंजूळ' असे उद्गार निघत. ही महाराजांची सपत्नीक गाणीं ह.भ.पांगारकर. भागवतमास्तर, मुळेमास्तर आदिकरून मंडळींनी अनेक प्रसंगीं ऐकलेलीं आहेत व त्यांच्याही मनाची स्थिती वर वर्णन केल्याप्रमाणें झालेली आहे. दुःखाची गोष्ट हीच कीं ह्या बाई श्रावण वद्य ४ थीं (इ. स. १९०६) रोजीं निजधामास गेल्यापासून हा मनोरंजक व बोधपर प्रकार बंद पडला. एखादे वेळीं लहर लागल्यास, महाराज आतांही गाणीं म्हणतात परंतु फार कमी. मायबाईच्या साहचर्यात महाराजांच्या मुखांतून साहजिक स्फूर्तीनें निघालेला गीतसंग्रह जशाचा तसाच छापून आज प्रसिद्ध केला आहे.

'स्फुट संग्रहांत' आरंभी संप्रदायानुरूप गुरुपरंपरेला वंदन असून नंतर सद्गुरूचे महत्व, स्वतःची दुर्बल स्थिति व श्रीकृष्णसेवेची आवडी, भगवत्प्रेमांत चारी साधनांची प्राप्ति, ईश्वराहून सद्गुरूची थोरवी, गोपीप्रेम वर्णन, रामकृष्णाची बाळलीला, वात्सल्य व माधूर्यसूचक रामकृष्णावरची गाणीं, दळणाची गाणी, दशावतारांस नमन, संतवचन प्रभाव, आदिकरून अनेक विषयांवर अनेक प्रसंगीं म्हटलेलीं भक्ति-ज्ञान-वैराग्यप्रचूर अशीं गाणीं आहेत.

ह्यांत दळणाचीं जीं गाणीं आहेत (पृष्ठ ६९) तीं स्वतः दळण दळीत असतां महाराजांनीं म्हटलेलीं आहेत व गाण्यांत आनंद वाटला म्हणजे ते अशा प्रकारें कधीं कधीं दळीतही असत. इतर गाणीं बहुतेक भोजन प्रसंगी सौ. मायबाई व महाराज ह्यांनी मिळून म्हटलेलीं आहेत. भोजनाचें वेळी कधीं कधीं भाजीत तिखट फार झाले असतां किंवा पोळी जाड झाली असतां त्या प्रसंगाला अनुलक्षून म्हटलेलीं गाणीं ही मजेदार आहेत व श्रीकृष्ण हे आपल्या बरोबर प्रत्यक्ष जेवीत असतात असा त्यांचा निश्चय त्यावरून व्यक्त होतो.

ह्याशिवाय रामकृष्णांची बाळलीला, दशावताराचें वर्णन, ईश्वरसृष्टि व सद्गुरुसृष्टि यांमधील तुलना, सत्संगाचें महत्व इत्यादि वर्णनपर गाणीं वाचली असतां,

**'होऊनी जीवन्मुक्त सदा क्रीडति साधू जन ग ।**
**तयाच्या खेळा साटीं लळा पाळितो नारायण ग ॥**

हा त्यांचा स्वतःचा अनुभव व -

**''सांगते घडी घडी, जपावा कृष्णनाथ ग ।**
**होउनि बहिणी माझ्या, रास खेळु, धरूनि हात ग ॥**

३



ह्यांतील उपदेशाप्रमाणें वागणारास बरोबरीची योग्यता देण्याविषयीं अभिवचन आदिकरून गोष्टी दिसून येतात.

एवढेंच नव्हे तर त्यांच्या सांगण्याप्रमाणें चालून रास खेळण्याचा अधिकार प्राप्त झालेले पुरुष व स्त्रियां त्यांच्या मंडळींत होऊन गेल्या, आज आहेत व पुढेंही होतील.

सारांश, हीं गाणीं मननपूर्वक साग्र वाचून पाहिल्याशिवाय त्यांचें खरे स्वारस्य कळणें शक्य नाहीं.

# आठ चाली

गाणीं म्हणण्यांच्या एकंदर आठ चाली आहेत, त्या ह्या :-

१ लीं **'ग बाईची'.**

२ री तीन चरणाची किंवा **'साजणि बाई'**ची.

ह्यात **'गंगाजमना' 'चंद्रभागेच्या पलीकडे'** अथवा **'चाल सखु चाल ग'** ह्यापैकीं कोणतेही पालोपद शेवटीं येऊं शकते.

३ री **साडेतीन चरणाची.**

४ थी **चार चरणाची.**

५ वी **'मोहनगिरीधारी'** ची

६ वी **'सखुगडणीची'**– हीची एक विशेष खुबी ही आहे कीं ती म्हणत असतां **सामवेदीय** स्वराचा भास होतो.

७ वी **'ग राधे'** ची' व

८ वी सर्वसाधारण

ह्या चाली म्हणण्याचा प्रकार येणें प्रमाणें:-

## १. पहिली चाल

**१. पहिली चाल** 'ग बाईची':-

हींत पहिलें, दुसरें व चवथे चरण दोन दोनदां पण अंमळ जलद म्हणून,

तिसरें चरण मात्र लांब सूर काढून सावकाश म्हणावें व 'ग बाई' हीं अक्षरें शेवटीं पालोपद म्हणावी.

वाटल्यास सुरावटी करितां पहिल्या चरणाच्या प्रारंभी 'बाई' हा शब्द घालावा.

**बाई, त्रिलोका आधार त्रिलोका आधार ।**
**ज्ञानेश प्रभू माझा, ज्ञानेश प्रभू माझा ।**
**देवो मजला स्फूर्ती ग बाई ।**
**कृपाळू गुरू माझा कृपाळू गुरू माझा ॥**

## २. दुसरी चाल

**२. दुसरी चाल** तीन चरणाची किंवा 'साजणि बाईची.

ह्यांत 'गंगाजमना' 'चंद्रभागेच्या पलीकडे' अथवा 'चाल सखू चाल ग । कृष्णाच्या बागामध्यें खेळू गुलाल ग' ह्या पैकीं कोणतेह पालोपद शेवटीं स्वस्थ म्हणून,

बाकीचे पालोपद येणारे चरण जरा जलद म्हणावे.

(१)

**सद्गुरु वाचोनिया । ईश्वरप्राप्ति नाहीं ।**
**धुंडीतां शास्त्रें साही । साजणि बाई ।**
**कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ।**

(२)

**तुमचे स्वरूपाची । ओळख नाहीं देवा ।**
**कोण्या प्रकारें प्रकारें करू सेवा । गंगाजमना ।**
**गंगेच हिरव पाणी । मोती दाणा ।**
**मोती बांधले पांच पदरी । राजा नांदतो सात नगरी ॥**
**साता माय किल्यावरी । राजा बोले ॥**

(३)

**अखंड गाती जया । शास्त्रें वेदपुराणें ।**

४



**सद्‌गुरु बाई तो मी । पाहीला डोळियानें ।**
**हरीनें मुरली वाजविली कुणीकडे । रमल ग माझं मन ।**
**चंद्रभागेच्या** (सूर्यकन्येच्या) **पलीकडे ॥**

(४)

**सद्गुरु वांचोनिया । ईश्वरप्राप्ति नाहीं ।**
**धुंडीतां शास्त्रें साही । चाल सखु चाल ग ।**
**कृष्णाच्या बागामध्ये । खेळू गुलाल ।**

## ३. तिसरी चाल

**३. तिसरी चाल** साडेतीन चरणाची. ह्या चालीत पहिल्या चरणाच्या शेवटला मोठा एक शब्द किंवा लहान दोन शब्द स्वस्थपणें दोनदां म्हणून सर्व चरण एकदांच म्हणावें.

पहिल्या तीन चरणांत मध्यें 'ग' घालून, चवथें चरण लांव व स्वस्थ म्हणावें.

**सद्गुरु ग वाक्यावरी वाक्यावरी । विश्वास ग ज्याचा आहे ।**
**तयाला ग उणे काय । त्रिभुवनीं ॥**
**विषया ग वरी जातां वरी जातां । मनासी ग आवरावें ।**
**इंद्रिय ग सांवरावे । कानादिक ॥**

## ४. चवथी चाल

**४. चवथी चाल** चार चरणाची. ही चाल बहुतेक बायांत रूढ असल्यामुळें विशेष लिहिण्याची आवश्यकता नाहीं. ह्यांतील सर्व चरण स्वस्थपणें व लांब सुरावटीनें म्हणावें, व पहिल्या व तृतीय चरणांतील शेवटले शब्द दोनदां म्हणावे.

**संसार दुःखमूळ दुःखमूळ । तो म्यां त्यागीला सकळ ।**
**श्रीगुरू तुम्हां आतां तुम्हां आतां । माझी असो कळकळ ॥**
**रुक्मिणी ऐशा नारी ऐशा नारी । तुज प्रिय नारायणा ।**

**दासी मी नेत्रांधळी । ठेवि झाडाया आंगणा ॥**

## ५. पांचवी चाल

**५. पांचवी चाल** ही 'मोहन गिरीधारीची' चाल होय. ह्या चालींत पहिल्या चरणांतील प्रारंभींचा शब्द जरा जलद म्हणून दुसरा शब्द जरा लांब ओढावा, व हें चरण दोनदां म्हणून दुसरें चरण पहिल्या चरणाप्रमाणेंच पण एकदां म्हणावें. तीसरें चरण पहिल्या चरणाप्रमाणेंच दोनदां म्हणून चवथें चरण दुसऱ्या चरणाप्रमाणें एकदांच म्हणावें.

वाटल्यास जमण्याकरितां, कधीं पहिल्या, तर कधीं दुसऱ्या, तर कधीं तिसऱ्या चरणाच्या प्रारंभीं 'बाई' हा शब्द घालावा. पालोपदांतील **'मोहन गिरीधारी'** हे शब्द एकदां किंवा वाटल्यास दोनदां जरा स्वस्थ म्हणून बाकी त्यापुढील चरण एकदांच पण अंमळ जलद म्हणावें. ह्या चालींत दुसऱ्या व चवथ्या चरणाच्या शेवटीं **'ग'** असतोच. **'मोहन गिरीधारी'** हे शब्द येथें पालोपद असतात म्हणून ह्या चालीला **'मोहन गिरीधारीची चाल'** हें नांव दिलें आहे.

**बाई, गोकुळीं नारायण । गोपीकांसंगें खेळे ग ।**
**रूप तें निरखीतां । निवती सर्व डोळे ग ।**
**मोहन गिरीधारी । धारि कृष्णाला राधा प्यारी ग ।**
**कोण्या राजान नवल केल । फुलबागाला पाणी दिल्ह ग ॥**

## ६. सहावी चाल

**६. सहावी चाल** 'सखुगडणीची' होय.

ह्या चालींचें प्रत्येक चरण फार संथपणानें म्हणावें लागतें.

प्रथम चरण एकदां किंवा दोनदा संथपणे म्हणून

द्वितीय चरण एकदांच पण प्रथम चरणापेक्षांही संथपणानें म्हणून,

द्वितीय चरणाचें शेवटी पालोपद येणारे **'सखुगडणी'** हे शब्द लांब ओढावें व पुनः प्रथम चरण एकदां म्हणावे.

चवथें चरण जेव्हां तिसऱ्याचीच नक्कल असते म्हणजे तीसरें व चवथें चरण हे जेव्हा सारखेच असतात तेव्हां तीसरें व चवथें चरण लांब व एकदांच





म्हणावें.

परंतु जेव्हां तीसरे व चवथे चरण हे भिन्न असतात तेव्हा ते पहिल्या दुसऱ्या चरणाप्रप्रमाणेंच म्हणावें. ह्या चालींत दुसऱ्या चरणांत 'ग सखुगडणी' हें पालोपद असतेंच म्हणून ह्या चालीला **'सखुगडणीची चाल'** हें नांव दिलें आहे.

- ही चाल महाराजांनी सामगायनाच्या तऱ्हेवर बसविली असल्यामुळें ती म्हणत असतां एखादा वैदिक ब्राह्मण सामवेद म्हणत आहे असा भास होतो.

**वृत्तीचा वृत्तीचा नाहीं ठाव । प्रवृत्ति अविरोधी ग सखुगडणी ।**
**निवृत्ति निवृत्ति तो मी वंदी । निवृत्ती तो मी वंदी ॥**
**जयाच्या जयाच्या सामर्थ्यानें । रेडा तो बोले वेद ग सखुगडणी ।**
**ज्ञानेश ज्ञानेश बाप माझा । प्रणवातीत भेद ग सखुगडणी ॥**

## ७. सातवी चाल

७. सातवी चाल **'ग राधेची' होय** :- ही म्हणण्याची धाटणी साधीं असून ती बहुतेक बायकांनां म्हणतां येत असल्यामुळे व ह्या चालीची गाणींही येथें फार थोडी असल्यामुळें विशेष लिहिण्याची आवश्यकता नाहीं. ह्यांतील 'ग राधे' हें पालोपद आपल्या सोयीप्रमाणें कोणत्याही चरणाच्या शेवटीं म्हणता येते. पृ. ७५ गाणीं ३३ ते ३५ पहा.

## ८. आठवी चाल

८. आठवी चाल **साध्या ओवीची** होय. ही चाल सोपी असून ती सर्व बायांनां माहीत आहे म्हणून विशेष माहीती देण्याची आवश्यकता नाही.

**पहीली माझी ओवी । ओवीचा काय नेम ।**
**तुळसी खालीं राम । पोथी वाचे ॥**

०००

## *सामान्य सूचना*

ह्या गाण्यांची एक विशेष खुबी ही आहे कीं पुष्कळशीं गाणीं वर दिलेल्या चालीपैकीं बहुतेक चालीवर / निदान तीन किंवा चार चालीवर तरी म्हणतां येतात. विशेषें करून **'ग बाई'** चालीचीं गाणीं अशा रीतीनें म्हणतां येतात. खालीं दिलेल्या उदाहरणावरून हें स्पष्ट होईल.

**गोकुळीं नारायण । गोपीकां संगें खेळे ।**
**रूप तें निरखीतां । निवती सर्व डोळे ॥**

*१. चाल पहीली (ग बाईची)*

**बाई गोकुळीं नारायण गोकुळीं नारायण ।**
**गोपीकां संगे खेळे, गोपीकां संगे खेळे ।**
**रूप तें निरखीतां ग बाई ।**
**निवती सर्व डोळे, निवती सर्व डोळे ॥**

*२. चाल दुसरी (साजणि बाईची )*

**गोकुळीं नारायण । गोपीकां सगें खेळे ।**
**रूप तें निरखीतां । निवती सर्व डोळे ।**
**साजणिबाई । कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ॥**

*४. चाल चवथी*

**गोकुळीं नारायण नारायण । गोपीकां संगें खेळे ।**
**रूप तें निरखीतां निरखीतां । निवती सर्व डोळे ॥**

*५. चाल पांचवी - मोहन गिरधारीची*

**बाई गोकुळीं नारायण । गोपीकां संगे खेळे ग ।**
**रूप तें निरखीतां । निवती सर्व डोळे ग ।**
**मोहन गिरधारी । धारि कृष्णाला राधा प्यारी ग ।**
**कोण्या राजानें नवल केल । फुलबागाला पाणी दिल्ह ग ॥**

*६. चाल सहावी - सखुगडणीची*

**गोकुळीं गोकुळी नारायण । गोपीकां संगे खेळे ग सखुगडणी ।**

६



**रूप तें रूप ते निरखीतां । निवती सर्व डोळे ग सखुगडणी ॥**

असो. याप्रमाणें ही पद्यकुसुममाला श्रीज्ञानेश्वरकन्या व अस्मज्जननी हिनें स्वहस्तानें गुंफून श्रीकृष्णचरणीं अर्पण केली आहे. ती त्या वृंदावनविहारी रसिकाग्रणी गोपालकृष्णाचा उच्छिष्ट प्रसाद म्हणून कंठांत आवडीनें धारण करावी. तिच्या दिव्य आमोदप्रभावानें स्वतःचा हृत्ताप घालवून सुखी व्हावे व

**''सांगते घडी घडी जपावा कृष्णनाथ ग ।**
**होऊनि बहिणी माझ्या रास खेळू धरूनि हात ग'' ॥**

ह्या मुख्य वचनसुमनाकडे दृष्टि देऊन आपल्या सदाचरणानें स्वकीय कुटुंबाचें, आपल्या समाजाचें, शेवटीं संपूर्ण जगताचें सौख्य वृद्धिंगत करून **''पुनाति भुवनत्रयम''** अशा अधिकारास पात्र होण्याची महत्वाकांक्षा बाळगावीं, हें प्रत्येक कुलवधूचें कर्तव्य होय. तें करण्याकडे समस्त अस्मद्भगिनींची प्रवृत्ति वाढो अशी श्रीज्ञानेशचरणीं प्रार्थना करून त्याच चरणारविंदी हें 'परिचयपुष्प' समर्पण करितो.

***- श्रीनिवास रामचंद्र हरिदास, नागपूर***

॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

*(श्रीगुलाबरावमहाराजकृत सूक्तिरत्नावली-चतुर्थ यष्टि - स्त्रीगीतसंग्रह हें पुस्तक प्रकाशक श्रीनिवास रामचंद्र हरिदास यांनीं नागपूर येथें 'श्रीज्ञानेश्वर' छापखान्यात छापले. आवृत्ति १ ली. आश्विन शके १८३२. इ.स.१९१०)*

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# स्त्रीगीत - विषयदिग्दर्शन



**प्रकरण १ लें व प्रकरण २ रें**

मंगलाचरण व सद्गुरुमहिमानिरूपण. सद्गुरुसेवा निरूपण

**प्रकरण ३ रे**

संसारांत दारापुत्रादिकांची धनाविषयीं ओढ, जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत टाकणाऱ्या वासनाडाकिणीचें भयंकर स्वरूप, त्रिविध तापांची जांचणी, देहाची तुच्छता, इत्यादि कचाट्यांतून सुटून जीवन्मुक्तिसुख व अंतरीं अवीट प्रेमझरा मिळण्याविषयीं भक्तिवैराग्यपूर्वक विनंतिरूप गुरुवर्णन.

**प्रकरण ४ थें**

अधिकारानुसार बाह्यांतरंगसाधनपूर्वक गुरूपदेश :-

चहूंवर्णांच्या स्त्रियांनी जीवन्मुक्तिसुख मिळण्याकरितां नास्तिक पाखंडममतांचा त्याग करून वेदाज्ञेने चालावें. प्रथम वैराग्य होण्याकरितां अहेव स्त्रियांनी पतिव्रताधर्म पाळून पतीची सेवा करावी, भाग्य आलें असतां उन्मत्त होऊ नयें, सपत्नीजनांवर प्रीति करावी, वरिष्ठांची सेवा करावी मैत्रिणीस साह्य करावें, दासदासीजनांवर कृपा ठेवावी, दरिद्र आलें तरी पतिसेवेंत अंतर पाडूं नये, देव, गुरु, अतिथी यांना संतोष द्यावा, पतीलाच दैवत मानून सर्वभावानें त्याच्या सेवेंत देह झिजवावा, जारिणी स्त्रियांचें तोंड देखील पाहूं नये, पतीशीं वांकडे व देवाची दांभिक पूजा करून नर्काचें साधन करूं नये, विधवा स्त्रियांनी ईश्वराला पति मानून सर्वदा भगवच्चिंतन करावें.

अशा प्रकारच्या बहिरंग साधनांनी चित्ताचा मलदोष जाऊन वैराग्य प्राप्त झाल्यावर सर्व संग सोडून पतिसेवादिक बाह्य कर्माचा त्याग करावा; व विवेक वैराग्यादि अंतरंग साधनांनी युक्त होऊन पति, पिता, पुत्रादिक गोत आड आलें असतां त्यांची भीड न धरतां सद्‌गुरूस शरण जावे. सद्गुरुनीं सांगितलेली ईश्वरोपासना करावी, सर्वकाल भगवन्नामस्मरण करावें, सद्गुरुसेवेंत देह झिजवावा, सद्गुरुमुखानें शास्त्रश्रवण करावें, व त्यांनी दिलेल्या मंत्राचा जप करून सर्व बंधनें तोडावीं. अशा साधनक्रमानें चित्ताचें ठायीं प्रेमभाव येऊन जीवन्मुक्तिसुखाचा अनुभव मिळू लागतों.

**प्रकरण ५ वें**

कैवल्यदानाविषयीं सर्वदा उदार, आत्मसुख दाखविण्याकरितां स्वयं दर्पणरूप, चारी मुक्ती ज्यांच्या पायांतळीं लोळतात, गुरुत्वाचा अभिमान नसून गुरुत्वच ज्यांच्या पायीं लोळतें, ज्यांची भेट होतांच साधनें सहज हस्तगत होतात, इत्यादि यथार्थ परीक्षापूर्वक सद्गुरुलक्षण कथन. वेदवेत्ता व ब्रह्मनिष्ठ तोच ब्राह्मण इतर सारे शूद्र. उपसंहार. — **प्रकाशक**

*(द्वितीय यष्टी-पूर्वार्धातही या पांच प्रकरणांचा समावेश आहे. पृ१४३-१५५)*

||श्रीज्ञानेश्वर माउली||

# स्त्रीगीत

## मंगलाचरण

**ॐनमोजी ज्ञानेश्वरा । सच्चिदानंदा करुणाकरा ॥**

**भक्तवत्सला दीनोद्धारा । जगद्व्यापका जगद्गुरु ||१||**

**ॐनमः श्रीगणेश । हाती घेउनी ज्ञानफरश ।**

**करूनि विघ्नाचा नाश । पुरवी आस अंतरीची ||२||**

**ॐनमो श्रीसरस्वती । जे आदिमाया लावण्यज्योती ।**

**माये तव कृपें मती । पुढें ग्रंथी उल्हासो ||३||**

**ॐनमोजी श्रीसद्गुरु । जो शिष्यचकोरा अमृतकरू ।**

**जो सच्चिदानंद ज्ञानेश्वरू । दीनउदारू परमात्मा ||४||**

**ॐनमो महाराज सकल संत । जे कां सर्वदा कृपावंत ।**

**स्वानंदवचनें निववीत । संतप्त जनां ||५||**

**ॐनमो श्रीकृष्णपिता । नमो राधिका रुक्मिणी माता ।**

**पाजावया प्रेमामृता । त्वरित यावे ||६||**

- - -





प्रकरण १ ले

## ॥ सद्गुरु महिमा ॥

*(चाल १ ली - ग बाईची)*

**ॐनमो ज्ञानेश्वरा । सद्गुरु विश्वंभरा ।**
**दीन बालकावरी ग बाई । त्वरीत कृपा करा ||१||**
**त्रिलोका आधार । ज्ञानेश प्रभू माझा ।**
**देवो मजला स्फूर्ति ग बाई । कृपाळू गुरु राजा ||२||**

*(चाल दुसरी ३ चरणांची - साजणी बााईची)*

**सद्गुरु वााचोनिया । ईश्वर प्राप्ती नाही । धुंडितां शास्त्र साही ।**

*|| चाल ||*

**साजणि बाई । कृष्णाला विडा देते ।**
**गोवळ्याची राई ||३||**

*(चाल तीसरी साडेतीन चरणांची)*

**सोयरे ग गणगोत । माउली ग गुरुराव ।**
**वाहिला ग जीवभाव । पदीं त्यांच्या ||४||**
**गुरूचे गुणदोष । पाहूंचि ग नये कधीं ।**
**विश्वासें ग आत्मसिद्धी । प्राप्त होय ||५||**
**सद्गुरुचरणाच्या । अष्टमहासिद्धि दासी ।**
**प्रेमें शरण येती त्यासी । इंद्रादीक ||६||**
**न लगती ग जपतप । न लगती ग व्रतें नेम ।**
**सद्गुरूचे पायीं प्रेम । राहो सदा ||७||**

*(चाल १ ली)*

**वेदाचे गहिंवर । साही शास्त्रांचे सार ।**
**श्रीगुरु बाप माझा ग बाई । सगुण साक्षात्कार ||८||**

पैशाचे गणगोत । पैशाचे मायबाप ।
सद्गुरु कृपामूर्ती ग बाई । वारील तीन्ही ताप ॥९॥

*चाल ३ री*

सद्गुरु ग वाक्यावरी । विश्वास ग ज्याचा आहे ।
तयाला ग उणें काय । त्रिभुवनीं ॥१०॥
जयाच्या ग प्रेमासाठीं । सद्गुरु ग पाळी लळे ।
तयाच्या ग पायीं लोळें । मोक्षसुख ॥११॥
येऊनि ग नरजन्मी । सद्गुरु ग नाहीं केला ।
तयाचा ग वायां गेला । सर्व जन्म ॥१२॥

*चाल १ ली*

सूर्याच्या तेजामध्यें । खद्योता नाहीं धांव । (य२पू.१४९)
तैसी सद्गुरुपायीं ग बाई । हरीली स्वर्ग हांव ॥१३॥
होऊनि वेदपाठी । शास्त्रार्थ केला जेणें ।
सद्गुरुकृपेवीण । तयाचें व्यर्थ जीणें ॥१४॥
साधील्या गुप्तसिद्धी । केले बहू सायास ।
सद्गुरु कृपेवीण ग बाई । ऊपणला भूस ॥१५॥
उत्तम कर्मधर्म । उत्तम जातीकुळ ।
सद्गुरुकृपेवीण ग बाई । व्यर्थ तयाचें सकळ ॥१६॥
कुंकुम विधवेचें । गायन गोवाऱ्याचे ।
सद्गुरुकृपेवीण । ज्ञानही तैसे त्याचे ॥१७॥

*चाल ३ री*

जयाचा शुद्धभाव । एका ग सद्गुरु ग पायी ।
तयाला शेषशायी । उद्धरीतो ॥१८॥
सद्गुरु ग स्तुतिगीत । वाचतील ग ज्या कोणी ।
देईल ग चक्रपाणी । स्वपद त्यां ॥१९॥

९



*चाल १ ली*

सद्गुरु ग स्तुति पर । पहीलें प्रकरण ।
ज्ञानेश्वराचें पायीं ग बाई । केलें तें समर्पण ॥२०॥

॥ हरिः ॐ तत्सदिति स्त्रीगीते सद्गुरुमहिमानिरूपणन्नाम प्रथमं प्रकरणम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

ooo

*॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥*

## प्रकरण २ रे

# ॥ गुरुसेवा ॥

*चाल १ ली*

ॐ सद्गुरु मायबाप । देवाचेंही दैवत ।
तुमचे चरणावरी ग बाई । सद्भावें प्रणीपात ॥१॥
सर्वथा बुद्धिहीन । ज्ञानाची नाहीं ठेव ।
एक्या तुमचिये पायीं ग बाई । ठेविला भोळाभाव ॥२॥
माझें या सृष्टीवरी । स्वकीय नाहीं देवा ।
कोणत्या उपचारें ग बाई । तुमची करूं सेवा ॥३॥ (य४-३)

*चाल ३ रीं.*

लेंकरू ग मी लहान । पदरीं ग मज घेई ।
सर्वदां ग ठेवी पायीं । आपुलिया ॥४॥

*चाल १ ली*

नलगे योग याग । नलगे तपक्रिया ।
शरीर झिजवीन ग बाई । श्रीगुरु तुमचे कार्या ॥५॥
निश्चय हाचि माझा । सद्गुरु ज्ञानेश्वरा ।
यया उपरी तुम्हां ग बाई । कळेल तैसें करा ॥६॥

तुमचे सेवेलागीं । सामर्थ्य नाहीं मज ।
परि वेडे वाकुडेंही ग बाई । गायीलें त्यागुनि लाज ॥७॥
होईल हळू हळू । ऐसी मज नाहीं वेळ ।
म्हणोनी तुम्हांपाशीं ग बाई । घेतली थोर आळ ॥८॥

*चाल ३ री*

तुमचे ग सेवेवीण । इतर ग नाहीं आशा ।
सद्गुरु ग जगदीशा । मायबापा ॥९॥

*चाल १ ली*

तुमचें सेवेवीण । मागेन अन्य देवा ।
तरी तात्काळ माझी ग बाई । झडोनी जावो जिव्हा ॥१०॥

*चाल ३ री*

शरीराच्या ग बाई त्वचा । काढुनी ग लवलाही ।
पादुका ग तुमचे पायीं । वाहियेल्या ॥११॥

*चाल १ ली*

तुमची रजधूळ । माझीये भाळीं राहो ।
सर्वत्र सर्वभावें ग बाई । सेवक मीची होवो ॥१२॥
तुमच्या निर्माल्याची । घ्राणासीं लागो प्रीती ।
तुमचे गुणवाद ग बाई । आयको सदा श्रुती ॥१३॥
स्वरूपीं तुमचिया । जडोत सदा नेत्र ।
पाऊलें ठेवावया ग बाई । हृदय असो पात्र ॥१४॥
मुखमंदीर माझें । तुमची पीकदानी । (य४-४)
विष्ठाप्रसाद मज ग बाई । द्यावा जी मोक्षदानी ॥१५॥
तुमची लघुशंका । ते मज सप्तसिंधु ।
अमृतकुंड माझा ग बाई । तुमचा पदबिंदु ॥१६॥
शुद्धसत्त्वाचा पंखा । वारोत माझे हात ।





आज्ञानुसार पाय ग बाई । क्रमोत सुखें पंथ ॥१७॥
माझे बाह्य कुटुंब । होवोत पददास ।
माझीया दास्यत्वाचा ग बाई । वाढो बहू उल्हास ॥१८॥
माझा तो शुद्धभाव । तेंचि पक्वान्नाचें ताट ।
प्रेमाचें पाणी वरी ग बाई । पावेन पाहतां वाट ॥१९॥
मी स्वतः कापूर । जळेन ज्ञानाग्नींत ।
मग सर्वत्र तुम्ही ग बाई । गुरुराया उर्वरीत ॥२०॥
ऐसीच जन्मोजन्मीं । मजला घडो सेवा ।
यावीण अन्य नको ग बाई । तुमची आण देवा ॥२१॥
तनू मन धन । अर्पण तुम्हांप्रती ।
आतां हृदयीं माझ्या ग बाई । राहावे कृपामूर्ती ॥२२॥
एवढें कृपादान । द्यावें जी ज्ञानेश्वरा ।
अर्पीला आत्मभाव ग बाई । तुमच्या नमस्कारा ॥२३॥

॥ हरिःॐतत्सदिति स्त्रीगीते गुरुसेवानिरूपणन्नाम द्वितीयं प्रकरणम्॥

ooo

## प्रकरण ३ रे

# ॥ श्रीगुरूंना विनंती ॥

*चाल १ ली*

सद्गुरु मायबापा । सत्वर कृपा करा ।
स्वप्रसादें मज ग बाई । भवाब्धींतूनि तारा ॥१॥

*चाल दूसरी*

तुमचे स्वरूपाची । ओळख नाहीं देवा ।
कोण्या प्रकारें करूं सेवा । गंगा जमना ।
गंगेचें हिरवें पाणी । मोतीदाणा । (य४-५)

मोती बांधले पांच पदरी । राजा नांदतो सात नगरी ।
साता माय किल्यावरी । राजा बोले ॥२॥

*चाल ४ थी / चार चरणांची*

माय बाप बंधू । सोयरे गणगोत ।
संसारीं बुडविती । धरूनि माझा हात ॥३॥
जंववरी धन । तोंवरी याना याना ।
आपुल्या अर्थासाठीं । लोक म्हणती काका नाना ॥४॥

*चाल १ ली*

धनासाठीं सुत दारा । आंगीं लागल्याती बारा ।
तियाचें आशेयानें ग बाई । जाणें घडे यमदारा ॥५॥

*चाल ४ थी*

संसार दुःखमूळ । विंगळ्याचा माज ।
किंचीत सुख येथें । नाहीं गुरुराया मज ॥६॥
वासना ही डाकिनी । नेत ओढोनि तात्काळ ।
कामादि वैरी सहा । मज मारीती सर्वकाळ ॥७॥

*चाल १ ली*

करावें जें जें कर्म । वासना तेथें जाय ।
तियेच्या योगें नाना ग बाई । योनींत जन्म होय ॥८॥
चवऱ्याशी लक्ष योनी । भोगीलें दुःखवास ।
मातेच्या गर्भामध्यें ग बाई । कष्टले नवमास ॥९॥
मायगर्भींच्या यातना । सांगतां दुःख वाटे ।
कंटाळला जीव ग बाई । आतां न्यावें न त्या वाटें ॥१०॥
उजवीकडे नर्क । डाविया कडे मूत्र ।
कफानें बंद मुख ग बाई । देह झाला अपवित्र ॥११॥
जठराग्नीच्या तापें । कढला देह माझा ।





सोडवी येथोनिया ग बाई । समर्था गुरुराजा ॥१२॥
पुर्वीच्या दुष्कर्मानें । दुःखित झालें फार ।
ओसंगा घेई आता ग बाई । शिरीं ठेवी कृपाकर ॥१३॥(य४-६)

*चाल ४ थी*

वात पित्त कफ । व्याधि करिती दारुण ।
प्राणाचें भय मोठें । चित्तीं नाहीं समाधान ॥१४॥
आवडते भोग । भोगूनी संपलीया ।
दुःख वाटे मना । चिंतेनें जळे काया ॥१५॥
सृष्टींत सर्व भूते । दुःखद मज होती ।
व्याघ्र सर्प चोर शत्रू । मज खावया पाहाती ॥१६॥
अकस्मात प्रारब्धाचा । येऊनी पडे घाला ।
न सुचे कांहीं तेणें । नरजन्म वाया गेला ॥१७॥
सूर्यादि नवग्रह । लागले माझ्या पाठीं ।
दाविती सुखदुःख । सेवा चुकतां गोमटी ॥१८॥
ऐसे हे तिन्ही ताप । यांनी फार तापवीलें ।
पदरीं धरा स्वामी । तुम्हां शरण मी आलें ॥१९॥
धुंडिता त्रिभूवनीं । न मिळे दाता कोणीं ।
अर्पीलें तनु मन । आता तुमचें चरणीं ॥२०॥
अस्थींची मोळी देह । स्वरूप कीटकाचें ।
तयासी म्हणें मी मी । ब्रह्म विसरूनी साचें ॥२१॥
श्रीगुरु मायबापा । मज संसारीं नका ठेवू ।
तुह्मी जरी मोकलीलें । तरी शरण कोणा जाऊं ॥२२॥
मायासिंधूचा भोवरा । ओढी आपुलीयाकडे ।
गुरुराया तुम्हांवीण । पाहूं कोणाच्या मुखाकडे ॥२३॥

संसार दुःखमूळ । तो म्यां त्यागीला सकळ ।
श्रीगुरु तुम्हा आता । माझी असो कळकळ ॥२४॥
नेणें मी भावभक्ती । बहु साधनांच्या कोटी ।
सद्गुरु मायबापा । माझे अन्याय घाला पोटीं ॥२५॥
अनंत अपराधी । पातकांचें बिढार ।
सद्गुरु मायबहिणी । माझा करी अंगीकार ॥२६॥
सांडोनि सर्वस्व म्यां । धरीले तुमचे पाय ।
व्हावया जीवन्मुक्त । कोणी सांगावा उपाय ॥२७॥ (य४-७)
झालियाही जीवन्मुक्त । सेवा घडो गुरुनाथा ।
निर्वाण प्रेम सदा । असो चढता वाढता ॥२८॥

*चाल १ ली*

सद्गुरु कृपावंता । स्वामीया ज्ञानेश्वरा ।
अंतरीं द्यावा मज ग बाई । अवीट प्रेमझरा ॥२९॥

॥ हरिः ॐ तत्सदिति स्त्रीगीते भक्तिवैराग्यपूर्वक विनंतिरूप गुरुप्रश्नवर्णनन्नाम तृतीयप्रकरणम् ॥

°°°

प्रकरण ४ थे

## ॥ साधनपूर्वक गुरूपदेश ॥

*चाल १ ली*

करूनि एकचित्त । सद्गुरु उपदेश ।
आयकतां सावधान ग बाई । तुटेल भवपाश ॥१॥

*चाल ३ री*

सद्भावे ग युक्त मनीं । चिंतावे ग गुरुपाय ।
संसारीं ग नाहीं भय । किंचितही ॥२॥

*चाल २ री*





सद्गुरु म्हणती कन्ये । वेदाची पाळी आज्ञा ।
जीवन्मुक्तीची पाव संज्ञा । साजणि बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ॥३॥

*चाल १ ली*

नास्तीक बुद्धादिक । पाखंडी सर्व मतें ।
त्यागूनी तियांप्रती ग बाई । चालावे वेदमतें ॥४॥
कंठीं प्राण आलीयाही । जारकर्म करूं नये ।
पतिसेवा सर्वकाळ ग बाई । करीतां सुख होय ॥५॥

*चाल ३ री*

आलीयाही ग मोठें भाग्य । उन्मत्त ग होऊं नये ।
चिंतावे ग गुरुपाय । मनीं सदा ॥६॥ (य४-८)

*पती हाच गुरु*

*चाल ४ थी*

अहेव स्त्रियांलागीं । पतीच गुरुदेव ।
विधवासाठीं आहे । स्वामी तो रमाधव ॥७॥
जिला मोक्षइच्छा तीनें । गंधर्व करूं नये ।
विधवा झालीयाही । चिंतावे हरिपाय ॥८॥
सपत्नीजनांवरी । करावी सदा प्रीती ।
धरावी वरिष्ठांची । सर्वदा सेवावृत्ति ॥९॥

*चाल ३ री*

विपरीत ग झालें तरी । क्रोध कदा ग करूं नये ।
पतीवरी ग धरूं नये । द्वेषभाव ॥१०॥

*चाल ४ थी*

आपुल्या मैत्रिणीसी । उचित द्यावे सदा ।
दासदासी सेवकांच्या । चुकवाव्याचि आपदा ॥११॥

ऐसीया आचरणें । कामिनी धन्य होती ।
उलट करिती त्या । कुलटा म्हणवीती ॥१२॥
दरिद्र आलें तरी । करावी पतिसेवा ।
संतोष द्यावा सदा । अतिथी गुरु देवा ॥१३॥
स्त्रियांनां सर्वभावें । दैवत पतिराजा ।
अंग हे झीजवावें । तयाच्या सेवाकाजा ॥१४॥
पतीचा त्रास जीवीं । इतरांसवें सुख ।
पतिव्रता स्त्रियांनीं । त्यांचें पाहूं नये मुख ॥१५॥
बाहेरीं उज्वल । अंतरीं जार आशा ।
स्त्रियांनीं गुंतू नये । तियांच्या मोहपाशा ॥१६॥
देवाची दंभपूजा । पतीलागीं वांकूडे ।
तिचा व्यर्थ गेला जन्म । कल्पवरी नर्कीं पडे ॥१७॥
स्वासीनी बाईयांनों । भावें करा पतिसेवा ।
विधवांनों तुम्ही मनीं । आठवा रमाधवा ॥१८॥

*चाल २ री*

चारी वर्णांच्या स्त्रियांनीं । करावी हींचि कर्मे । (य४-९)
येणें कुंठती बंधमर्मे । साजणी बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ॥१९॥
ऐसीया सत्कर्मांनीं । चित्तींचा मळ जाय ।
अंगी विरक्तता होय । साजणी बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ॥२०॥

*चाल ४ थी*

येथील सर्व भोग । वाटती तुच्छ मनीं ।
स्वर्गींची आशा गेली । सहज हारपोनी ॥२१॥
अनित्य विश्व सारे । नित्य तें ब्रह्म एक ।



वैराग्यासह यासी । म्हणती सुविवेक ॥२२॥

*चाल ३ री*

विषयां ग वरी जातां । मनासी ग आवरावे ।
इंद्रिय ग सांवरावे । कानादिक ॥२३॥

*चाल ४ थी*

ओळविलेल्या मना । पुन्हा विषय न द्यावे ।
ऊन-हींव सुख-दुःख । अंगें सहन करावे ॥२४॥
वेदगुरुवाक्यावरी । पतिवचनींही तैसा ।
विश्वास दृढ व्हावा । कधीं न ढळे ऐसा ॥२५॥
मिळो वा न मिळो कांहीं । प्रेमें करावें चिंतन ।
समाधान म्हणती या । मुनिराज पुरातन ॥२६॥
जन्म मृत्यु जरा रोग । ह्यांतुनि तरण्याची आशा ।
चित्तीं दृढ तिया मुनी । म्हणताती विविदिषा ॥२७॥
विवेक विराग । शमादी षटक ।
मुमुक्षेसहित हे । चतुःसाधन कटक ॥२८॥
पतिसेवादि पहिलीं । साधनें बहिरंग ।
दुसरें विवेकादि । जाणावें अंतरंग ॥२९॥
वैराग्य झाल्यावरी । सोडावा सर्वसंग ।
पतिसेवादिक सारीं । कर्मे त्यागावी बहिरंग ॥३०॥
विवेकादिक चारी । साधनें साधलीया । (य४-१०)
गुरूसी शरण जावें । निर्लज्ज होऊनियां ॥३१॥
पति पिता पुत्र गोत । कोणी आलें जरी आड ।

तरि हित सोडूं नये । न धरावी त्यांची भीड ॥३२॥
गोविंद विष्णु कृष्ण । राम नारायण हरी ।
सर्वकाळ आवडतें । नाम जपावें अंतरी ॥३३॥
धरूनि दृढ ध्यान । करावी देवपूजा ।
न मिळतां उपचार । तरि कीजे मानसपूजा ॥३४॥

*गुरुदर्शन व सेवा*

ऐसी दृढ हरिभक्ती । साधिलीया देवराव ।
अनुग्रह देतांक्षणीं । दृष्टि पडे गुरुराव ॥३५॥
गर्व सर्व सांडूनियां । त्याचे पायीं शरण जावें ।
अर्पूनि जीवभाव । देह झीजवावा सेवें ॥३६॥
पुढें त्या श्रीगुरुमुखें । शास्त्र करावें श्रवण ।
दिलेल्या मंत्रजपें । सर्व तोडावें बंधन ॥३७॥
सद्गुरु मायबापा । कृपाळू ज्ञानदेवा ।
ॐ कारयुक्त मंत्र । स्वामी मज उपदेशावा ॥३८॥
तो मंत्र जपतांचि । चित्तीं येतो प्रेमभाव ।
तुमच्या पदामृताचा । सहजची अनुभव ॥३९॥
ज्ञानेश्वर माऊलीये । मज करी ब्रह्मश्रुती ।
स्त्रीगीत चालवावें । पुढें देऊनियां स्फूर्ती ॥४०॥

॥ हरिःॐ तत्सदिति स्त्रीगीते अधिकारानुसार बाह्यान्तरंगसाधनपूर्वक गुरुपदेशो नाम चतुर्थं प्रकरणम् ॥

१४



ooo

## प्रकरण ५ वें.

# ॥ यथार्थ परीक्षापूर्वक सद्गुरु लक्षण ॥

*चाल दुसरी*

ॐकार जया मुखीं । अंतरीं मळ नाहीं ।
शरण जावें त्याचे पायीं । साजणि बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ॥१॥ (य४-११)

*चाल ३ री*

अज्ञान ग सज्ञानासी । सारीखा ग प्रीतिकर ।
तयासी ग दोनी कर । जोडा भावें ॥२॥

*चाल १ लीं*

जयाच्या चित्तीं नाहीं । द्वेषासी कदां थारा ।
मुमुक्षूजनीं कीजे ग बाई । सदा तयाचा आसरा ॥३॥

*चाल ३ री*

वाणींत ग सिद्धशक्ती । ईश्वरासी ग प्रिय ।
ऐसीयांचे ग पाय । धरा वेगीं ॥४॥
पंच ग विषयांचे ठायीं । जया ग लोलुपता नाहीं ।
त्याचे ग पदीं ठेवा डोई । प्रेमभावें ॥५॥
जाति ग क्रिया गुण धर्म । याच्या ग वेगळें जें वर्म ।
तें ग जाणूनिया मर्म । निर्द्वंद्व जो ॥६॥

*चाल २ री*

अविद्येमाजीं जीव । पाहूनि घेतो धांव ।
तोचि सत्य गुरुदेव । साजणि बाई ।

कृष्णाला विडे देती । गवळ्याचि राई ॥७॥

*चाल १ ली*

चारीही मुक्ती ज्याच्या । लोळती पायातळीं ।
आपुला जीवभाव ग बाई । तयासी द्यावा बळी ॥८॥
संयोगीं हर्ष नाहीं । वियोगीं नाहीं शोक ।
सद्गुरु तो ब्रह्मवेत्ता ग बाई । ब्रह्मपदीं पावे सूख ॥९॥
विद्येचा गर्व नाहीं । सर्वां भूतीं समदृष्टी ।
तयाच्या चरणाहुनी ग बाई । ओवाळावी सर्व सृष्टी ॥१०॥
ब्राह्मण गाय हत्ती । चांडाळ आणि श्वान ।
जयाच्या दृष्टीपुढें ग बाई । सर्व दीसति समान ॥११॥
सगुण योग ज्याला । जाहला साक्षात्कारी ।
निर्गुणामध्यें जो कां ग बाई । सहज आत्माचारी ॥१२॥ (य४-१२)

*चाल २ री*

वेदांचा अर्थ जाणे । षट्शास्त्र  पारंगत ।
परी निरहंकार चित्त । साजणि बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ॥१३॥

*उपदेश देण्याला अपात्र*

*चाल १ लीं*

वेदार्थ जाणोनीयां । झाला जो ब्रह्मनिष्ठ ।
तयासी शरण जातां ग बाई । नासती भवकष्ट ॥१४॥
केवळ अनुभवी । परि वेदार्थ न जाणें ।
ऐसा तो उपदेशा ग बाई । पात्र नाहीं वाचागुणें ॥१५॥
संशय जिज्ञासूंचे । तेथे न सुटती स्पष्ट ।
म्हणोनी गुरुपदा ग बाई । पात्र नाहीं ब्रह्मनिष्ठ ॥१६॥

१५



निःशंक मुमुक्षूला । सद्गुरु तो होय खरा ।
परि शंकायुक्तांलागीं ग बाई । तेथें मिळेचि ना थारा ॥१७॥
वेदांचा अर्थ जाणें । नाहीं ब्रह्मात्मानुभव ।
व्यर्थ तो शब्दज्ञानी ग बाई । तेथं धरूं नये भाव ॥१८॥
जग मिथ्या तो सांगे । 'अहं ब्रह्म' म्हणे तोंडा ।
अंतरीं बोध नाहीं ग बाई । उगा कांडीयेला कोंडा ॥१९॥
म्हणोनी गुरु व्हावा । वेदार्थी ब्रह्मवेत्ता ।
चुकती भवपाश ग बाई । तयासी शरण जातां ॥२०॥
वेदांच्या योगें तोडी । जो शिष्यांचे कुतर्क ।
ब्रह्मात्मानुभवें ग बाई । वारी तो भवशोक ॥२१॥

*चाल २ री*

जयाच्या कृपादृष्टीं । बंधचि मोक्ष होय ।
प्रेमें वंदा त्याचे पाय । साजणि  बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याचि राई ॥२२॥

*चाल १ ली*

कैवल्य देण्यासाठीं । उदार सर्वकाळ ।
भेटतां अधिकारी ग बाई । करी ब्रह्मचि तात्काळ ॥२३॥(य४-१३)
आपुल्या सामर्थ्यानें । ईश्वर वश केला ।
आत्मसुख दावावया । स्वये दर्पण जो झाला ॥२४॥

*चाल २ री*

जयाची भेट होतां । साधनें येती आया ।
शरण जावें त्यांचे पाया । साजणि बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई० ॥२५॥

*चाल १ ली*

अविद्या आंधारांत । विज्ञान सूर्योदय ।
जयाच्या प्रसादानें ग बाई । सहज लाभ होय ॥२६॥

*चाल २ री*

आपुला ग शिष्य जरी । दुसरीकडे ग गेला ।
तरी ग द्वेष नाहीं ज्याला । सद्गुरू तो ॥२७॥

*चाल १ ली*

पिपीलिकेहूनी । ब्रह्मयापर्यंत ।
सारीखी भूतें जया ग बाई । ब्रह्मचि सर्वगत ॥२८॥

*चाल ३ री*

अंतर ग बाह्य जैसा । विशुद्ध ग गंगाजळ ।
द्वैताचा ग नाहीं मळ । चित्तीं ज्याच्या ॥२९॥

*चाल १ ली*

सच्चिदानंद पदें । तिन्ही जो झाला एक ।
तयाच्या चरणांतळीं ग बाई । लोळत मोक्षसूख ॥३०॥
शिष्याच्या उपदेशीं । गुरुत्वगर्व नाहीं ।
परि लोळे आपणची ग बाई । गुरुत्व ज्यांच्या पायीं ॥३१॥

*चाल ३ री*

देवोनि ग ब्रह्मज्ञान । शिष्यासी ग घाली पोटीं ।
परी ग कर्तव्याची दृष्टी । नुमटे ज्या ॥३२॥

*चाल १ ली*

जैसा जो अधिकारी । तैसा दे उपदेश ।
भलती वटवट ग बाई । कदा न करी द्वेष ॥३३॥ (य४-१४)
देवोनि कृपादान । सहज करी बोध ।
साधनीं लावूनियां ग बाई । शेवटीं करी सिद्ध ॥३४॥
श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ । नाहीं दंभ अभिमान ।





चित्तीं ज्ञान भूतदया ग बाई । त्याचे काय वर्णू गुण ॥३५॥
ऐसीया लक्षणांनीं । युक्त जो गुरुराव ।
मायबाप हितकारी ग बाई । त्यासी द्यावा जीवभाव ॥३६॥
आपुल्या पुत्रावरी । करीतो प्रेम कांहीं ।
तैसेची शिष्यावरी ग बाई । अधीक गुणें पाही ॥३७॥
ब्रह्म ग स्वरूप शिष्य । झालिया ग पूज्य मानी ।
कदा नव्हे ग अभिमानी । गुरुत्वाचा ॥३८॥

*चाल १ ली*

सच्छिष्यावरी लक्ष । टिटीव पक्षापरी ।
अर्पावें तनमन ग बाई । तयाचें पायांवरी ॥३९॥
जाति वर्ण कुळ कांहीं । सद्गुरूचे पाहुं नये ।
अंत्यज हो का कोणी ग बाई । धरावेची दृढ पाय ॥४०॥
याति वर्ण कूळ गोत्र । देहीं कल्पित सकळ ।
देहारहित जो झाला ग बाई । तया कैचें यातिकूळ ॥४१॥
वेदवेत्ता ब्रह्मनिष्ठ । तोचि ह्मणावा ब्राह्मण ।
इतर शूद्र सारे ग बाई । त्यांना जाऊं नये शरण ॥४२॥
शांति क्षमा भूतदया । ब्रह्मज्ञान विरक्तता ।
कर्म योग हरिभक्ती ग बाई । जया गुरु जो पूरता ॥४३॥
तयासी शरण जावें । सांडुनी सर्व पाश ।
क्षणांत करील तो ग बाई । माया बंधनांचा नाश ॥४४॥
ॐ काररूपी ऐसा । बापमाय ज्ञानेश्वर ।
तया गुरुपायीं राहो ग बाई । जन्मोजन्मी माझें शीर ॥४५॥

*हरिः ॐ तत्सदिति स्त्रीगीते **यथार्थपरीक्षापूर्वकसद्गुरुलक्षणकथनं** नाम पंचमप्रकरणम् ॥*

*॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥*

***॥ समाप्त ॥***

(य४-१५)

१७

॥ श्रीसद्गुरुज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# स्त्रीगीतसंग्रह

(चवथी यष्टी)

मिथ्याचा मिथ्याचा सत्यामध्यें । करीतोऽद्वय अर्थ ग सखुगडणी ।
नमो तो नमो तो आदिनाथ । नमो तो आदिनाथ ॥१॥
मच्छाच्या मच्छाच्या उदरांत । गर्भींच उपदेश ग सखुगडणी ।
वंदू त्या वंदू त्या मच्छेन्द्रास । वंदू त्या मच्छेन्द्रास ॥२॥
भूमीचा भूमीचा मंत्ररूप । अखंड ब्रह्मसाक्ष ग सखुगडणी ।
वंदू तो वंदू तो श्रीगोरक्ष । वंदू तो श्रीगोरक्ष ॥३॥
नसोनी नसोनी एकदेशी । भेदींच पूर्ण अभेद ग सखुगडणी ।
नमूं तो नमूं तो अद्वयानंद । नमूं तो अद्वयानंद ॥४॥
सर्वांची सर्वांची शुद्धमूर्ती । अंकुरालागीं आली ग सखुगडणी ।
गह्यनी गह्यनीमाय नमियली । गह्यनी नमियली ॥५॥
वृत्तीचा वृत्तीचा नाहीं ठाव । प्रवृत्ति अविरोधी ग सखुगडणी ।
निवृत्ती निवृत्ती तो मी वंदी । निवृत्ती तो मी वंदी ॥६॥
जयाच्या जयाच्या स्तवनाचा । नेणती श्रुती पार ग सखुगडणी ।
वंदू ते वंदू ते ज्ञानेश्वर । वंदू ते ज्ञानेश्वर ॥७॥



भक्तीचा भक्तीचा चहूंकोट । सोपानदेव तात ग सखुगडणी ।
तत्पायीं तत्पायीं दंडवत । तत्पायीं दंडवत ॥८॥
सकळ सकळ चित्सुखाची । बुंथि ही मुक्ताबाई ग सखुगडणी ।
शिर वाहो शिर वाहो तिचे पायीं । शिर वाहो तिचे पायीं ॥९॥
जयाच्या जयाच्या सामर्थ्यांनें । रेडा तो बोले वेद ग सखुगडणी ।
ज्ञानेश ज्ञानेश बाप माझा । प्रणवातीत भेद ग सखुगडणी ॥१०॥
सद्गुरु सद्गुरु परंपरा । गायीली स्त्रीगीतांत ग सखुग०। (य४-१७)
वाचिती वाचिती जे कां कोणी । त्या भेटे गुरुनाथ ग सखु०॥११॥
गणेश शक्ती सूर्य । श्रीहरी सदाशिव ।
पाहतां मंत्रोद्धारें ग बाई । एकची जन्मनांव [१] ॥१२॥
कृतादि युगीं जनां । कलींत जन्म-आशा ।
कलींत होती संत ग बाई । प्रिय जे जगदीशा ॥१३॥
अन्वय[२] सदा आहे । नाहींच व्यतिरेक ।
संकेतें [३] जीव ब्रह्म ग बाई । श्रीकृष्णपायीं एक ॥१४॥

*(टीप :- १.वासुदेव २.अन्वय = ३.संकेत- परमेश्वर ओतप्रोत भरला आहे हें ज्ञान )*

आकाशव्याप्तीमध्यें । घटपटा नाहीं ठाव ।
तसेंच विश्व नाहीं ग बाई । सर्वत्र कृष्णराव (वासुदेव) ॥१५॥

संकेत जाणोनीया । समान धरी दृष्टी ।
मुखानें वर्णी सदा ग बाई । श्रीगुरुगुणगोष्टी ॥१६॥
ईश्वरपूजायोगें । मन तेंचि विस्मृती ।
सगुणध्यानामध्यें ग बाई । न राहे अहंकृती ॥१७॥
राखुनि पातिव्रत्य । हरि तुजचि मिळवावे ग ।
आतांही तूंचि येथें । आम्ही परतोनी कां जावें ग ।
मोहन गिरधारी । धारि कृष्णाला राधा प्यारी ग ।
कोण्या राजानं नवल केल । फुलबागाला पाणी दिल्ह ग
॥१८॥
सत्तेनें त्यागी मतें । चित् शब्दें स्थिर वृत्ति ।
जाणोनी ब्रह्मसुखा ग बाई । हरिपदीं ठेवी प्रीती ॥१९॥
जितुके होती जन्म । तितुके बापमाय ।
अवचट मनुष्यजन्मीं ग बाई । लाधती गुरुपाय ॥२०॥
एकाचि जन्मामध्ये । बहू येती सुत दारा ।
सद्गुरु तैसा नोहे ग बाई । कोटि सुकृताचा थारा ॥२१॥
नेत्रांच्या नेत्रांच्या अश्रुधारा । पडोत हरिवरी ग सखुगडणी ।
प्रेम हा प्रेम हा पायावरी । प्रेम हा पायावरी ॥२२॥
चाराया जासी गाई । रुतती काटे पायी ।
म्हणोनी चित्तामध्यें ग बाई । स्थीरता मुळी नाही ॥२३॥
श्वासांत श्वासांत सोऽहंभाव । वाणींत वासुदेव ग सखुगडणी ।
आंगा ये आंगा ये ब्रह्मभाव । आंगा ये ब्रह्मभाव ॥२४॥ (य४-

१८



१८)
सगुणहरी पुढें । मज नावडे ब्रह्मभाव ग ।
घेवोनि नानाजन्म प्रेमें पूजीन वासुदेव ग ।
मोहन गिरधारी । धारि कृष्णाला राधा प्यारी ग ।
कोण्या राजानं नवल केल । फुलबागाला पाणी दिल्हे ग
॥२५॥
झाले जे गीत कांहीं । तयाची प्रेममाळा ।
गुंफोनी भक्तीं घालु ग बाई । श्रीज्ञानेश्वरगळां ॥२६॥
प्रणव एकाक्षरी । बाई हरि अक्षर दोन ग ।
म्हणोनि हरी नांव । बाई प्रणवाहुनी थोर ग । मोहन० ॥२७॥
बाई माझीया सुखासाठीं । पूजणें नाहीं देव ।
सुखी तो राहो माझा ग बाई । श्रीहरी वासुदेव ॥२८॥
आठव आठव माझ्या मनीं । होताहे वारंवार ग सखुगडणी ।
केव्हां भेटतील भेटतील शारङ्गधर । भेटतील शारङ्गधर ॥२९॥
कठीण कठीण पोळी आहे । कोंवळा शुद्ध भात ग सखुगडणी ।
सेवावा सेवावा प्रेमभावें । न कष्टवितां दात ग सखुगडणी
॥३०॥
ऐकोनि हरिगुण । वाटतें असें मनीं ।
सासूला न सांगतां ग बाई । एकलें जावें वनीं ॥३१॥
देखतां देखतांचि । चित्त हें झालें वेडे ।
जाऊं तें पाहतसे ग बाई । गोपाळकृष्णाकडे ॥३२॥

कंचोळी कंचोळी वाळवंटी । चोरूनी नेतो हरी ग सखुगडणी ।
प्रेमळा प्रेमळा खांद्यावरी । प्रेमळा खांद्यावरी ॥३३॥
परमानंदें मन । माझें हें मोहियलें ।
गोकुळीं नारायण ग बाई । मंचकीं पहूडले ॥३४॥
प्रेमळजनसूख । प्रेमाचिमध्यें मिळे ग ।
भक्तिवांचोनि ज्ञान । वैराग्य तेंचि जळे ग । मोहन० ॥३५॥
पति पुत्र गोत्रादिक । सांडीले ओवाळोनि ।
निष्ठूर कैसा झाला ग बाई । आह्मां सांडाया हरि वनीं ॥३६॥
तुझें हें ओष्ठामृत । पीतां लाजवूं देवा ।
मोक्षही त्यागोनिया ग बाई । सर्वदा करूं सेवा ॥३७॥
श्रीखंड खाऊं खाऊ । दिवस गेले बहू । (य४-१९)
सोडोनि सर्व चला ग बाई । वृंदावनीं रास पाहूं ॥३८॥
पूर्णकाम आम्ही बाळा । हरीवरी मोहियलों ।
हरिगुण ओढोनिया ग बाई । परब्रह्म आंगें झालों ॥३९॥
रुक्मिणी ऐशा नारी । तुज प्रिय नारायणा ।
दासी मी नेत्रांधळी ग बाई । ठेवि झाडाया आंगणा ॥४०॥
ईश्वरा येणें जाणें । अवतारा पुट घडे ।
सद्गुरु बापकृपें ग बाई । नित्यत्व आम्हां जोडे ॥४१॥
देवाला जन्ममरण । भक्तांच्या कार्यासाठीं ।
सद्गुरु कृपा बळें ग बाई । वैषम्य नाहीं सृष्टीं ॥४२॥

*साकार-निराकार-ब्रह्मसंधि*

१९



अंतरीं निराकार । साकार डोळ्यापुढें ।
शरीर कृष्णरूप ग बाई । ब्रह्मसंधीं सांपडे ॥४३॥
शब्दाच्या बळें ब्रह्म ग बाई । विशेष चित्ती पावे ।
लक्ष्यार्थबळे ग बाई । सगुणदृष्टि फावे ॥४४॥
प्रेमानें सूत्रामध्यें । गुंफोनि गीतमाळा ।
ज्ञानेशचरणावरी ग बाई । समर्पी निजबाळा ॥४५॥
सांख्याचा जडभाग । वेदान्तीं बिम्बयोग ।
त्यागोनी उरे काही ग बाई । श्रीहरीचे ते अंग ॥४६॥
'तत्पद' चित्स्वरूप । 'त्वंपद' प्रेममय ।
'असि' ते सगुणमूर्ति ग बाई । संकेतीं समन्वय ॥४७॥
बाहेरीं शांति क्षमा । अंतरीं हरीप्रीत ।
उत्थान नाहीं तया ग बाई । व्यापक अनुगत ॥४८॥
नंदाच्या गोकुळांत । राहती ज्या सुंदरी ।
तयांचे पादरेणू ग बाई । वंदिते प्रेमे शिरी ॥४९॥
आाठवे तेचि आहे । आहे ते आठवते ।
वंदिता कृष्ण चरण ग बाई । सुखाची ऊर्मी येते ॥५०॥
शास्त्रांच्या ऐक्यसुखी । विराम पावे बुद्धी ।
सगुणप्रेमासहित ग बाई । उठे तें ब्रह्मसिद्धि ॥५१॥

*''सच्चिदानंद''*

*नाम हरिमूर्ति आणि सुख*

बाई, आहे ते नाममय । कळे ते हरीमूर्ती ग । प्रेम तो सुखरूप ।

एका सगुणीं तिन्ही प्राप्ति ग । मोहन० ॥५२॥ (य४-२०)

अद्वैत उपयोग । जनाची वैरशांति ।

द्वैताचा उपयोग ग बाई । हरिपायींच विश्रांती ॥५३॥

अद्वैत द्वैत दोन्ही । संकेतीं ते निमाले ।

श्रीकृष्णमृदुपाय ग बाई । प्रीतीनें हाता आले ॥५४॥

आहे ते प्रेमवृत्ती । स्फुरे तो कृष्णमहिमा ।

सगुणमूर्तीसूख ग बाई । त्रिरूप एक प्रेमा ॥५५॥

चाराया जासी गाई । रुतती काटे पायीं ।

लटिका अथवा खरा ग बाई । क्षोभ वाटे हृदयीं ॥५६॥

नामानें कर्मे जळती । रूपानें अभिमान ।

प्रेमानें कृष्णप्राप्ती ग बाई । विरोनी जाई ज्ञान ॥५७॥

गोपींच्या पायावरी । ठेवोनि शीर भावें ।

तयाच्या कृपायोगें । आपण तेचि व्हावें । गंगाजमना०॥

गंगेचे हिरवे पाणी । मोतीदाणा ।

मोती बांधले पाचपदरी । कृष्ण नांदतो सप्तनगरी ।

साताही शिखरावरी । हरी बोले ॥५८॥

संकेत स्फूर्तिभाव । गळोनि जावे देवा ।

शेवटी मागणें हेंचि । जन्मोजन्मीं घडो सेवा । गंगाजमना० ॥५९॥

प्रणव तीन मात्रा । असोनि त्रिधा नाहीं ग ।

तैसे सच्चिदानंद । मिळोनि विश्व पाही ग । मोहन० ॥६०॥





बाई सत्पद हरीनाम । चित्पदरूप वृत्ती ग ।

बाई आनंद पूर्ण प्रेम । तिन्ही मिळुनि एक भक्ती ग ॥६१॥

बाई गोकुळीं तरुशीळा । अवघा संभव गोपीकांचा ग ।

संकेत दृष्टी एक । त्रिविधानि उधाये साचा ग । मोहन० ॥६२॥

बाई सत्पद पितृभाव । चित्पद पुत्रप्रीति ग ।

बाई आनंद पत्नीरूप । प्रभु त्रिविध एक पती ग । मोहन० ॥६३॥

हृदय-आकाशांत । कमळाकार फूल ।

तयाच्या मध्यभागीं ग बाई । श्रीगुरुपदयुगुल ॥६४॥

जगाचे मायबाप । उपाधीविरहित ।

त्या दोघांविरहित ग बाई । सद्भावें दंडवत ॥६५॥ (य४-२१)

कृष्ण तोचि राधिका । आनंद एकी एका ।

वृत्तीच्या दोन्ही योगें ग बाई । उदय प्रेम नीका ॥६६॥

आहे तें हरिनाम । दिसे तें कृष्णरूप ।

दोघांच्या प्रेमामध्यें ग बाई । स्वानंद तो अमूप ॥६७॥

एकाची बीजामध्यें । तरूच्या नाना शाखा ।

तैसेंची एक्या ब्रह्मीं ग बाई । तद्रूप वृत्ति देखा ॥६८॥

धरीतां कान डोळा । आदित्य प्रकाशला ।

तें तेज आटोनिया ग बाई । श्रीपती देखियेला ॥६९॥

आहे ते हंसप्राण । भासे ते मनोवृत्ति ।

प्रिय तो आत्माराम ग बाई । तिन्हीही कृष्णमूर्ती ॥७०॥

पति पुत्र बहिण भाऊ । सोडोनि आलो येथें ग ।
रात्रीच्या मध्यभागीं । तुज त्यागणें अनुचित ग । मोहन०
॥७१॥
बाई बिंदूनें व्यतिरेक । अन्वय अक्षरांचा ग ।
सच्चिदानंदरूपीं । तिहीं ऐक्यभावचि यांचा ग । मोहन० ॥७२॥
सत्पद ध्यानरूप । चित्पद कृष्णसेवा ।
दोघांच्या प्रीतीमाजीं ग बाई । स्वानंद पूर्ण ठेवा ॥७३॥
सच्चिदानंदसुख । अर्पीलें ज्ञानदेवा ।
घेतली जन्मोजन्मीं ग बाई । मागोनि पदसेवा ॥७४॥
सर्वही ज्ञानप्रेम । श्रीकृष्णनमस्कारा ।
तें पातिव्रत्यपुण्य ग बाई । अर्पीलें ज्ञानेश्वरा ॥७५॥
श्रीहरीभक्तिवीण । मी ब्रह्म अहंकार ।
तयाची जीवन्मुक्ती ग बाई । सूर्यसुताचे पुर ॥७६॥
अन्वय व्यतिरेक । सोडोनि सर्व कांहीं ग ।
ठेवावा प्रेमभाव । श्रीसद्गुरुचें पायीं ग । मोहन० ॥७७॥
जयाच्या पासूनिया । उत्पत्तिस्थितीलय ।
तटस्थलक्षणानें ग बाई । तें ब्रह्म जाण स्वयें ॥७८॥
वेदाच्या कर्तृत्वानें । सर्वज्ञ ब्रह्म आहे । (य४-२२)
तयाला जाणावया ग बाई । प्रमाण वेद पाहे ॥७९॥
श्रुतीचा समन्वय । चेतन कारणार्थ ।
म्हणोनी अपवर्ग ग बाई । ज्ञानाचाचि सिद्धार्थ ॥८०॥





वेगळी वेदाहूनि । सांख्याचि खोटी उक्ती ।
प्रधान मूळ नाहीं ग बाई । जडत्व तथा प्राप्ती ॥८१॥
ऋग्वेदीं ऐतरेयांत । इच्छा ब्रह्माचे ठायीं ।
जडस्वरूपामुळें ग बाई । प्रकृतींत तें नाहीं ॥८२॥
चेतननिष्ठतया । मोक्षाचा उपदेश ।
म्हणूनी त्याज्य झाला ग बाई । सांख्याचा अभिलाष ॥८३॥
गार्गीच्या प्रश्नावरी । याज्ञवल्क्य बोलीयले ।
आकाश तेथे शब्द ग बाई । ब्रह्मचि दाखविलें ॥८४॥
सूर्याहूनि वरते । तयाचें जड ध्यान ।
तो देव कृपामूर्ति ग बाई । बुद्धि देवो प्रेरण ॥८५॥
पाणी तें रसरूप । पियूष अग्निरूप ।
ते या त्रैलोक्याचे ग बाई । वारीत सर्व ताप ॥८६॥
ज्ञानसहित धर्म । बाई वर्णन केला आतां ग ।
येथून पुढें भावें । आळवूं कृष्णनाथा ग । मोहन० ॥८७॥
हरीच्या प्रेमामध्यें । बाई साधन येती चारी ग ।
सगुणध्यानयोगे । आनंद साक्षात्कार ग । मोहन० ॥८८॥
सत्पद क्रीडारूप । बाई चित्पद अवलोकन ग ।
आनंद हास्यमुख । रूप साजिरे हें सगुण ग । मोहन० ॥८९॥
खेळणें खरें वाटे । बाई म्हणूनि तें सद्रूप ग ।

(१.ॐनमो भगवते वासुदेवाय २. वासुदेव)

पाहतां कृपादृष्टी । जाहला प्रगट चिद्रूप ग । मोहन० ॥९०॥
हास्यांत वृत्ति विरे । बाई म्हणूनी तो आनंद ग ।
ते रूप कडेवरी । घेवूनि खेळे नंद ग । मोहन० ॥९१॥
पंचदश हे गीत । अर्पीलें कृष्णापायीं ।
तयाचें पुण्य दिलें ग बाई । गुरुज्ञानेश्वराच्या पायीं ॥९२॥
मित्र ते पुण्य घेती । द्वेषी ते घेती पाप ।
भक्त भगवंतीं मिळे ग बाई । सोडूनि तिन्ही ताप ॥९३॥ (य४-२३)
कौषितक्युपनिषदीं । ऐसीच बोले श्रुती ।
भगवद्भक्तांची कर्मे ग बाई । मित्र आणि द्वेषी घेती ॥९४॥
धरूनि कान डोळा । नाकाच्या वरी दृष्टी ।
साधीतां ऐसा योग ग बाई । श्रीकृष्ण करी गोष्टी ॥९५॥
ॐकार (१) आदिबीज । नंतर नमस्कार ।
त्यापुढें जन्मनांव (२) ग बाई । मंत्र हा भवकुठार ॥९६॥
लाल तें आदिरूप । पांढरें मध्यरूप ।
पीवळें तेज दिसे ग बाई । तो हरी मायाऽऽरोप ॥९७॥
माझिया माहेराची ग बाई । वेद न पावे सीमा ।
पाहिले सुकुमार ग राधे । भेटले ते पाय आम्हा ॥९८॥
सकळ सकळ त्रिभुवनीं । धूंडता नाहीं नांव ग सखूगडणी० ।
भेटले भेटले गुरुराव । भेटले गुरुराव ॥९९॥
देवाचे देवाचे कवतुक । भक्तीचे सुख मिळे ग सखूगडणी० ।





भक्तांना भक्तांना कृष्णजीच्या । भक्तांनां कृष्णजीच्या ॥१००॥
देहाच्या देहाच्या मीपणानें । जीवाचा झाला नाश ग सखूगडणी० ।
सद्गुरु सद्गुरु तोडी पाश । सद्गुरु तोडी पाश ॥१॥
ब्रह्म मी ब्रह्म मी ऐशा भावें । ब्रह्मची होय जीव ग सखूगडणी० ।
जगची जगची ज्ञानदेव । जगची ज्ञानदेव ॥२॥
सर्वाहीं भावासाठीं ग राधे । देखिला डोळा दिसे ग ।
श्रीकृष्ण भक्तियोगें ग राधे । संसारीं नसे पिसे ग । मोहन० ॥३॥
बाई वेदाचे वेदाचे गहींवर । माझा कीं ज्ञानेश्वर ग सखूगडणी०।
तत्पायीं तत्पायीं राहो शीर । तत्पायीं राहो शीर ॥४॥
देवाच्या देवाच्या दर्शनानें । जातसे पापबुद्धि ग सखूगडणी० ।
सद्गुरु सद्गुरु दर्शनानें । जीवा परमात्मशुद्धि ग सखूगडणी०॥५॥
आपुल्या आपुल्या लेकराची । खबर घेत माय ग सखू०।(य४-२४)
तैसा तूं तैसा तूं मज पाहे । तैसा तूं मज पाहे ॥६॥
ब्रह्म हें ब्रह्म हें नाहीं जग । सुवर्णी जैसें नग ग सखूगडणी०।
सर्वही सर्वही विष्णु अंग । सर्वही विष्णु अंग ॥७॥

वरते वरते याचें मूळ । खालते आल्या शाखा ग सखूगडणी०।
अनित्य अनित्य जाण शाखा । अनित्य जाण शाखा ॥८॥
चारीही चारीही मुक्ती दासी । समाधी लागे पायीं ग सखूगडणी०।
नमो ती नमो ती मुक्ताबाई । नमो ती मुक्ताबाई ॥९॥
सद्गुरु राम माझा । पतिइच्छे झाला कृष्ण ।
कन्या जी ती मी पत्नी ग बाई । ज्ञानेश्वरीं एकपण ॥१०॥
डोळ्यांत कृष्णनाथ । हृदयीं गोपनारी ।
अंगासी संतसंग ग बाई । ज्ञानेश्वर प्रभू शीरीं ॥११॥
सद्गुरूनें स्वीकारीतां । ब्रह्मची पायां पडे ।
अष्टमा सिद्धि तेथ ग बाई । चांडाळापरी रूढे ॥१२॥
साखर राम माझा । दही तो गोपीवर ।
भोजनीं संतसंग ग बाई । तृप्ती ती ज्ञानेश्वर ॥१३॥
श्रीकृष्णनामाहुनी । सद्गुरुनाम श्रेष्ठ ।
श्रीकृष्ण कष्टें प्राप्त ग बाई । सद्गुरु निःसंकष्ट ॥१४॥
आदिनाथा पासोनि । ज्ञानेश्वरापर्यन्त ।
आमुचा श्रेष्ठ वंश ग बाई । तयातें दंडवत ॥१५॥
बाई संकेत अधिष्टान । हरि तेथें आरोपित ।
सांडोनि आरोप तो बाई । गुरु शिष्य ऐक्य होत ॥१६॥
हरि आरोपीत ऐसें । बोलणें उगें केलें ।
परि आनंदाची मूस ग बाई । रूप डोळां प्रगटलें ॥१७॥





बाई मौन हे एकदेशी । सुखरूप नाहीं कदा ।
म्हणोनिया कृष्ण नामें ग बाई । गर्जावें कीं सर्वदां ॥१८॥
एकांतीं असतां आम्ही । हरि सांगे शेषाप्रति ।
येथें जरी आला कोणी ग बाई । तरी घेई नेत्रावरूती ॥१९॥
बाई तुझा नारायण । राधेगृहीं थोर होतो ।
सांभाळी यासीं ग बाई । लाज हरूनि हा नेतो ॥२०॥
जवळी ग असतां आम्ही । तेथें कोणीहि न यावें ।
म्हणोनिया श्रीहरीनें ग बाई । शेषमंचकीं पहुडावें ॥२१॥(य४-२५)
कृष्ण म्हणे ऐक माये । एका गोपीगृहावीण ।
इतर कोठें न करि ग बाई । चोरी मी तुझीच आण ॥२२॥
बाई ईश्वरसृष्टीमध्यें । वैकुंठ दुरी नाहीं ।
सद्गुरुकृपायोगें ग बाई । मोक्षही लोळे पायीं ॥२३॥
बाई श्रीकृष्ण ईश सत्य । नामाचा अभिमानी ।
सद्गुरुबाप माझा ग बाई । नामरूप अधिष्टानी ॥२४॥
बाई निर्दय कृष्ण ऐसा । यावया लावी वेळ ।
सद्गुरु बाप माझा ग बाई । भेटे सदा सर्वकाळ ॥२५॥
बाई वैष्णवांचा धर्म । नामा सांडोनि न जावें ।
दोहीं हातीं पिटोनि टाळ्या ग बाई । कृष्ण गोविंद म्हणावें ॥२६॥
बाई संगति वैष्णवांची । तेचि माना पूर्ण कृपा ।

सांडोनि रजतम ग बाई । सत्त्वमार्ग धरा सोपा ॥२७॥
बाई संतांचि पायधूळ । हृदयीं धरितो हरि ।
तरि तुह्मी हरीसम ग बाई । कर ठेवा आम्हा शीरीं ॥२८॥
नाम घोष येतां मुखीं । कृपेहुनी थोर होय ।
परी गुरुनाथ माझा ग बाई । रूप वंदी त्यांचे पाय ॥२९॥
ईश्वर प्रेमामध्यें । एक ममत्व हा दुर्गुण ।
सद्गुरु बाप माझा ग बाई । सर्व हारवितो गुण ॥१३०॥
चला आळंदीला जाऊं । गुरुपाय दृष्टी पाहूं ।
तनुमन जीव भाव ग बाई । तेथें समर्पूनि राहूं ॥३१॥
ऐकता हरी कथा । भूतींचें होय ज्ञान ग ।
केवल शुष्कशब्दें । अहंकाराचेंचि ये भान ग । मोहन०॥३२॥
वेदान्तश्रवणानें । अपेक्षा मना युक्ति ग ।
हरिकथाश्रवणानें । एकचि प्रेमप्राप्ती ग । मोहन०॥३३॥
विश्वाचि उत्पत्ति या । प्रतिभासेंचि दाखविता ग ।
म्हणोनि गुरुनाथ । ब्रह्मरूपें निश्चय अर्था ग । मोहन०॥३४॥
प्रतिभास व्यवहार । पालन अधिष्टानीं ग ।
दाखवि म्हणोनिया । श्रीगुरू चक्रपाणी ग । मोहन०॥३५॥
वृत्तिरूप विश्वाचा । दावीत मिथ्याचा भाव । (य४-२६)
विश्वाच्या वेगळा तो ग बाई । सद्गुरु सदाशिव ॥३६॥
ब्रह्मा विष्णु महेश । विश्वलक्षणी तटस्थ ।
सद्गुरु त्याचा साक्षी ग बाई । परब्रह्म अखंडीत ॥३७॥



ऐसा जो मायबाप । सगूण आम्हासाठीं ।
तयांचे पायावरी ग बाई । शिर ठेवूं उठाउठी ॥३८॥
श्रीगुरु कीर्तियोगें । ब्रह्मविद्येचा जय ।
द्वितीय श्लोकामध्यें ग बाई । उपदेशी गुरुमाय ॥३९॥
र-कार उच्चारणी । पापाचा होय नाश ।
म-कार कपाटानें ग बाई । प्रेम तो हृदयास ॥१४०॥
देवाच्या भजनानें । भक्तांसी दृढबुद्धी ।
भक्तांच्या कृपायोगें ग बाई । देवासी सौख्य वृद्धि ॥४१॥
बाई भक्तांच्या प्रेमासाठीं । श्रीहरी झाला नीळा ग ।
बाई अलोक-रूप दावी । गोपीकांच्या डोळा ग । मोहन०॥४२॥
बाई ज्ञानाचें ज्ञानपण । कृष्णचरणिं तें हारपलें ग ।
सगुणरूप देव । एका वृंदावनींच डोले ग । मोहन०॥४३॥
बाई संस्कार बलवत्तेनें । हृदयीं आहे हें वृंदावन ग ।
मानसी ध्याता हरी । पुढें उभें ठाके येउन ग । मोहन०॥४४॥
बाई पोळी ही भक्षिल्यानें । दुखती तुझे दांत ।
म्हणोनी कृष्णनाथा ग बाई । खाववी दुधभात ॥४५॥
बाई धुंडतां वेदशास्त्र । नाहींच समाधान ।
म्हणोनि कृष्णपायीं ग बाई । जीव केला समर्पण ॥४६॥

*गुरु व देव*

नंदाच्या गोकुळांत । आहेती ज्या गवळीणी ।
तयांचे पादरेणु ग बाई । वंदीत नित्यश्रेणी ॥४७॥

बाई इंद्राचा कल्पतरू । कल्पीलें तेंचि देतो ।
सद्गुरु बाप माझा ग बाई । कल्पनातीत देतो ॥४८॥
बाई श्रीकृष्णकृपायोगें । गुरूची नाहीं भेटी ।
सद्गुरुकृपाबळें ग बाई । कृष्ण ये पाठीं पोटीं ॥४९॥
बाई ईश्वरसृष्टीमध्यें । बाई ईश्वर राहे दुरी ग ।
सद्गुरुसृष्टीमध्यें बाई । येवोनि सेवा करी ग । मोह.॥१५०॥

(य४-२७)

बाई पूतना कपटानें । विष भरोनि आली स्तनीं ग ।
पाजीत जया प्रेमें । झाली हरीची प्रेमी ग । मोहन०॥१५१॥
अध्यास नसोनीया । बाई विवर्त आहे अजुन ग ।
ऐसा सांडोनि देव । कोण्या देवाला जावें शरण ग ।
मोहन०॥५२॥
मान्य जे पतीतत्त्व । बाई असत्य सर्वापरी ग ।
तरि मग हरी कृपा । करील कवणावरी ग । मोहन०॥५३॥
देहासी अहंमती । अलिप्त सदां हरी ग ।
लज्जा न वाटे कैसी । बोलतां तया वरी ग । मोहन०॥५४॥
मृगांबु मृगा भासें । सूर्य तो कर्ता नाहीं ।
मृगांसी भ्रम असे ग बाई । मनुष्यां तें न कांहीं ॥५५॥
जरिही तो सूर्य कर्ता । तरी न रहावा भ्रम ।
तैसें हें जग सारें ग बाई । बद्धासी होय काम ॥५६॥
भ्रमती स्वयें मृग । सूर्या ते नाहीं रीती ।





तैसें हें जग नाहीं ग बाई । करिती जे हरिभक्ती ॥५७॥
ईश्वर अन्यायाचा । ऐसें जे म्हणणार ।
तयांचें मुख बंद ग बाई । कराया अवतार ॥५८॥
निर्लज्ज होवोनिया । शरण जा गुरुपायीं ।
कळेल मग तुज कीं बाई । अन्यायी हरी नाही ॥५९॥
मेघानें व्याप्त नभ । भूतल श्यामवर्णी ।
भीरू हा बालकृष्ण ग बाई । राधे तूं गृहा नेई ॥१६०॥
ऐसीया नंदगृहा । लागती ज्यांचे पाय ।
त्या राधामाधवाचा ग बाई । सर्वदा असो जय ॥६१॥
सद्गुरु ज्ञानेश्वर । तयांच्या चरणावरी ।
तनुमनसहीत ग बाई । अर्पीली गीती सारी ॥६२॥

*रामकथा*

कोदंडपाणी माझा । सांवळा नारायण ।
त्यावरूनी जीवेंभावें ग बाई । उतरुं निंबलोण ॥६३॥
बाई गौतम मुनीशापें । अहिल्या जाली शीळा ।
अनुग्राहक रामचरण ग बाई । निर्मिली पुढती बाळा ॥६४॥
मारीच म्हणे रावणा । सोडीरे सीताराणी । (य४-२८)
माराया तुजलागीं ग बाई । उद्युक्त चापपाणी ॥६५॥
भूवरी वाली जेव्हां । पाहीला रघुनाथें ग ।
आणोनि नयनीं अश्रु । तारीन म्हणे यातें ग ॥६६॥
वाली म्हणे श्रीरामा । अधर्मयुद्ध जालेंरे ।

न येतां अग्रीं माझ्या । मागोनी कां वधिलें रे । मोहन०॥६७॥

सुग्रीव काय करेल । मी जरी साह्य होतों ।

तरि एका मुष्टीमध्यें । येथें रावणा आणीतों ॥६८॥

श्रीराम म्हणे वाली । एवढा तूं विक्रमी ।

तरी मी उठवितों । क्षण एक या संभ्रमीं ॥६९॥

राज्याचा घेउनी पट । पूर्ण कोण झाला बाळा ।

सुग्रीव बंधु धन्य । तुज भेटविलें अन्तकाला ॥१७०॥

*राम नाम*

वानर वाली त्यातें । मृत्युकाळीं तो तारी राम ।

तरी मग मनुष्यांना । कां न तारी तन्नाम ॥७१॥

रामाचें जें कां नाम । तें रामाहुनि अधिक ।

रामें तारीली अयोध्या । नाम तारी तिन्ही लोक ॥७२॥

राम तो अव्यापक । अयोध्येमाजी नांदे ।

रामनाम निराकार । चहूंकडे व्यापी साधें ॥७३॥

बाई साकार गोपीनाथ । ब्रह्मींही त्याची कांती ।

करितांची सेवा भावें ग बाई । आविर्भवे सुखशांती ॥७४॥

हरीच्या एका ध्यानें । हरण होय मन ।

हंसत्व क्षणामध्यें ग बाई । हरीचें समाधान ॥७५॥

नेत्री जो नीलबिंदु । तोचि कीं नारायण ।

आकाश निळे तैसे ग बाई । विश्वची कृपाघन ॥७६॥

*वेदांची उत्पत्ति*

२६



बाई योगाच्या वृत्तिबळें । बाई ऋषी पाहती वेद ग ।

प्रत्यक्ष भक्तांमध्यें । निघती वेदशब्द ग । मोहन०॥७७॥

मन तें जिव्हामूळ । बुद्धि ते कर्णमूळ ।

चित्त तो चक्षुबिंदु ग बाई । मिळोनी आत्मथाळ ॥७८॥

आधी हें एक व्हावें । नामाची गुह्यस्थिती ।

तयाच्या अनन्तरें ग बाई । सगुण प्रेमाकृती ॥७९॥ (य४-२९)

बाई मन तें चिदानंद । बाई वायु तो होय नाम ग ।

दृष्टी ती रूपाकारें । अवघा मिळोनि हरीप्रेम ग ।

मोहन०॥८०॥

संभूत नेत्रयोगें । एकत्व जया स्थिती ।

रूपीं या एकपणें ग बाई । वायूची नित्यगती ॥८१॥

चित्ताची परीणती । विवर्तीचि प्रत्यक्ष ।

नामयोगें अमृत वेगें ग बाई । निवृत्ति भावपक्ष ॥८२॥

ईश्वर जरी भला । एकच होता येत ।

नाम सहजायोगें ग बाई । साकार प्रकटत ॥८३॥

*ईश्वर-गुरु तुलना*

बाई ईश्वरयोगभावें । वासना फार वाढे ग ।

सद्गुरुकृपायोगें । बाई कामाचि मुंडी मोडे ग । मोहन०॥८४॥

बाई ईश्वरसृष्टीमध्यें । बाई पशुत्व बंधन नरा उमटे ग ।

सद्गुरुसृष्टीमध्यें । बाई पशुत्व सारे तुटे ग मोहन०॥८५॥

बाई ईश्वरसामर्थ्यानं । बाई दुःखित जीवजंतु ग ।

सद्गुरु सामर्थ्यानें । विश्वपटींच ब्रह्मतंतू ग । मोहन०॥८६॥
बाई ईश्वरसृष्टीमध्यें । बाई नास्तिक बहू जन ग ।
सद्गुरुसृष्टीमध्यें । शिष्य अस्तित्वेंची पूर्ण ग । मोहन०॥८७॥
बाई ईश्वरकृपेमध्यें । बाई कर्मापूरतं फळग ।
सद्गुरुकृपायोगें । सेवकचि घननीळ ग । मोहन०॥८८॥
पार्थासी सांगे देव । भक्तांचा बांधला मी ।
गोपीकांछंदें नाचे ग बाई । ब्रह्माण्डाचा जो स्वामी ॥८९॥
बाई हरीनाम घेतां । कोण रे वाटे लाज ।
जाउनी चुलीपाशीं ग बाई । स्त्रियेचे करितां काज ॥१९०॥
बाई पाषाण तरूवर । असती जे वृंदावनीं ।
तयांसी प्रेमभावें ग बाई । उरीं धरी चक्रपाणी ॥९१॥
कृष्ण त्याचि गोपिका । गोपिका तोचि हरि ।
म्हणोनी आम्ही भावें ग बाई । लोळूं गोपी-पायांवरी ॥९२॥
बाई कृष्ण ग नवा आला । गोपीका पुरातन ग ।
जाणोनि ऐसें गूढ । जाऊं तिया लोटांगण ग । मोहन०॥९३॥
बाई जितुक्या गोपनारी । तितुके जगजेठी ग । (य४-३०)
सर्वांचिकडे मुख । न दिसे कोणा पाठी ग । मोहन०॥९४॥
गोपींच्या पुढें कदा । न येचि अभिमान ।
परि त्यांच्या अंतरीं जाया ग बाई । कृष्णें केलें हें विंदान ॥९५॥
गाईलें जें जें गीत । निर्लज्ज होवोनिया ।



तें सर्व जीवेभावें ग बाई । दिलें ज्ञानेश्वर पाया ॥९६॥
गोकुळीं नारायण । गोपिकां संगें खेळे ।
रूप तें निरखीतां ग बाई । निवती सर्व डोळे ॥९७॥
श्रीकृष्णजन्म झाला । तेव्हांचि आम्ही नारी ।
वरीला नारायण ग बाई । अनंतगुण हरी ॥९८॥
इतर अवतार । अंशांश वर्णियले ।
भक्तांच्या हृदयांत ग बाई । पूर्णत्वे कृष्णत्व आलें ॥९९॥
निर्गुण ब्रह्मांडांत । सगुण भक्ता घरीं ।
वेदांची साक्ष ऐसी ग बाई । पुराणादि आकारीं ॥२००॥
गोकुळीं कृष्णजन्म । स्वतंत्र लीला करी ।
तयाच्या गुणगानें ग बाई । तरती दुराचारी ॥१॥
गोपी म्हणे श्रीकृष्णाच्या । खोडीनें त्रासलें मी ।
लाडका तुमचा आह्मा ग बाई । स्वयें सांभाळावा मामी ॥२॥
जयाचें नाम घेतां । उद्धार पायीं लोळे ।
तें रूप नंदाघरीं ग बाई । आम्हीं देखीलें सांवळें ॥३॥
निजधामा कृष्ण गेले । म्हणणें हे वरी वरी ।
जनांनां होउनी गौप्य ग बाई । राहे भक्त हृदयान्तरीं ॥४॥
बाई कामनायुक्त देव । म्हणोनि न मिळे काला ग ।
प्रेमळ भक्तकृपें । लाभ आम्हांप्रति झाला ग । मोहन०॥५॥
बाई अनादि वेदांमध्यें । अखंड ऐशा मुक्ती ग ।
श्रीकृष्णकान्त माझा । सुरासुरां देतो मुक्ती ग । मोहन०॥६॥

बाई गोकूळ जनांतील । व्यक्ती हें तुझें अंग ।
तरि रक्षी आम्हा देवा ग बाई । करूनीया निःसंग ॥७॥
कपटी ती पुतनासुरी । जननीसम मानियली ।
सांडुनीया दयालु तो ग बाई । कोठें धरावी पाउली ॥८॥
गुणदोष जीच्या पोटीं । जीवांचि ऐसी माया ।
तिचा तूं नाश करी ग बाई । प्रकटोनी कृष्णराया ॥९॥
बाई हजार तोंड डोळे । तितुके हात पाय ग ।
व्यापुनी विश्व सारें । दशांगुलीं रीघे हृदयी ग ।
मोहन०॥२१०॥
शेषावरी निजला देव । कांहीं कारणालागोनि ।
जवळी ग आम्ही असतां । दुजे येउं नये कोणी ॥११॥
शरिराच्या काढुनी त्वचा । पादूका करूनी देवा ।
निजहातें प्रेमभावें ग बाई । अखंड घडो सेवा ॥१२॥
नको हें ब्रह्मज्ञान । पाहीजे शुद्धभक्ती ।
जेणें हरपे हें भान ग बाई । प्रकाशे स्मरण उक्ती ॥१३॥
घटाकाश उपमा देतां । बोध होय नाशीवंत ।
याचसाठीं सगुणरूपीं ग बाई । जीव अर्पिताती संत ॥१४॥
भस्माला जाळावया । समर्थ वन्हि नाहीं ।
तैसें या विक्षेपातें ग बाई । ज्ञान न जाळी कहीं ॥१५॥
जलाच्या प्रवाहानें । भस्म तें नष्ट होय ।
तैसें या विक्षेपातें ग बाई । हरवीती हरीपाय ॥१६॥



सर्वत्र व्यापी ब्रह्म । तरी तें आम्हा बंधु ।
सगुण एकदेशी ग बाई । श्रीकृष्ण कामसिंधु ॥१७॥
मोराच्या आंगीं डोळे । त्या नाही ज्ञानशक्ती ।
तैसें हें मिथ्या जग ग बाई । न पाहे साक्षीदीप्ती ॥१८॥
साक्ष्यची नाहीं काहीं । साक्षित्वें पहावें काई ।
म्हणोनीया साक्षसाक्षी । तूंचि अर्पी कृष्णपायीं ॥१९॥
न्याय्यांसीं देव विष्णू । अन्यायी नरां यम ।
सद्गुरु तैसा नोहे ग बाई । संतां पापीयां सम ॥२०॥
देवाचें आधीं नांव । नंतर रूप मीळे ।
सद्गुरु पाहतां दृष्टी ग बाई । नामा आधीं रूप कळे ॥२१॥
सत्य ते सत्य ते वृक्षादिक । चैतन्य जीवभाव ग । सखुगडणी ।
स्वानंद स्वानंद वासुदेव । स्वानंद वासुदेव ॥२॥
चारीही पुरुषार्थ । कल्पीत अध्यासाचे । (य४-३२)
पांचवें भक्तिबळ ग बाई । अखंड भावी साचे ॥२३॥
ज्ञानेश आणि कृष्ण । दोघांची एक परी ।
श्रीकृष्ण हृदयांत ग बाई । ज्ञानेश्वर ते शिरी ॥२४॥
श्रीरामपर
रावण ऐकोनीया । आतां पासोनि नको भीऊं ग ।
तुज आलीया प्रसंगाला । साह्य होतील चारी भाऊ ग ।
मोहनगिरीधारी०॥२५॥
बाई रामचंद्राच्या माझ्या । देवांगनाही दासी ग ।

सुरवर मुनिजन येती । धावोनि पायांपासी ग । मोहन०॥२६॥
बाई नीजला माझा राम । कोण  बिदीसी हांका मारी ग ।
जनाला तेंचि काम । उभ्या रहा क्षणभरि द्वारी ग ।
मोहन०॥२७॥
बाई लोकांचें घरीं बाळें । पृथ्वी न दे त्या थारा ग ।
श्रीराम माझा बाळ । दुधसागरांतला हीरा ग । मोहन० ॥२८॥
लोकांच्या लेंकरांला । सांगतें वेळोवेळा ग ।
देतें मी बहू भातूकें । येउनि रामासंगें खेळा ग । मोहन०
॥२९॥
बाई लोकांच्या लेंकराचा । बाई घरोघरीं सुकाळ ग ।
बहुत नवसानें । माझा जन्मला रामबाळ ग । मोहन० ॥२३०॥
बाई लोकांच्या लेंकराचे । वाकडे नाक डोळे ग ।
माझीया घरांमध्यें । सूर्यासारखी चारी बाळें ग । मोहन०
॥३१॥
नीजरे बाळा नीज । झोप येऊंदे लवकरी ग ।
थापटिते [४] मी तूज । सुख एकीनें सुखाकारी ग ।
मोहन०॥३२॥
लौकरि नीज रामा । येईल धांवुन लक्ष्मण ग ।
मग तुझिया वाट्याचें । दुध जाईल तो पिऊन ग । मोहन०
॥३३॥
जरि तूं निजलासी । तरी मी न दे दूध ग ।

२९



बाई तुजचि वेळोवेळा । पान्हा पाजीन प्रेमबद्ध ग । मोहन०
॥३४॥
तुझिया गुणापुढें । मी लोकाला हीणवीते ग ।
तूंही तैसा रडता । चित्तीं माझिया दुःख होतें ग । मोहन०
॥३५॥
रडसी जरी रामा । मात जाईल ही बाहेरी ग ।
रडका म्हणतील लोक । कोणि न देइल नोवरी ग
।मोहन०॥३६॥
सकळ बाईयांनो । तुह्मी ऐकुनि मुक्या बसा ग ।
माझिया बाळाचा कीं । नका करूं निद्रावळसा ग । मोहन०
॥३७॥
(य४-३३) बाई लोकांच्या लेकरांला । बाई लांकडांचे भूषण ग
।
माझिया बाळावरी । डोई हिऱ्याचें पिंपळपान ग । मोहन०
॥३८॥
लोकांच्या लेंकरांचा । बाई वापर धडधड ग ।
शहाणा राम माझा । झोप घेतो एकिया कड ग । मोहन०
॥३९॥
बाई लोकांच्या लेकरांला । बाई शिपाईपणा साजे ग ।
बाई माझे हे चारी बाळ । होति त्रिभुवनींचे राजे ग
।मोहन०॥२४०।

देवांच्या कार्यासाठीं । येथें आलासि शेषशाई ग ।
पुढें तुज कष्ट बहु । म्हणोनि सुखानें निद्रा घेई ग ।
मोहन०॥४१॥
माझीया घरीं जैसा । श्रीराम माझा बाळ ।
तयांचे इष्ट मित्र ग बाई । माझेच ते सकळ ॥४२॥
पंडीत गुणवंत । बाई माझा हा रघुराज ग ।
उठवूं नका कोणी । सुखे लागु द्या बाई नीज ग । मोहन०
॥४३॥
बाई निजला राम माझा । प्रेम प्यावया पुनः उठो ग ।
सकळविद्यागूण । ज्ञानेश्वरा अर्पूनि भेटो ग । मोहन० ॥४४॥
कामची रामरूप । नाहींसे करूनि मन ग ।
ज्ञानेशसुता कृष्णा । जातसे लोटांगण ग । मोहन० ॥४५॥

- - -

अमर कृष्णराव । हें जरी सत्य आहे ।
तरी तूं ऐसें करी ग बाई । पतित्व नित्य राहे ॥४६॥
मरण कृष्णा नाहीं । म्हणोनी गेली चिन्ता ।
परि सावित्री ऐसें ग बाई । नित्य मी व्हावें कान्ता ॥४७॥
सावित्री बाई मज । ऐसा द्या नित्य संग ।
पूर्वीच्या पत्नीसम ग बाई । न व्हावा व्रतभंग ॥४८॥
नारद कृष्णशापें । वेश्या त्या झाल्या नारी ।
मज दे ऐसा वर ग बाई । शाप न बाधा करी ॥४९॥





सावित्री वदे वाणी । बाळे! चिंता न करी कांही ग ।
शापाचि सोडी भीति । ज्ञानेश्वराचें साह्य घेई ग । मोहन०
॥२५०॥
संतांचि होई कन्या । कृष्णाची होई नारी ग ।
द्यावया शाप मज । नाहीं समर्थचि भूवरी ग । मोहन० ॥५१॥
संताचा रोष होता । श्रीकृष्ण साह्य न करी ग । (य४-३४)
कृष्णासी येतां क्रोध । संत रक्षिती नानापरी ग । मोहन०
॥५२॥
म्हणूनि आम्हा नाहीं । दोहीं पक्षीं शापाची भीति ग ।
यथेच्छ क्रीडोनीया । भोगुं श्रीहरि ब्रह्मराती ग । मोहन०
॥५३॥
पुराणाहूनी थोर । येथें वर्णीला अनुभव ग ।
ज्ञानेश्वराचे पायीं । वाहि एक हा जीवभाव ग । मोहन० ॥५४॥
सोळासहस्त्रनारी । सावित्री तितुक्या घरीं ग ।
म्हणोनि प्रार्थावया । नाहीं रिकामा पूतनारी ग ।
मोहन०॥५५॥
यासाठीं ब्राह्मणातें । मानोनि पितृभावा ग ।
कन्येच्या विनंतीनें । हरीनामामृत हें जेवा ग । मोहन० ॥५६॥
सावित्री व्रतामध्यें । बाई नारीचाचि सोहळा ग ।
म्हणोनि प्रार्थावया । पुढें झाली मी ये वेळा ग । मोहन० ॥५७॥
सकळ ब्राह्मणांची । बाई समष्टि ज्ञानेश्वर ग ।

म्हणोनि प्रार्थना ही । त्यांच्या अर्पीली पायांवर ग । मोहन०
॥५८॥
भ्रामरी गुंफेमध्यें । दीसति रूपें तीन ।
इतर दोन्हीं वंद्य ग बाई । नीळें तें समाधान ॥५९॥
शास्त्रांचा बोध जैसा । सिंधूचें खारें पाणी ।
सद्गुरुकृपाबोध ग बाई । चातकां मेघपाणी ॥२६०॥
शास्त्रें ती शब्दमय । रूपमय देवता ।
आत्मा तो ज्ञानमय ग बाई । सद्गुरु सर्वदाता ॥६१॥
अजपा गायत्रीचा । सोडीला सर्वछंद ।
नेत्रिं भरूनी जल ग बाई । मुखें गाऊं गोविंद ॥६२॥
अजपा गायत्रीनीं । जीवचि ब्रह्म होय ।
गोविंद नांव घेतां ग बाई । ब्रह्म ते जीव काय ॥६३॥
अजपा गायत्रीनी । क्रमानें मुक्ती होय ।
गोविंद म्हणे त्याचें ग बाई । मोक्षची वंदी पाय ॥६४॥
कल्पूनि खोटें दुःख । मोक्षाची व्यर्थ आशा ।
न भासे बंध मोक्ष ग बाई । पाहतां हृषीकेशा ॥६५॥
सूर्य तो कान्त माझा । चंद्र ती राधाराणी ।
सद्गुरु ज्ञानेश्वर ग बाई । सुषुम्ना ब्रह्मखाणी ॥६६॥ (य४-३५)
श्रीकृष्णा संगे जातां । चावट होती खेळ ।
पहाया ज्ञानेश्वर ग बाई । व्हावे विरक्तीबळ ॥६७॥
कृष्ण ते कल्पीं कल्पीं । बाई देखीले आम्ही नाना ग ।





सद्गुरु ज्ञानेश्वर । आम्हा अक्षय्य प्राप्त जाणा ग । मोहन०
॥६८॥
करूनी योगयाग । धावती सुखासाठीं ।
गोविंद नांव घेतां ग बाई । सुख तें धावें पाठीं ॥६९॥
श्रीकृष्णाच्या नांवाचें । कुंकूम तें कपाळीं ।
ज्ञानेश नांव घेतां ग बाई । कृष्णाची झाली बाळी ॥२७०॥
श्रीकृष्ण नांव घेतां । पुरुष-स्त्री भिन्नता ।
ज्ञानेश्वराच्या नावें ग बाई । कान्तची झाली कान्ता ॥७१॥
ब्रह्माहमस्मिबळें । न मानीति जे हरी ।
जळो तें ब्रह्मज्ञान ग बाई । चुकेना यमपुरी ॥७२॥
करूनि भगवद्भक्ती । उच्छेदिती सद्गुरु ।
तयांचा जो कां देव ग बाई । तो अंतीं यमाकारू ॥७३॥
सद्गुरु कृपाबळें । केलें जें निरूपण ।
ज्ञानेश्वराचे पायीं ग बाई । सजीव समर्पण ॥७४॥

*ज्ञानेश्वर आणि श्रीकृष्ण*

पोटींच्या पुत्रासाठीं । प्रार्थीलें ज्ञानेश्वरा ग ।
करूनि आतां कृपा । नेईल अलकापुरा ग । मोहन० ॥७५॥
हरीच्या कृपेंवीण । न होय गुरुकृपा ।
वळल्या गुरुनाथ ग बाई । समाधी मार्ग सोपा ॥७६॥
सुखाच्या साठीं जन । हिंडती दारोदारीं ।
सांडोनिया गुरुनाथा ग बाई । न पावतीच हरी ॥७७॥

योगाचें बळ ऐसें । मनाची शून्य स्थिती ।
श्रीहरी भक्तिबळें ग बाई । पूर्णता प्रेम चित्ती ॥७८॥
श्रीहरी भक्तिमध्यें । प्रेम तो द्वैत राहे ।
सद्गुरु भक्तीयोगें ग बाई । प्रेमचि कृष्ण होय ॥७९॥
आकाशाची नीळिमा । प्रकाश आंधारांत ।
नांदत अविरोधें ग बाई । साविया अखंडीत ॥२८०॥
तैसा साधु-दुष्टांसी । समान नीळा कृष्ण । (य४-३६)
विष तें दुष्ट नीळें ग बाई । भक्ता नीळें जीवन ॥८१॥
मृत्यु तो कृष्णनाथ । जन्म ती राधाराणी ।
सद्गुरु ज्ञानेश्वर ग बाई । चाळक काळस्थानीं ॥८२॥
बंधन आणि मुक्ती । कार्य हें अज्ञानाचें ।
ज्ञान तें भक्तिरूप ग बाई । पोसणें सज्ञनाचें ॥८३॥
बंधन अंधःकार । बाई सूर्य तें ज्ञानमुक्ती ग ।
सगूण प्रेमाकाशीं । बाई दोघांची ही समाप्ती ग । मोहन०
॥८४॥
निंब ते स्वर्गभोग । बाई साखर विष्णुस्थान ग ।
भोजनीं रुचें ऐसें । मम लवण वृंदावन ग । मोहन० ॥८५॥
अन्य न पाहावें मूख । म्हणुनी पतीनें अंध केले ग ।
रडतां विश्वासाहीं । गुरुमायेनें उचलीलें ग । मोहन० ॥८६॥
बोलिल्या बोलण्याची । बाई श्रीकृष्णा वाटे लाज ग ।
म्हणोनि देव भक्त । पायीं ज्ञानेश्वराच्या साज ग । मोहन०





॥८७॥
आळंदी लागीं जातां । मार्गी कोटिशः वृंदावन ग ।
सद्गुरु पहातां डोळां । अंग झालें हें नारायण ग । मोहन०
॥८८॥
समुद्रीं मिळोनिया । समुद्र गंगा होय ग ।
प्रवाह मागोनीया । एकत्वें येत जाय ग । मोहन० ॥८९॥
तैसा हा ब्रह्मभाव । जीवचि चक्रपाणी ग ।
मागोनि येत लोंढा । सेवाप्रेमाचें गोड पाणी ग । मोहन०
॥२९०॥
दोहोनि प्रेमें गाई । दुध देऊं तें शारङ्गधरा ग ।
काढोनि नवनीत । ज्योती ओवाळुं ज्ञानेश्वरा ग । मोहन०
॥९१॥
नाना ब्रह्माण्डासाठीं । देव एकलाची आपण ग ।
सद्गुरु पायांवरी । बहु देवांचि साठवण ग । मोहन० ॥९२॥
देवाच्या भजनानें । बाई एकला देव भेटे ग ।
सद्गुरु भजनानें । विश्वरूपचि देव थाटे ग । मोहन० ॥९३॥
बीज ते ब्रह्मरूप । बाई विराट जग सारें ग ।
फळतें कृष्णमूर्ती । रस सद्गुरु ज्ञानेश्वर ग । मोहन० ॥९४॥
देवाचें नांव घेतां । निघे बाहेर मुखांतुनि ग ।
सद्गुरु प्रतापानें । वाक्य अन्तरी जाय कानीं ग । मोहन०
॥९५॥

चित्त तो कृष्ण माझा । बाई आत्मा त्या गोपनारी ग । (य४-३७)

फेडाया वाचाऋण । सर्व अर्पीलें ज्ञानेश्वरीं ग । मोहन० ॥९६॥

नामानें नामानें निद्रानाश । शास्त्रानें जागरण ग सखुगडणी ।

सगुणी सगुणी स्वप्नभान । सगूणी स्वप्नभान ॥९७॥

जिव्हेनें जिव्हेनें निद्रानाश । दंतानें जागरण ग सखुगडणी ।

ओष्ठीं तें ओष्ठीं तें स्वप्नभान । ओष्ठीं तें स्वप्नभान ॥९८॥

अखंड निद्रानाश । खंडीत जागरण । प्रक्षेपीं स्वप्नभान ।

हरिनें मुरली वाजविली कुणीकडे ।

रमलं ग माझं मन । चंद्रभागेच्या पलीकडे ॥९९॥

बालत्वी निद्रानाश । वृद्धत्वी जागरण ।

तारुण्यें स्वप्नभान । हरिनें मुरली वाजविली कुणीकडे ॥३००॥

अखंड अखंड एकरस । सद्गुरु आदिनाथ ग सखुगडणी ।

तत्पायीं तत्पायीं दंडवत । तत्पायीं दंडवत ॥१॥

व्यापक व्यापक एकभावें । मच्छींद्र नाथ राणा ग सखुगडणी ।

देखीला देखीला नेत्री ध्याना । देखीला नेत्री ध्याना ॥२॥

मुक्तीचें मुक्तीचे मुख्यस्थान । सोपानदेव काका ग सखुगडणी ।

वंदीला वंदीला शिरी नीका । वंदीला शिरीं नीका ॥३॥

ज्ञान तो ज्ञान तो शिवरूप । पार्वती नित्यवृत्ती ग सखुगडणी ।

संपुटी संपुटी विश्ववृत्ती । संपुटी विश्ववृत्ती ॥४॥





ऐक्याच्या मध्यभागीं । प्रकाशाच्या लहरी ।

तैसा या विश्वामध्यें ग बाई । वृत्तिरूपें विलसे हरी ॥५॥

जीभेचें नांव घेतां । जीभेसीच कलंक ।

तैसा हा आत्मा शब्द ग बाई । ब्रह्मींही निरर्थक ॥६॥

नाकाचा नाकाप्रति । कल्पांतीं नये वास ।

तैसी ब्रह्मी वृत्तिधारा ग बाई । पावली मिथ्यत्वास ॥७॥

बाई तरंगरूपा येता । न्यून तें झालें पाणी ।

तैसें या विश्वरूपी ग बाई । ब्रह्मचि रोधपणी ॥८॥

वेदाचा शब्दलोट । सृष्टींत फोफावला ।

सद्गुरु वाक्यलोट ग बाई । ब्रह्मसिंधूस मिळाला ॥९॥ (य४-३८)

बाई जोवरी आहे प्रीति । तोवरी सखा देव ग ।

ब्रह्मानुभवें पाहतां । नित्य सखा गुरुराव ग । मोहन० ॥३१०॥

अखंड एकरस । असोनि अस्ति भाति ।

वाटेना प्रियपण ग बाई । परमार्थ ऐक्यरीती ॥११॥

बाई वेदाच्या वाक्ययोगें । ब्रह्म तें फळ मिळे ग ।

सद्गुरुवाक्ययोगें । ब्रह्मत्व पायीं लोळे ग । मोहन० ॥१२॥

ईश्वर प्रसादाने । वाढे ज्ञानाभिमाान ग ।

सद्गुरुप्रसादानें ग बाई । ब्रह्मी वृत्ति समाधान ॥१३॥

ईशप्रसादफळ । कुशाग्र वेदीं बुद्धि ।

गुरुप्रसाद फळ ग बाई । ब्रह्मीच परसिद्धी ॥१४॥

जेवीता जेवणातें । रूचीतें जाणपण ।

पाहुनी पर ऐसें ग बाई । रसाचें विनाशन ॥१५॥
अहंकारा रहित । निर्गुण शब्द ऐसा ।
तयातें अभ्यासितां ग बाई । अभिमान ये कैसा ॥१६॥
अंतरी जे निर्गुण । बाह्य तेचि सगुण ।
सद्गुरु कृपाबळें ग बाई । दोहीसी वांझपण ॥१७॥
निघती जे जे शब्द । चिद्रूप ते ते सारे ।
तेथें न भासे हरी ग बाई । अबुद्धपण बारे! ॥१८॥
हरीच्या भक्तीसाठीं । हरीची नाहीं चाड ।
आत्मार्पणासाठीं ग बाई । पाहीजे हरी गोड ॥१९॥
हरीची प्रेमें भक्ती । आत्मत्वें भिन्न केली ।
तरी ती एकदेशी ग बाई । न मीळे हरीखोली ॥३२०॥
आपण व्हावें नाम । हरी तो व्हावा रूप ।
संकल्प सच्चित्सुख ग बाई । ब्रह्मचि विश्वरूप ॥२१॥
नाम तेंचि निर्गुण । रूप तेंचि सगुण ।
सच्छिष्य द्दष्टा त्याचा ग बाई । सद्गुरु अधिष्टान ॥२२॥
हरि रूपाची समष्टी । सद्गुरु कृपाकंद ।
हरिनामाचि समष्टी ग बाई । अखंड साधुवृंद ॥२३॥
समुद्रही पाहोनि । जळ पीण्या पुरतें घेणें । (य४-३९)
जाणोनी निर्गुण तैसें ग बाई । सगुणातें भजणें ॥२४॥
ब्रह्म तो कृष्णनाथ । ब्रह्मविद गोपनारी ।
सर्वही जीवें भावें ग बाई । अर्पील्या ज्ञानेश्वरी ॥२५॥

३४



भुजंगी भुजंगी कात्यायनी । तियेच्या कृपाबळे ग सखुगडणी ।
पर्णीले पर्णीलें मेघनीळें । पर्णीलें मेघनीळें ॥२६॥
संकेतीं संकेतीं धरी भूतें । व्यापोनी एकठाव ग सखुगडणी ।
महात्म्य महात्म्य पूर्णयोगू । तो वंदूं वासुदेव ग सखुगडणी ॥२७॥
दीधला दीधला ज्ञानेश्वरे । मंत्र द्वादशाक्षरी ग सखुगडणी ।
तयाच्या तयाच्या योगें कीजे । वासुदेवातें नमस्कार ग सखु०॥२८॥
आपुला आपुला अहंकार । अर्पावा परमेश्वरी ग सखुगडणी ।
सूर्याच्या सूर्याच्या मध्यें रूप । सगुणसाक्षात्कार ग सखु० ॥२९॥
या देहीं या देहीं अहं जैसा । भावनेविण आहे ग सखुगडणी ।
तैसाची तैसाची देवी पाहे । तैसाची देवी पाहे ॥३३०॥
होवोनी होवोनी स्वये देव । करावी गुरुसेवा ग सखुगडणी ।
श्रुतीचा श्रुतीचा हाचि ठेवा । श्रुतीचा हाचि ठेवा ॥३१॥
शिष्यानें शिष्यानें शिव व्हावें । शिवा गुरूतें भजावे ग सखुगडणी ।
अद्वैतीं अद्वैतीं प्रेम घ्यावें । अद्वैतीं प्रेम घ्यावें ॥३२॥
फराळ फराळ ब्रह्मज्ञान । भोजन नामवृत्ती ग सखुगडणी ।
गुरुपायीं गुरुपायीं नित्यतृप्ती । गुरुपायीं नित्यतृप्ती ॥३३॥
गोविंद मना येतो । इतर आवडेना ।

जयाच्या कृपाबळें ग राधे । नासती भाव नाना ॥३४॥

रामाच्या प्रेमामध्यें । भिल्लीणी ती विराली ।

भक्तिप्रेमबळे ग राधे । सायुज्या प्राप्त जाली ॥३५॥

उठतां उठतां वैसतांही । समीप नभ आहे ग सखुगडणी ।

तैसा जो तैसा जो निघे शब्द । तें हरीनाम होय ग सखु०॥३६॥

वामन वामन ज्ञानेश्वर । श्रीकृष्ण एकपणी ग सखुगडणी ।

म्हणोनी तुह्मी आम्ही । दोघीही गुरुबहिणी ग सखुगडणी ॥३७॥

सद्गुरु सद्गुरु लीलायोगें । तुम्हा आम्हा हातोफळी ग सखुगडणी ।

श्रीकृष्णी श्रीकृष्णी खेळू मेळी । श्रीकृष्णी खेळू मेळी ।३८(य४-४०)

पहीला भाव दृढ । असावा गुरुपायीं ।

मग हें ब्रह्म सारें ग राधे । होईल विश्व ठायीं ॥३९॥

दुःखातूनि वेगळे । न ये जे सुखपणा ।

ऐसें जें सुख कोणी ग बाई । ज्ञानेश पायीं जाणा ॥३४०॥

जयाच्या जयाच्या शब्दयोगें । ब्रह्म तें शिष्य होय ग सखुगडणी ।

गुरु तो गुरु तो ब्रह्माहूनी । कैसा पैं श्रेष्ठ नोहे ग सखु० ॥४१॥



वक्ता तो कृष्णनाथ । श्रोता तो कुंतीसुत ।

संधी जो सदुपदेश ग बाई । ते श्रुती गीतामृत ॥४२॥

सद्गुरु सत्संगानें । ब्रह्म तें मातीमोल ।

सेवीतां गुरुचरण ग बाई । भक्तीचे येती डोल ॥४३॥

ईश्वरसंग होतां । पाताळीं गेला बळी ।

सद्गुरुसंग येतां ग बाई । वैकुंठ ये भूतळीं ॥४४॥

नसोनी करी जग । ईश्वरची दांभिक ।

सद्गुरु बाप माझा ग बाई । सर्वदां निष्कलंक ॥४५॥

रामाचें रामाचें नाव घेतां । हृदयीं प्रेम दाटे ग सखुगडणी ।

सद्गुरु सद्गुरु कृपाबळे । विश्वीं या भक्ती प्रकटे ग सखुगडणी ॥४६॥

जयातें लज्जा वाटे । सद्गुरु नाम घेतां ।

ऐसें हें काय मुख ग बाई । वर्णीना गुरुसत्ता ॥४७॥

ईश्वर-सृष्टीमध्यें । कल्पीत बंध दुःख ।

सद्गुरु-सृष्टीमध्यें ग बाई । बंध तें मोक्षसुख ॥४८॥

देवाच्या देवाच्या श्रुतीयोगें । अविद्या सत्य भासे ग सखुगडणी ।

श्रीगुरु श्रीगुरु वाक्ययोगें । अविद्या कांही नसे ग सखु० ॥४९॥

अखंड गाती जया । शास्त्रें वेद पुराणें ।

सद्गुरु पायीं तो मी । पाहीला डोळियानें ।

हरीनें मुरली वाजविली कुणीकडे ।

रमल ग माझं मन । चंद्रभागेच्या पलीकडे ॥३५०॥

अक्षय्य सुखासाठी । करीसी तळमळ ।
तरी जा पंढरीसी ग बाई । भेटी घे घननीळ ॥५१॥
बाई गमन करिताची । रमणप्रीती वाढे ग । (य४-४१)
भंगचि रंग करी । मन वाकोनिया निवाडे ग । मोहन० ॥५२॥
दृष्टान्ती सत्य वाटे । बाई सिद्धान्ती तैसें नाहीं ग ।
मायेचे शास्त्ररूप । नीत बोलति संत ग्वाही ग । मोहन० ॥५३॥
सिद्धान्ती साचभाव । दृष्टान्त नाहीं जया ।
तें जाणा श्रौत ब्रह्म ग बाई । यद्ज्ञानें नाशी माया ॥५४॥
दृष्टान्त विश्वरूप । सिद्धान्त ब्रह्म होय ।
सगुण भक्तीमध्यें ग बाई । दोहींचा समन्वय ॥५५॥
तंवची ती विद्वत्ता । अविद्या जेव्हा नाशे ।
नातरी शब्दज्ञान ग बाई । बांधीत अहंपाशें ॥५६॥
असोनी चित्ती प्रेम । संकोच भय योगें ।
ती भक्ती देवाप्रती ग बाई । नाणीच दृष्टीयोगें ॥५७॥
हातें जें घडे काहीं । म्हणोनी रुष्ट मना ।
प्रेमाचें करणे न्यून ग बाई । गौण तें संतजनां ॥५८॥
सकळही संतांचा । मानोनी ब्रह्मवेष ।
वामनमूर्तीमध्यें ग बाई । करी तूं समावेश ॥५९॥
रूपें तीं भिन्न भिन्न । नाम तें एक घेई ।
मानोनी समावेशा ग बाई । शरण जा गुरुपाई ॥३६०॥





रूपाची दृश्य स्थिती । नाम तें नादमय ।
श्रीकृष्णप्रेमबद्ध ग बाई । मस्तकी गुरुपाय ॥६१॥
वामन आम्ही तुह्मी । भेदाचा नाहीं विखो ।
म्हणोनी वामन नामें ग बाई । चित्तीं हें विश्व लेखो ॥६२॥
योगाचें बळ ऐसें । मनाची शून्यस्थिती ।
श्रीहरी भक्तीयोगें ग बाई । पूर्णता प्रेम चित्ती ॥६३॥
श्रीहरीभक्तीमध्यें । प्रेम तो द्वैत राहे ।
सद्गुरुभक्तीयोगें ग बाई । प्रेमची कृष्ण होय ॥६४॥
वळण वळण लागे मना । गोविंद नामगानी ग सखुगडणी ।
दोन्हीही दोन्हीही डोळां दिसों । सगुण शार्ङ्गपाणी ग सखु०॥६५॥
हें पण तें पण बाई । इदंता तदंता सिद्धी ग ।
मिळाया कृष्णमूर्ती । दृढ साधावी ब्रह्मबुद्धी ग । मोहन० ॥६६॥
(य४-४२) पणही केला जरी । नरशरीरीं साधनाचा ।
परि मिळाया कृष्ण ग बाई । लीन होवोनी शरिरी नाचा ॥६७॥
रमेच्या रमेच्या गृहीं सुख । न मानुनी गोविंद ग सखुगडणी ।
गोकुळी गोकुळी गोपीसाठीं । करीत ब्रह्मानंद ग सखुगडणी ॥६८॥
थरारी थरारीला भूगोल । वाजतां पांचजन्य ग सखुगडणी ।
भक्त ते भक्त ते सुखी झाले । विराला कलह अन्य ग

सखु०॥६९॥

चिंता ही चिंता ही सर्व काळ । लागली प्राणीगणा ग सखुगडणी ।

यास्तव यास्तव सांडुनी मी । उभी श्रीकृष्णांगना ग सखु० ॥३७०॥

तत्पद तत्पद ईशलक्ष्य । त्वंपद जीवलक्ष्य ग सखुगडणी ।

दोहींचा दोहींचा ऐक्यभाव । असिपदी होय ज्ञानें ग सखु० ॥७१॥

दळण दळावया । उरलें नाहीं काहीं ।

प्रेमाचें पक्वान्नें ग बाई । पूजीला शेषशाई ॥७२॥

दळण दळू दळू । हाताला आले फोड ।

श्रीकृष्णजेवणासाटीं ग बाई । सर्व ही केलें गोड ॥७३॥

अहं तें देहज्ञान । सोहं तें जीवपण ।

श्रीकृष्णभक्तीमध्यें ग बाई । नाहींच तें मीपण ॥७४॥

दुःख तें देहामाजी । सुख तें जीवाठायीं ।

श्रीकृष्णभक्तीमध्यें ग बाई । भोक्तृत्व नसे काही ॥७५॥

शास्त्र तेचि विषय । संकेत ईशरूप ।

सत्व तें कृष्णरूप ग बाई । स्वानंद कृष्णरूप ॥७६॥

शीर हे जीवन्मुक्ती । हरीच्या पायीं वाहू ।

हृदयप्रेमामध्यें ग बाई । दोघेही एक होऊं ॥७७॥

वेदान्तमुक्तीफळें । संतोष नाहीं झाला ।





म्हणोनी भागवतीं ग बाई । गाईली भक्तिलीला ॥७८॥

जयाच्या उपदेशी । जाहली कृष्णपायी ।

तयाच्या पायाहूनी ग बाई । ओवाळूं जीवन्मुक्ती ॥७९॥

हरीच्या वेदशब्दें । जीवासी कर्मभोग ।

सद्गुरु शब्दयोगें ग बाई । नासतो भवरोग ॥३८०॥

देव तो देव तो आंधळ्याचा । हात धरूनी नेतो ग सखु०(य४-४३)

सद्गुरु सद्गुरु कृपामूर्ती । आंधळ्या डोळे देतो ग सखुगडणी ॥८१॥

रुक्मिणी ऐशा स्त्रिया । तुज प्रिय नारायणा ।

दासी मी नेत्रांधळी ग बाई । ठेवि झाडाया आंगणा ॥८२॥

सुवासिनी बायकांना । पतीच गुरुदेव ।

विधवासाठी आहे ग बाई । स्वामी तो रमाधव ॥८३॥

श्रीखंड खाऊ खाऊ । दिवस झाले बहू ।

श्रीकृष्णा तुम्हा संगे ग बाई । वृंदावनीं तो रास पाहू ॥८४॥

सोळासहस्त्रनारी । बाई सावित्री तितुक्या घरी ग ।

म्हणूनी प्रार्थावया । नाहीं रिकामा पुतनारी ग । मोहन० ॥८५॥

म्हणूनी ब्राह्मणातें । बाई मानूनी पितृभावा ग ।

कन्येंच्या विनंतीने । हरिनामामृत हे जेवा ग । मोहन० ॥८६॥

सावित्रीव्रतामध्यें । बाई नारीचाची सोहळा ग ।

म्हणुनी प्रार्थावया । पुढें झालें मी इये वेळे ग । मोहन० ॥८७॥

आपुल्या पितयाचें । वर्णीशी काय गुण ।
राधेसी समजावितां ग बाई । तरि अधिक घेई मान ॥८८॥
चित्तवृत्तीचा रोध । तयाचा नांव योग ।
तो साधे हरीप्रेमीं ग बाई । लाधता विप्रयोग ॥८९॥
मन तें कर्तारूप । प्राण तो कारणरूप ।
शरीरकार्ययोग ग बाई । सर्वही मायारूप ॥३९०॥
कार्य कारण कर्ता । तिन्हीही वृत्तिसत्ता ।
ईश्वरप्रेमामध्यें ग बाई । तिहीची एकात्मता ॥९१॥
आरूढ वृत्तिवरी । तेव्हांची भोक्ता जीव ।
श्रीकृष्णप्रीतीमध्यें ग बाई । सुखदुःखा नाहीं ठाव ॥९२॥
नामानें जाती मळ । विक्षेप ध्यानसंगे ।
प्रेमें आवरण नाशे ग बाई । भक्तीत तिन्ही अंगें ॥९३॥
आभास संकल्पाने । सामर्थ्य दृष्ट्या अंश ।
परमार्थदृष्टी एक ग बाई । दोन्हीही जीव ईश ॥९४॥
कानाच्या मध्यभागी । चिण चिणी उठे नाद ।
भ्रूमध्यें वेणुस्थानीं ग बाई । हृदयीं परमानंद ॥९५॥ (य४-४४)
तुषार धूम अग्नि । खद्योत चंद्र सूर्य ।
ब्रह्माची सर्वरूपे ग बाई । समष्टी दृश्य होय ॥९६॥
शरीर शीर गळा । समत्वें ऐसा धरी ।
पाहातां नाकावरी ग बाई । दीसेल सखा हरी ॥९७॥
चाराया जासी गाई । रूतती काटे पायीं ।





बहुत क्षोभ वाटे ग बाई । आमुचीया हृदयीं ॥९८॥
मुखकमलाहूनी । वरीष्ठ भक्तां पाय ।
सत्तीर्थ भागीरथी ग बाई । म्हणोनी श्रेष्ठ होय ॥९९॥
पतिव्रतेचा धर्म । पतीची आज्ञायुक्त ।
तैसाची आम्हालागी ग बाई । सखा हा गोपीकान्त ॥४००॥
करूनी कृष्णसेवा । झालें जें पुण्य कांहीं ।
तें सर्व जीवें भावें ग बाई । दिलें ज्ञानेश्वरपायीं ॥१॥
अर्पील्यावरी पुण्य । नलगें आतां कांहीं ।
तनुमन नित्य राहो ग बाई । ज्ञानेश्वराच्या पायीं ॥२॥

*याोग प्रक्रिया*

''स''कार ऊर्ध्व जाय । भृकुटीमध्यभागें ।
व्यापक परब्रह्म । प्रकट होय अंगें । साजणी बाई० ॥३॥
''बिंदू''च्या अग्रभागी । प्रतीती रूपी होते ।
सूर्य चंद्राच्यामध्यें ग बाई । मध्यस्थ वाणी होते ॥४॥
''स''कारें हृदयस्थ । दहर प्रकट होते ।
प्रकट साही चक्र । समष्टी भाव हो ते । साजणीबाई० ॥५॥
प्रथम पाददृष्टी । नंतर हास्यमुख ।
विलोकन भाव''बिंदु'' । अग्रे बाई ते सुख । साजणीबाई० ॥६॥

*योगसाधना*

*निर्गुणातून सगुणानुभव*

निर्गुण हंसरूप । सगुण हरीनाम ।

दोहोच्या ऐक्यभावें । अखंड शुद्ध प्रेम । साजणीबाई० ॥७॥
वेदाचे गहीवर । पुराणाचें असे ते माहेर ग ।
श्रीराम हंसामध्यें । पिण्ड-ब्रह्माण्ड एकाकार ग । मोहन० ॥८॥
तरुणी ‘स्त्री’ ते होता । पतीची सेवा करी ।
तैसी होय हरीभक्ति ग बाई । ब्रह्म झालीयावरी ॥९॥
बाई नाम तें ब्रह्मरूप । रूप ती जीवन्मुक्ती ग । (य४-४६)
दोहीच्यामध्यें प्रेम । तेचि अखंड कृष्णभक्ती ग । मोहन० ॥४१०॥
बाई वाणीच्या अग्री नाम । बिंदूच्या अग्री रूप ग ।
बुद्धीच्या अग्री प्रीति । अवघे सगुण ब्रह्मरूप ग । मोहन० ॥११॥
बिंदूच्या चक्रावरी । वायूचा एक ठाय ।
दीसते दिव्यदीप्ती ग बाई । सावळी मूर्ती होय ॥१२॥
हंकार सकाराच्या । मध्यस्थ ॐकारू ।
श्रीहरी एकपद ग बाई । सगुण निरक्षरू ॥१३॥
बिंदूच्या अग्रभागी । अग्निचेची कल्लोळ ।
तयाच्या मध्यस्थानी ग बाई । सांवळा घननीळ ॥१४॥
जलाचा एक बिंदु । अग्नीचा मध्यभाग ।
त्यागुनी भूतें पांच ग बाई । बह्मतनु ही चांग ॥१५॥
उजव्या तळहाती । राहती पाय दोन्ही ।
मस्तकबिंदुभावें ग बाई । देखीला चक्रपाणी ॥१६॥

३९



हृदयगृहामध्यें । दोघेही कामी एक ।
मी पत्नी कृष्ण पती ग बाई । परि नाहीं वेगळींक ॥१७॥
ते पतीपाय चित्तीं । सेवीतां दृढभावें ।
पूर्ण सुकृतमोक्ष ग बाई । लाधलासे स्वभावें ॥१८॥
मोक्षाचें पुण्य सारे । श्रीज्ञानेश्वरपायीं ।
अर्पूनी जन्मजन्म ग बाई । वाहिली जीव डोई ॥१९॥
रूपाच्या मध्यभागी । दो भावे दिसे शुद्धि ।
युद्ध हे दोघांमध्यें ग बाई । भासे या नीलबुद्धि ॥४२०॥
सूक्ष्मदृष्टीपुढें । बिंदुरूप प्रणव गुणगुण ग ।
युक्त हे नोहे आंगी । पदध्यानीं सुवे सगुण ग । मोहन० ॥२१॥
वाच्यांश सृष्टीकर्ता । लक्ष्यांश तो षड्गुण ।
कामना शुद्धा ते ग बाई । शुद्ध वेगळेपण ॥२२॥
आनंद अस्ति भाति । प्रियत्वा एक ख्याती ।
हे असिपदध्यान ग बाई । चिद्भावें या निवृत्ति ॥२३॥
जीव-ईश्वरां दोघां । आभास म्हणें श्रुती ग ।
तयाचा अर्थ ऐसा । लक्ष्य लक्षण स्फूर्ती ग । मोहन० ॥२४॥
तटस्थ लक्षणानें । आभास राधापती ग । (य४-४६)
आरूढपण देई । आम्हा सत्व तें जीवाप्रती ग । मोहन० ॥२५॥
स्वरूपलक्षणाने । आभास नाहीं कोणी ।
परमार्थदृष्टी योगे ग बाई । जीवेश एक दोन्ही ॥२६॥
एकत्व कळल्यावरी । अहंकार होवो पाहे ।

म्हणोनी जरी ब्रह्म ग बाई । तरि सेवी कृष्णपाय ॥२७॥
जरी हा एक झाला । तरी बुद्धि-आश्रित ।
म्हणोनी एकदेशी ग बाई । भजावा कृष्णनाथ ॥२८॥
चैतन्य जरी एक । तरी न व्यापे बुद्धि ।
हा आहे न्यून भाव ग बाई । ध्यावा तो कृपानिधी ॥२९॥
जोंवरी देहभाव । तों कामना न सोडी ।
म्हणोनी व्हावें ब्रह्म ग बाई । नंतर भक्तिगोडी ॥४३०॥
केवळ एकदेशी । व्यापकमिषें भीती ।
तयांचे द्वैतभाव ग बाई । पशूसमान भक्ती ॥३१॥
व्यापक घेवोनिया । सगुणीं नाहीं प्रीती ।
कल्पना मिथ्या त्यांची ग बाई । बुद्धीस न ये स्थिती ॥३२॥
हरीच्या व्याप्तीमध्यें । आपणचि विरावे ।
व्हावया एकसाक्षी ग बाई । सगुण आठवावें ॥३३॥
अब्धीचा बिंदु घेतां । घ्यावया पुनः धैर्य ।
तैसा जाणोनी हरी ग बाई । भजावे सगुणपाय ॥३४॥
सिंधूस जाणोनिया । तहाने पुरते घेणें ।
तैसें व्याप्त ओळखून ग बाई । सगुण ओळखणें ॥३५॥
समस्त सूर्य पाहतां । लागोनी जाती डोळे ।
व्यापक विचारितां ग बाई । तैसेचि जन भूले ॥३६॥
डोळ्याचाचि प्रकाश । सूर्याचे ठायीं घडे ।
तैसा हा बुद्धिभाव ग बाई । कृष्णपायीं सांपडे ॥३७॥





आरूढ जीवपण । ईश्वर अधिष्टान ।
सगुणी एक होती ग बाई । हृदयी प्रेमठाण ॥३८॥
अधिष्टान ईश्वर । बुद्धीत सगुण होय । (य४-)४७)
आरूढ जीवभाव ग बाई । पायीं विरोनि जाय ॥३९॥
निर्गुण विचारीतां । विश्वासी वेगळीक ।
सगुण ध्यातां भावें ग बाई । ब्रह्म विश्व हे एक ॥४४०॥
निर्गुण विचारीतां । क्षणेक वृत्ति मुरे ।
सगुण ब्रह्म कृष्णी ग बाई । अन्वयें प्रेम स्फुरे ॥४१॥
निर्गुणामध्यें सुख । अपेक्षे सदा राहे ।
सगूणीं प्रेमसुखें ग बाई । विश्वही सुखी होय ॥४२॥
उत्थान नाही चित्ता । या नांव दुःखनाश ग ।
विरणे प्रेमामध्यें । आनंदप्राप्ती हीचि विशेष ग । मोहन० ॥४३॥
म्हणोनी मोक्षरूप । बाई सगुण एक हरी ग ।
ऐसा अनुभव नित्य । सगुणभक्तांचिया अंतरी ग । मोहन० ॥४४॥
मोक्षाच्या मध्यभागीं । आनंद भोक्तृभाव ।
सगूण प्रेमामध्यें ग बाई । भोक्ते हे वासुदेव ॥४५॥
श्रीकृष्ण शब्द गोड । गोडचि रूपभाव ।
सगूण ऐसा ध्यातां ग बाई । विषयीं मोक्षठेव ॥४६॥
सगूण हरीसेवा । करोनी मिळवीलें ।

जें कांही सुकृत तें ग बाई । गुरुचरणीं अर्पीयलें ॥४७॥
जयाच्या कृपायोगें । श्रीकृष्णनाथ पती ।
ते पाय आम्हां श्रेष्ठ ग बाई । तनुमनें तेथ प्रीती ॥४८॥
श्रीकृष्णसेवापुण्य । अर्पीलें ज्ञानेश्वरा ।
तिष्ठत उभी आहे ग बाई । सांष्टांगें नमस्कारा ॥४९॥
प्रकाश तम दोन्ही । तेजरूपत्वाते येती ।
तैसें हे जडाजड ग बाई । चिद्रूपें दोन्ही होती ॥४५०॥
बोलणें हरीनाम । मौन तें ज्ञानदृष्टी ।
ययांही दोघाप्रती ग बाई । श्रीहरीप्रेमें पुष्टी ॥५१॥
देवाते देवपण । सद्गुरुकृपें आहे ।
यालागीं सर्वांभूतीं ग बाई । वंदीले तेचि पाय ॥५२॥
भजकां भजे हरी । म्हणोनीया तो द्वैत ।
सद्गुरू तैसा नोहे ग बाई । ब्रह्मत्वीं भावी भूत ॥५३॥ (य४-४८)
सद्गुरु दावी तरी । अद्वैती कृष्ण भेटे ।
तयाच्या कृपेविण ग बाई । द्वैतची भक्ती वाटे ॥५४॥
सद्गुरुवचनानें । उघडे प्रेमपेटी ।
या विरुद्ध जे म्हणती ग बाई । तयांचि नको गोष्टी ॥५५॥
दिसे तें कृष्णरूप । अंतरीं हरीप्रीती ।
दोनीही मिळोनिया ग बाई । सद्गुरू कृपामूर्ती ॥५६॥
हेतुवांचुनि कांहीं । दया न करी हरी ।
अहेतुक ही दया ग बाई । सद्गुरु माय करी ॥५७॥





हरी तो नव्हे गुरू । गुरु तो होय हरी ।
ऐसीया भक्तिभावें ग बाई । न उरे कोठें उरी ॥५८॥
कृष्ण तो गुरुपायीं । न जाणे मुखाप्रती ।
यालागीं हरीहूनि ग बाई । वरिष्ठ गुरुप्रीती ॥५९॥
सत्पद राधारूप । चित्पद कृष्णमूर्ती ।
सद्गुरु सुखध्यान ग बाई । एकची तिन्ही मूर्ति ॥४६०॥
दुष्टांतें देव मारी । भक्ताते स्वये तारी ।
सद्गुरु तैसा नोहे ग बाई । समान दोघा तारी ॥६१॥
श्रीकृष्णाचे शरीर । मायेची मूळतनु ।
सद्गुरु अन्तर्बाह्य ग बाई । प्रकाश ब्रह्मभानु ॥६॥
भक्तांच्या अभिमानें । सोडोनी हरी जाय ।
शिष्यांच्या अभिमानें ग बाई । पोषीत गुरुमाय ॥६३॥
अनंत हरी भजतां । सद्गुरु नये घरीं ।
सद्गुरु भावें भजतां ग बाई । श्रीकृष्ण सेवा करी ॥६४॥
शिष्य तो बाह्य रूप । कृष्ण तो अन्तर्मूर्ती ।
मिळोनी दोन्ही भाव ग बाई । सद्गुरुपायावरती ॥६५॥
हरीच्या भक्तीमध्यें । अंतत्व दोहो भासे ।
सद्गुरुप्रेमामध्यें ग बाई । आद्यतत्वीं तें दिसें ॥६६॥
श्रीकृष्णभक्ती करितां । वियोगीं प्रेम जोडे ।
सद्गुरुचरणसेवे ग बाई । संयोगीं प्रीती वाढे ॥६७॥
पवन मन काया । सर्वही आत्माराम । (य४-४९)

तो अर्पीतां हरीपायीं ग बाई । विश्वची होय प्रेम ॥६८॥
वाचेंत हरीनाम । मनांत हरीध्यान ।
डोळ्यांत कृष्णरूप ग बाई । जगीं हे त्याचे गुण ॥६९॥
मेघांनीं व्याप्त नभ । भूतल श्यामवर्ण ।
रात्रीतें भितो कृष्ण ग बाई । राधे तूं गृहा आण ॥४७०॥
ऐसीया नंदगृहा । लागती ज्याचें पाय ।
त्या राधामाधवाचा ग बाई । सर्वथा असो जय ॥७१॥
हरीचें नाम घेतां । समोर उभा हरी ।
सद्गुरु तैसा नोहे ग बाई । अंगेंची कृष्ण करी ॥७२॥
मायेच्या पोटीं येतां । उत्तम व्हावा वर ।
तैसें तूं करी अंबे ग बाई । पती दे शारङ्गधर ॥७३॥
झालीस जरी माय । तरि एवढें कार्य करी ग ।
सांवळा वृंदावनीं । वसे तो जोडा द्यावा हरी ग । मोहन०
॥७४॥
व्हावया तुझें नांव । मज हेंचि शिकवी आई ग ।
सर्वदा वाढो प्रेम । नंदनंदनकान्ता पाही ग । मोहन० ॥७५॥
सांवळ्या हरीपायीं । जयांचि भक्ती भोळी ग ।
ते गोपीपदरज । म्यां कुंकूंच केलें भाळीं ग । मोहन० ॥७६॥
देवीनें कन्यादान । करीतां वृंदावनीं ग ।
गोपीका सांभाळीती । मज सापत्न नाहीं मनीं ग । मोहन०
॥७७॥





माझिया मनामध्यें । कधिं येती सापत्न गोष्टी ग ।
परि गोपीका बहिणी । मज रक्षिती होउनी कष्टी ग ।
मोहन०॥७८
गोपीका शक्तीरूप । बाई श्रीकृष्ण शिवरूप ग ।
दोन्हीही आटोनीया । ज्ञानेश्वर गुरू बाप ग । मोहन० ॥७९॥
वृत्तीचा अभिमान । सर्व हरितो कृष्णराजा ग ।
ध्यानाचा अभिमान । गोपी वारिती सर्व माझा ग । मोहन०
॥४८०॥
विश्व हरीचें गूण । बाई हरीचें रूप बुद्धि ग ।
आत्मा तो कृष्णप्रेम । संकेताहूनी श्रेष्ठ शुद्धि ग । मोहन०
॥८१॥
आत्माचि प्रेम होतां । तरि विश्वींचा द्वेष गेला ग ।
सगुणध्यानयोगें । ब्रह्मभावही हरपला ग । मोहन० ॥८२॥
श्रीकृष्णकान्त पाहतां । बाई अर्पीली सर्व गीते ग । (य४-५०)
तयाच्या सुकृतानें । जडो ज्ञानेश्वरपदीं चित्त ग । मोहन०
॥८३॥
देहातें वर्णाश्रम । जीवातें समबुद्धि ।
श्रीकृष्णचरणावरी ग बाई । सर्वदा ब्रह्मसिद्धी ॥८४॥
देह तो भिन्न भिन्न । जीव तो एक पाही ।
श्रीकृष्णचरणावरी ग बाई । एक ना दोनी नाहीं ॥८५॥
कर्मानें चित्तशुद्धि । ज्ञानानें जीवाऽवाप्ति ।

श्रीकृष्णचरणावरी ग बाई । प्रेमेंचि ब्रह्मप्राप्ती ॥८६॥
देहासी येती सिद्धि । जीवास मिळे मुक्ती ।
श्रीकृष्णचरणावरी ग बाई । अखंड परा भक्ती ॥८७॥
शास्त्र तेंचि विषय । संकेत वृत्तिरूप ।
तत्व तें कृष्णभक्ती ग बाई । स्वानंद पूर्णरूप ॥८८॥
अनित्य देहबुद्धि । नित्य ती जीवबुद्धि ।
श्रीकृष्णचरणावरी ग बाई । कालाची नाहीं सिद्धि ॥८९॥
अहं तें देहज्ञान । सोऽहं तें जीवपण ।
श्रीकृष्णभक्तीमध्यें ग बाई । नाहींच हें मीपण ॥४९०॥
दुःख तें देहामाजीं । सुख तें जीवाठायीं ।
श्रीकृष्णभक्तीमध्यें ग बाई । भोक्तृत्व नसे कांहीं ॥९१॥
बद्धासी कर्मे जन्म । मुक्तांनां दैवें भोग ।
श्रीकृष्णभक्तीमध्यें ग बाई । नाहींच भवरोग ॥९२॥
पाय ते बंध माझे । शीर ते जीवन्मुक्ती ।
दोहींचा संधिभाव ग बाई । हृदय हरीभक्ती ॥९३॥
शीर हे जीवन्मुक्ती । हरीच्या पायीं वाहूं ।
हृदयप्रेमामध्यें ग बाई । दोघेही एक होऊं ॥९४॥
साकार देहभाव । अरूप होय जीव ।
सांवळ्या हरीपायीं ग बाई । ऐक्यत्वें देह जीव ॥९५॥
देहासी पांच अग्नि । जीवासी स्थलान्तर ।
श्रीकृष्णचरणावरी ग बाई । अव्याप्ति नाहीं थार ॥९६॥

४३



व्यासासी भक्त्यप्रीती । शांडिल्या ज्ञानद्वेष । (य४-५१)
नारद उपदेशी ग बाई । भक्तीचाचि उत्कर्ष ॥९७॥
सूत्रांच्या उपदेशी । तीघांचे भिन्नमत ।
श्रीमद्भागवतीं ग बाई । व्यासची हरिभक्त ॥९८॥
वेदान्तमुक्तिफळें । संतोष नाहीं झाला ।
म्हणोनी भागवती ग बाई । गाईली हरीलीला ॥९९॥
देह हा एकदेशी । व्यापक जीव पाही ।
श्रीकृष्णप्रेमामध्यें ग बाई । व्याप्यव्यापक नाहीं ॥५००॥
जयाच्या उपदेशें । जाहली कृष्णप्राप्ती ।
तयाच्या पायाहूनी ग बाई । ओवाळू जीवन्मुक्ती ॥१॥
सापेक्ष कृष्णकृपा । भक्तीनें प्राप्त होय ।
सद्गुरु बाप माझा ग बाई । सर्वदा कृपामाय ॥२॥
सद्गुरुकृपांबूचा । कृष्णासी अंश एक ।
तेणें तो थोर जाला ग बाई । विश्वाचा नियामक ॥३॥
जीवाहुनी वेगळा । श्रीकृष्ण परमेश्वर ।
सद्गुरु बाप माझा ग बाई । जीवत्वीही ईश्वर ॥४॥
हरीच्या वेदशब्दें । जीवासी कर्मभोग ।
सद्गुरुशब्दयोगें ग बाई । नासतो भवरोग ॥५॥
ऐसीया लक्षणाला । आश्रय ज्ञानेश्वरू ।
श्रीकृष्णासह आम्ही ग बाई । तयाचें दास्य करूं ॥६॥
जीयांच्या कृपायोगें । उद्धव तो प्रेमळ ।

मस्तक त्यांचें चरणी ग बाई । ठेवीलें सर्वकाळ ॥७॥
सत्पद वेदशास्त्रें । चित्पद कृष्णमूर्ती ।
आनंद ब्रह्मपूर्ण ग बाई । व्रजगोपीका प्रीती ॥८॥
परोक्ष सत्ताशास्त्रें । कृष्णचिदपरोक्ष ।
गोपिकां प्रेमयोगें ग बााई । विश्वातें पूर्ण मोाक्ष ॥९॥
देवांच्या कृपायोगे । चित्तीं ये शुद्धभाव ।
संतांच्या कृपायोगें ग बाई । बंधनी राहे देव ॥५१०॥
सूर्याकडे पाहतां । उष्णानें डोळे जाती ।
आकाश तैसें नाहीं ग बाई । शीत असोनी व्याप्ती ॥११॥(य४-५२)
ईश्वरध्यानयोगें । विक्षेपा उठे भाव ।
संतांच्या नमस्कारें ग बाई । विश्वची कृष्णराव ॥१२॥
घरांतील कार्याची । मातेसी चिंता पाही ।
मांडीवरी दूध पीई ग बाई । वाळका चिंता नाहीं ॥१३॥
विश्वाच्या नेमधर्मा । चिंतीतो परमेश्वर ।
सद्भक्त तैसे नव्हती ग बाई । प्रेमेंची सौख्याकार ॥१४॥
दिव्याचें आहेपण । मिळोनी तेलवात ।
सूर्याचें आहेपण ग बाई । निरपेक्ष अखंडीत ॥१५॥
ज्ञान्याचें आहेपण । मिळोनी सत्त्ववृत्ति ।
सद्भक्त तैसा नोहे ग बाई । विश्वीच त्याची व्याप्ती ॥१६॥
रोग्यानें विष खातां । मरणा पुढे करी ।

४४



वैद्याच्या हातें तेंचि ग बाई । अमृता मागे सारी ॥१७॥
शास्त्रांच्या योगे ज्ञान । संसारी घाली पुन्हा ।
सद्गुरुमुखें तेचि ग बाई । दाखवी ब्रह्मपणा ॥१८॥
वैद्याच्या योजनेनें । जें मारी तेंचि तारी ।
सद्गुरुकृपे तैसा ग बाई । भवसर्प तोही हरी ॥१९॥
कृष्णाच्या हातांमध्ये । नसता जरी पावा ।
तरी गोकुळांमध्यें ग बाई । न येत्या गोपी मोहा ॥५२०॥
तैसें नसतां संत । भूमीवरी स्वभक्ती ।
एकल्या हरीयोगें ग बाई । स्थापतां न ये युक्ती ॥२१॥
असोनी जड वेळू । श्रीकृष्णामुखी आला ।
सद्गुरु नर तैसा ग बाई । हरिहूनी थोरावला ॥२२॥
गोपीच्या रासयोगें । कृष्ण हा पूर्णकाम ।
तैसें सद्गुरुकृपें ग बाई । विश्व हे घनःश्याम ॥२३॥
यशोदा कृष्णमुखी । दह्याचें कवळ भरी ।
सद्गुरु माय माझी ग बाई । तृप्ति दे विश्वभरी ॥२४॥
गोपींनीं पाळुनीही । श्रीकृष्ण मथुरे गेला ।
सद्गुरुकृपाबंधें ग बाई । गतिमार्गची मोडिला ॥२५॥
अर्चुनी कात्यायनी । तरी शेखीं गुप्त झाला । (य४-५३)
सद्गुरुकृपायोगें ग बाई । न पाचारीतां आला ॥२६॥
कृष्णातें भजतां गोपी । वियोग भोगी भारी ।
सद्गुरुकृपायोगे ग बाई । अखंड कृष्ण ऊरी ॥२७॥

कृष्णाते कृष्णपण । संकेतावीण नाहीं ।
तो संकेत सेवक ग बाई । गुरुवचनाचा पाही ॥२८॥
देवांच्या कृतीमध्यें । नानात्व जग झालें ।
सद्गुरुकृतीमध्यें ग बाई । ब्रह्मत्वां विश्व आलें ॥२९॥
बाळासी खेळवितां । मायेसी बरोबरी ।
दूध पाजी त्यावेळीं ग बाई । वरीष्ट सर्वांपरी ॥५३०॥
फिरतां संगतीनें । सद्गुरु दिसे नर ।
उपदेशी ज्ञान जेव्हां ग बाई । तैं वंदी परमेश्वर ॥३१॥
हरीच्या कृतीमध्यें । यमासी यमपण ।
सद्गुरु कृपायोगें ग बाई । यमची नारायण ॥३२॥
ईश्वर अवतारीं । दुष्टांसी मृत्युप्राप्ती ।
सद्गुरु अवतरतां ग बाई । कीड्यांही जीवन्मुक्ती ॥३३॥
ईश्वरकृत वेदीं । जाण्याचें नाना मार्ग ।
सद्गुरुउपदेशी ग बाई । वैकुंठ होय अंग ॥३४॥
ईश्वरकृतसृष्टी । जीवासी झोळीगांठ ।
सद्गुरुकृतदृष्टी ग बाई । सच्चिदानंद पट ॥३५॥
ईश्वरसृष्टीमध्यें । दुष्काळादिक दुःख ।
सद्गुरुसृष्टीमध्यें ग बाई । गाळीव तृप्तिसुख ॥३६॥
किंचित द्वेष होतां । ईश्वर नरकीं घाली ।
सद्गुरु माय माझी ग बाई । द्वेष्यां दे मोक्षखोली ॥३७॥

*रामनाम*





''र''कार मुखी येतां । पातकें तीं पळती ग ।
बाई ''म''कारकपाटानें । उदरी ते न शिरती ग । मोहन० ॥३८॥
हिंडतां वनीं राम । तरू उद्धरिलें ।
तें श्यामरूप चित्तीं ग बाई । सर्वदांची ठेवीलें ॥३९॥
भिल्लीणी फळें खातां । तोषला सखा राम ।
सेवुनी ते उच्छिष्ट ग बाई । संहरूं सर्वकाम ॥५४०॥ (य४-५४)
राम माझा वनीं जातां । देहभाव विसरलें ।
हृदयीं तो रामराणा । स्मरतांचि प्रकाशिलें ॥४१॥
भार्गव कर्मरूपी । बाई राघव उपासना ग ।
यादव ब्रह्मज्ञान । सर्वांभूती हा रघुराणा ग । मोहन० ॥४२॥
मानव अर्धभाग । केसरी मुखाकडे ।
प्रऱ्हाद भक्तासाठीं ग बाई । स्तंभीं रूप रोकडे ॥४३॥
ताराया तिर्यग्जंतु । जहालें मत्स्यकूर्म ।
तयाची वंशामाजी ग बाई । मजही देई जन्म ॥४४॥
शूकररूप देवें । नरकीं उद्धरिले ।
तयाचे कृपें आम्हां ग बाई । निर्भय सदां केले ॥४५॥
चिमणे तेचि थोर । जाहले ब्रह्मवृंद ।
श्रीकृष्णसेवारूपीं ग बाई । मज त्यांचा आशीर्वाद ॥४६॥
शाक्यमुनीच्या कुळीं । मोहाया निशाचर ।

अहिंसास्थापक[१] जो ग बाई । त्या माझा नमस्कार ॥४७॥(गौतमबुद्ध)

भविष्यकाळीं ज्याचा । गाजेल फडत्कार ।

त्या म्लेंछसंहारका[] ग बाई । साष्टांग नमस्कार ॥४८॥(कल्कीअवतार)

अनंत अवतार । होउनी सर्व गेले ।

अखंड वर्ष सोळा ग बाई । ते दत्त वंदियेले ॥४९॥

तुझीया प्राप्तिवीण । मोक्ष तेंचि बंधन ।

कल्पासमान जाय ग बाई । श्रीकृष्णा आम्हां क्षण ॥५५०॥

न घे जो अवदान । म्हणतां स्वाहा स्वाहा ।

तो सखा नंदाघरी ग बाई । वत्सांची करी सेवा ॥५१॥

गोपींचा प्रेमपती । अनादि पूर्णकाम ।

श्रीकृष्णकान्तकृपे ग बाई । मत्काम झाला राम ॥५२॥

श्रीकृष्णवर्णनाचें । जें काही पुण्य झालें ।

श्रीज्ञानेश्वरपायीं ग बाई । सर्वही समर्पीलें ॥५३॥

श्रीकृष्ण अर्पीयलें । सोडीला नाहीं राम ।

म्हणोनि आम्ही सदा ग बाई । सेवूं तो सीताराम ॥५४॥

आत्मा तो रामचंद्र । ब्रह्म तो कृष्णचंद्र । (य४-५५)

दोन्हीही आटोनिया ग बाई । ज्ञानेश पूर्णचंद्र ॥५५॥

पिंड तो सीतापती । ब्रह्माण्ड राधावर ।

दोन्हींही आटोनिया ग बाई । सर्वत्र ज्ञानेश्वर ॥५६॥





शब्दांच्या संबंधानें । वृत्ति त्या जाती लया ।

नव्हे हे एकाएकी ग बाई । त्या वंदूं गुरुपाया ॥५७॥

सद्भक्ति वाचोनिया । न शोभे निष्कर्मता ।

शोभेल कैसें कर्म ग बाई । नार्पीतां कृष्णनाथा ॥५८॥

जीव तो कर्मे करी । ईश्वर फळदाता ।

सद्गुरु बाप माझा ग बाई । कर्मातें निवारीता ॥५९॥

जयाच्या नामस्मरणें । यज्ञादि सर्वक्रीया ।

न्यून त्या पूर्ण होती ग बाई । नमो श्रीकृष्णराया ॥५६०॥

निष्काम भक्तिसाठी । आधिं ब्रह्मी विसावा ।

सद्गुरुकृपें मिळे ग बाई । मंत्र तो चोविसावा* ॥६१॥

*(*टीप :- केशवापासून जें चोविसावें नांव तें - 'श्रीकृष्णायनमः')*

जन्म तो वृत्तिभाव । मृत्यु ते तत्त्वसत्ता ।

सद्गुरुभक्तीमध्यें ग बाई । दोहोची नाहीं वार्ता ॥६२॥

संतांच्या मुखातुनी । ऐकतां हरीगुण ।

निर्मळभक्तियोगें ग बाई । सर्वदा तृप्त मन ॥६३॥

सद्भक्तां आणि जना । समान व्यवहार ।

सद्भक्ता सुखमय ग बाई । ईतर दुःखपर ॥६४॥

कृष्णास शरण जातां । न होय गुरुप्राप्ती ।

गुरूस शरण जातां ग बाई । श्रीकृष्ण गृहा येती ॥६५॥

श्रीराम वनीं जाता । दृश्य तें गुप्त केलें ।

अदृश्य रामरूप ग बाई । भक्त हृदयीं ठेलें ॥६६॥

वेणु वाजवी देव । घेवोनी दोन्हीं हाती ।
मोहोनि गोप बाळा ग बाई । भजनी लावी साथी ॥६७॥
सावळी मूर्ति बाई । पाहतां एकल पोटा ।
गेली ते वनांतरी ग बाई । मोडाया भीतो कांटा ॥६८॥ (य४-५६)
रितें हें मज वाटे । प्रेमावीण कीं आह्मां ।
ऐकोनि दयावंता ग बाई । दृष्टीनें मज पाहा ॥६९॥
द्या द्या जी आलिंगन । प्रेमानें दीनबंधु ।
धरोनी दोन्ही हात ग बाई । उद्धरा कृपासिंधु ॥५७०॥
क्षांतीच्या बळें पावे । सगुण साक्षात्कार ।
सगुण पूर्ण ब्रह्म ग बाई । श्रीविष्णु ज्ञानेश्वर ॥७१॥
रमाही पदसेवा । करोनि पावे सुख ।
तद्‌ब्रह्म वाचकानें ग बाई । वाहो हें सदा मुख ॥७२॥
तमालपत्रासम । तुमची कांति मिळे ।
म्हणोनि लागताती ग बाई । वदनाकडे डोळे ॥७३॥
गीतेचा शुद्धभाव । मराठी सांगावया ।
सद्गुरु ज्ञानेश्वर ग बाई । पातले भूवरी या ॥७४॥
आजच्या विषयाची । कानाला लागो गोडी ।
आनंद बहु वाटो ग बाई । घरीं श्रीकृष्ण करितां बेडी ॥७५॥
पोटाच्या पोटामध्यें । राहोनि जातो राग ।
पाहतां कृष्णनाथा ग बाई । बोलणें पडे भाग ॥७६॥

४७



पहिली ग माझी ओवी । ओवीचा ग काय नेम ।
तुळसी ग खालें राम । पोथी वाचे ॥७७॥
कोमळ वचनानें । विनविते मी तुम्हां ग ।
रासांत जाऊनिया । द्या मज अखंड प्रेमा ग । मोहन० ॥७८॥
मधुर वेणुनादें । मोहीलें माझें मन ।
श्रीकृष्णपायांपुढें ग बाई । मुक्तीही  वाटे गौण ॥७९॥
माझीया वेणुनादें । गोपी आल्या वृंदावनीं ।
जाणोनि ऐसें देव ग बाई । पुढें धावतसे वनीं ॥५८०॥
स्वागत तुमचें या या । काम तुम्हां आवडीचें ।
पुरवितो सकळ कांहीं ग बाई । भय सांडा चावडीचें ॥८१॥
शिव वाजवी मृदंग । नाचण्या आज्ञा नाहीं ।
परि ज्ञानेश्वरकृपें ग बाई । तो रास माझ्या देहीं ॥८२॥
सर्व रसां अधिष्ठान । दहावा प्रेमरस । (य४-५७)
नित्य तोचि पाहिजे ज्या बाई । त्यांनीं पाहावा हरिरास ॥८३॥
राग रंग आम्हा नये । हरिपायीं अनुराग ।
श्रीकृष्ण करितां पती ग बाई । भोगची झाला योग ॥८४॥
हरिवीण कर्मधर्म । आंगीं उरे कर्तेपणा ।
श्रीकृष्णीं जडतां प्रीति ग बाई । मिळे नित्य महाकारणा ॥८५॥
जरी तुम्हां उतावेळ । तरी हरिनाम जपा ।
संतांच्या संगतीनें ग बाई । खेळावा रास सोपा ॥८६॥
श्रीराम मुखीं माझ्या । ज्ञानेश शिरावरी ।

श्रीकृष्ण प्रेमळ कांत ग बाई । मन मोही हृदयावरी ॥८७॥

*योग व भक्ती*

श्रीकृष्णदर्शनानें । यमुना पुनित झाली ।
तेवढी कृपा नाहीं ग बाई । सत्रावी मध्यें आली ॥८८॥
साधोनी प्राणायाम । घाबरा होय जीव ।
गोविंदनाम घेतां ग बाई । एक होताती जीवशिव ॥८९॥
विषय आवरतां । योगीया त्रास होय ।
श्रीकृष्ण नांव घेतां ग बाई । अवघें जगचि ब्रह्म राहे ॥५९०॥
योग्यांच्या मनीं धाक । नसतो विषयांचा ।
श्रीहरीभक्तांलागीं ग बाई । विषय-भावचि नाहीं साचा ॥९१॥
वड्यांच्या भाजीमध्यें । तिखट बहु देवा ।
म्हणोनी मधुर ऐसा ग बाई । भात नरम गोड जेवा ॥९२॥
गुंफुनी काव्यमाळा । घातली कृष्णगळां ।
मिळोनी दोघे जण ग बाई । होऊं ज्ञानेश चरणीं कळा ॥९३॥
सकळ सुखासाठीं । जीवाची नित्य धांव ।
पाहिजे जरी सुख ग बाई । तरी द्यावा कृष्णीं भाव ॥९४॥
स्वार्थाचें मोक्षसुख । देवाच्यासाठीं प्रेम ।
सर्वही गोपबाळा ग बाई । जाणती हा संभ्रम ॥९५॥
मधूर वेणुरव । बाई वाजतो मधुवनीं ग ।
संसार टाकुनीया । जावे वाटे हरिसेवनीं ग । मोहन० ॥९६॥
निर्गुण सगुणाचा । प्रेमांत समन्वय ग ।





सांगती संत ऐसें । ज्ञानें भरतसे हृदय ग ।मोहन०॥९७॥(य४-५८)

सद्गुरु दत्तात्रेय । निजशरीरीं ब्रह्मचारी ।
श्रीकृष्ण कांत माझा ग बाई । भोग भोगोनी निर्विकारी ॥९८॥
हृदयीं हरिपाय । धरावे बळकट ग ।
सकळ तीर्थे तेव्हां । मग दाविती मोक्षवाट ग । मोहन० ॥९९॥
प्रेमाचें प्रेमाचें पुष्प-भारीं । विवेकमय दोरा ग सखुगडणी ।
यशोदा यशोदासुतपायीं । अखंड भाव धरा ग सखुगडणी ॥६००॥
स्थूल हें स्थूल हें नाशिवंत । तयाला ओवी काय ग सखुगडणी ।
ओवी ती ओवी ती गावी त्याला ।
यशोदा ज्याची माय ग सखुगडणी ॥१॥
श्वेतवर्ण रूप बाई । आपाचें म्हणती मुनी ।
तयाला ओवी गावी ग बाई । हे तो अनुचित करणी ॥२॥
ओवी ती गावी तया । नित्य क्रीडे जो वृंदावनीं ।
सांडुनी सर्व कांही ग बाई । ध्यावें पायचि सदा मनीं ॥३॥
काळ्या वर्णाची ओवी । काळोख चित्तीं आणी ।
म्हणोनि स्मरावा तो ग बाई । नंदनंदन चक्रपाणी ॥४॥
नवल वाटे बाई । लोकांच्या बोलण्याचें ग ।
मी तंव कृष्णासंगें । निःसंग होवोनि नाचे ग । मोहन० ॥५॥

श्रीराम कृष्ण पूर्ण । आत्माही राम करी ।
श्रीकृष्णकृपावशें ग बाई । प्रेमची बाह्यांतरी ॥६॥
सांडोनि सांडोनि नाना वाद । गोविंद बोला वाणी । ग सखुगडणी ।
सहज सहज हृदयांत । आकळे चक्रपाणी ग सखुगडणी ॥७॥
दुःखाचें दुःखाचें ज्ञान योग । सुखाचा कृष्णराजा ग सखुगडणी ।
तयाच्या तयाच्या चरणीं राहो । त्रिकाळ प्रेम माझा ग सखु० ॥८॥
श्रीकृष्ण श्रीकृष्ण भक्तिवीण । जळो तें ब्रह्मज्ञान ग सखुगडणी ।
ना भव ना भव ना ती मुक्ती । व्यर्थची अभिमान ग सखुगडणी ॥९॥
शुद्ध तें शुद्ध तें चित्त तेव्हां । आवडे जेव्हां हरी ग सखुगडणी ।
मग तो मग तो भगवंत । दासाचें मन हरी ग सखुगडणी ॥५१०॥
मदन मदन मनोहर । पाहावा वाटे डोळां ग सखुगडणी ।
ध्यातो ज्या ध्यातो ज्या शिव भोळा । ध्यातो ज्या शिव भोळा ॥११॥
आत्मा तो ब्रह्मरूप । वृत्ति ती कृष्णमय । (य४-५९)
हरि करी ग त्या परिणय । साजणि बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई ॥१२॥

४९



अखंड आम्हा तृप्ती । नंदनंदन नामें ।
जों कां गोपीका तारी कामें । साजणि बाई०।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई० ॥१३॥
ॐकार वाचेवरी । प्राणांत सोहंभाव ।
चित्ती बसतो वासुदेव । हरीनें मुरली ० ॥१४॥
तत्पदवाच्य कृष्ण । त्वंपदवाच्य आम्ही ग ।
सांडोनि दोन्ही भाव । केला लक्ष्यांश तो निष्कामीं ग । मोहन०॥१५
सगुणध्यानबळें । बाई, निर्गुण हातां चढे ग ।
गोविंदप्रेमावीण । ब्रह्मज्ञान तेंहि कोरडे ग । मोहन० ॥१६॥
नामें न तरे ऐसा । शास्त्रांतरीही नाहीं कोणी ग ।
नामचि घेवोनिया । झाला विठ्ठल तुकावाणी ग । मोहन० ॥१७॥
सच्छब्दवाच्य नाम । चिच्छब्दवाच्य मूर्ती ग ।
आनंदवाच्य प्रेम । सच्चिदानंद हरिकीर्ती ग । मोहन० ॥१८॥
उपासना श्रीराम । श्रीकृष्ण ब्रह्मविद्या ग ।
तयाच्या कांता आम्ही । झालो तोडुनी अविद्या ग । मोहन० ॥१९॥
कोणाच्या प्रीतिसाठीं । आम्ही कदां न गाऊ गीत ॥
परी हा पाळणाची । चित्तासी बोलवीत ग । मोहन० ॥६२०॥
घेवोनि हरिनाम । ज्याच्या उल्हास नाहीं मना ग ।

तयांचे ब्रह्मज्ञान । दाखवी भाव नाना ग । मोहन० ॥२१॥

सांडोनि सांडोनि समाधीला । वृत्ति ये देहावरी ग सखुगडणी ।

तेव्हांची तेव्हांची दासभावें । निजांतरी ग सखुगडणी ॥२२॥

समाधी समाधी मध्यें जरी । किंचित ध्यातृपण ग सखुगडणी ।

तेव्हांची तेव्हांची अंशभावें । तुटाया जीवपण ग सखुगडणी ॥२३॥

समाधी समाधी मध्ये स्थिती । तैसीच व्युत्थानांत ग सखुगडणी ।

तेधवां तेधवां एकरूपें । श्रीकृष्ण आणि भक्त ग सखुगडणी ॥२४॥

सत्पद ब्रह्ममय । चित्पद सगुण तनू ।

आनंद कृष्णमय ग बाई । एकत्व प्रेमभानू ॥२५॥

जन ते मायादेवी । आप ते कृष्णमूर्ती । (य४-६०)

जेवीतां प्रेमभावें ग बाई । सच्चिदानंद तृप्ती ॥२६॥

विसर विसर नको देवा । तुझिया चरणांचा ग सखुगडणी ।

मग तो मग तो भाव मिळो । जनन मरणाचा ग सखुगडणी ॥२७॥

विसर विसर नका देवा । तुझिया गुणगानीं ग सखुगडणी ॥

इतर इतर नलगें कांहीं । मोक्षादि ऋद्धिखाणी ग सखु०॥२८॥

कोवळे हरिपाय । वाकी त्या रूणझुणती ।

५०



प्रेमेंची निजदासा ग बाई । स्वानंद बळा नेती ॥२९॥

अंगुष्टामध्यें गंगा । कालिंदी अर्धांगासी ।

इतर गोपीसंगें ग बाई । पंचलतिका दासी ॥६३०॥

पतिवीण न पाहूं । वदनें दुजीयांची ग ।

म्हणोनि अंध नेत्र । वरि आकृति हृदयाची ग । मोहन० ॥३१॥

आम्ही ही शूद्रजन्मीं । श्रीकृष्ण गौळ्या घरीं ।

म्हणोनी सवर्णत्व ग बाई । झालें मीं कृष्णनारी ॥३२॥

श्रीकृष्ण व्यभिचारी । श्रीराम नीतिमंत ग ।

म्हणोनि राममूर्ती । ध्याती सदा संत ग मोहन० ॥३३॥

भिवोनि यवनाला । बाई पळाला नंदसूत ग ।

श्रीराम माझा बळी । मारि असुर समरांत ग । मोहन० ॥३४॥

कालिया अहंकार । मारीला सत्ताबळें ग ।

तयातें पहावया । झुरती दोन्ही डोळे ग । मोहन० ॥३५॥

कर्मानें कर्मानें चित्तशुद्धि । भक्तीनें स्थिरबुद्धी ग सखुगडणी ।

वैराग्य वैराग्य सहित ज्ञानें । अखंड मोक्षसिद्धी ग सखु०॥३६॥

सत्संगा सत्संगा वांचोनिया । न जावो व्यर्थ काळ ग सखुगडणी ।

सत्संग सत्संग नसला जरी । तरि ध्यावा वासुदेव ग सखु०॥३७॥

ईश्वर ईश्वरसृष्टीमध्यें । माया ती बंध करी ग सखुगडणी ।

सद्गुरु सद्गुरु सृष्टीमध्यें । स्वानंद विश्वभरी ग सखुगडणी ॥३८॥
ईश्वरसृष्टीमध्यें । नास्तिक काही जन ।
सद्गुरुसृष्टीमध्ये ग बाई । प्रतीति सच्चिद्घन ॥३९॥
ईश्वरसृष्टीमध्यें । अल्पज्ञ झाला जीव ।
सद्गुरुसृष्टीमध्यें ग बाई । तुटे जीवेश्वर भाव ॥६४०॥ (य४-६१)
शुकादि मुनीजन । बाई निर्गुणी पूर्ण झाले ग ।
परि त्यांचेंही मन । ओढीत सगुणलीलें ग । मोहन० ॥४१॥
निर्गुण ब्रह्म ध्यातां । विषय आड येती ग ।
सगुणभक्तीमध्यें । बाई विषय कृष्ण होती ग । मोहन० ॥४२॥
अजपा अजपा मध्यें बाई । एकला प्राण गुंते ग सखुगडणी ।
गोविंद गोविंद नाम गातां । गुंते वाचा आणि प्राण ग सखु० ॥४३॥
कोंवळी हरीलीला । कोंवळें भक्तमन ।
भावें अखंड नारायण । हरीनें मुरली वाजविली ॥४४॥
स्थूळ* हें द्यावें नामीं । लिंग* तें द्यावें ध्यानीं ग ।
कारण* न्यावें ज्ञानें । उरलें प्रेम तें सौख्यखाणी ग ।मोहन०॥४५॥

*(*तीन शरीरे)*

समाधी योगीयांची । उत्थानामध्यें तुटे ग ।





सगुण प्राणनाथ । आम्हां अंतर्बाह्य भेटे ग । मोहन० ॥४६॥
सत्पद कर्मधर्म । बाई चित्पद ब्रह्मज्ञान ग ।
आनंदपद प्रेमा । कृष्णीं सगुण समाधान ग । मोहन० ॥४७॥
अभ्यास अभ्यास घडीभर । आनंद कल्पकल्प ग सखुगडणी ।
सगुण सगुण स्वामी माझा । कदापी नाहीं अल्प ग ॥४८॥
विरक्तीवीण जरी । बाई पढला ब्रह्मज्ञान ग ।
तरी त्या नाना सिद्धी । विघ्नें करिती नियमानें ग । मोहन० ॥४९॥
श्रीकृष्ण ज्ञानेश्वर । दोन्हीही पूज्य मूर्ती ।
श्रीकृष्ण हृदयांत ग बाई । ज्ञानेश बह्मस्फूर्ती ॥६५०॥
मार्मीक श्रोतेजन । तयाते विनवणी ।
निर्गुण होवोनिया ग बाई । सगुण ध्यावा मनीं ॥६५१॥
आलिया देहावरी । बाई त्वरित व्हावें दास ग ।
सहज स्थिती होतां । व्हावें साक्षित्वें सावकाश ग । मोहन० ॥५२॥
हा गीतसमुदाय । ज्या ब्रह्माचें निरूपण ग ।
ज्ञानेश्वराचे पायीं । अवघा केला तो समर्पण ग । मोहन० ॥५३॥
पाळणा पाळणा झोकां घेतां । भूमिये घे लोळणी ग सखुगडणी ।
तयाच्या तयाच्या प्रीतिसाठीं । मंगळपरी वळणी ग सखु०

॥५४॥

ब्राह्मणवाणी साठीं । घेतलें प्रायश्चित्त । (य४-६२)
आतां श्रीहरीच्या पायीं ग बाई । होवो हें लीन चित्त ॥५५॥
मोहक मोहक नंदलाला । पाहुनी मोह पडे ग सखुगडणी ।
ज्ञानेश ज्ञानेश कुमारीका । पैंजण पायीं रूळे ग सखुगडणी ॥५६॥
श्रुती ती श्रुती ती शब्दमय । अनुभव स्फूर्ति रूप ग सखुगडणी ।
सप्रेम सप्रेम कृष्णभक्ती । मिळूनी रामरूप ग सखुगडणी ॥५७॥
कर्म तें कर्म तें बाह्यवृत्ति । अंतर उपासना ग सखुगडणी ।
दोहींचें दोहींचें स्थैर्य ज्ञान । कृष्णचरणीची वासना ग सखु०॥५८॥
प्रणव प्रणव ब्राह्मणाला । ज्ञान तें ब्रह्मवेत्या ग सखुगडणी ।
आम्हाला आम्हाला प्रेमभावें । द्यावें जी नंदसुता ग सखुगडणी॥५९॥
सद्भक्ती सद्भक्तीवीण ज्ञान । उत्पन्न द्वेष करी ग सखुगडणी ।
श्रीकृष्णीं श्रीकृष्णीं प्रेमभाव । अध्यास मूळ हरी ग सखु० ॥६६०॥
मोहन स्वामी माझा । मोहावेगळें करी ।
धरूनी प्रेमळां ग बाई । निववी निजांतरी ॥६१॥
श्रीकृष्ण हृदयांत । शिरावरी ज्ञानेश ।
तुटतो सर्वकाळ ग बाई । चौऱ्यांशी लक्ष पाश ॥६२॥



सत्यज्ञानानंदानंत । स्वरूप श्रुती सांगे ग ।
उत्पत्तिस्थितीलय । तटस्थरूप सांगें ग ॥६३॥
देहाहुनी वेगळा । बाई ज्ञानानें आत्मा भासे ग ।
श्रीहरी भक्तिबळें । कृष्णरूपचि विश्व दिसे ग । मोहन० ॥६४॥
हाड वो हाड गाई । गाई ही कोठें गेली ।
माझ्या रामाला झोप आली । साजणि बाई ।
कृष्णाला विडे देती गवळ्याची राई ॥६५॥
नीज तूं नीज तूं नारायणा । परि ठेवी जागृती ग सखुगडणी ।
स्मरे तूं स्मरे तूं निजमनीं । निजावतार कृति ग सखु० ॥६६॥
कृष्णावतारी आम्ही । बाई सकळ होऊं जाया ग ।
म्हणोनि आतां सेवा । तुम्ही घ्यावी ही रघुराया ग । मोहन०॥६७॥
कोमळ सुखरूप । बाई चरण तुझे रामा ग ।
तरती शिळा काष्ठ । मूढ जपूनि तुझ्या नामा ग । मोहन० ॥६८॥
आतां तूं एकपत्नी । बाई म्हणुनी माता पिता ग ।
याचना पुढें ऐसी । कांता करावें रघुनाथा ग । मोहन० ॥६९॥
(य४-६३)
मोडोनि भूमीभार । बाई वाढवा प्रेमसार ग ।
निजभक्ताच्या चित्तीं । कालत्रयींही व्हावें स्थीर ग ।
मोहन०॥६७०॥

अयोध्या आनंदली । बाई तुमचा जन्म होतां ग ।
मोलकरणी आम्ही । दान भक्ती द्या रघुनाथा ग । मोहन०
॥७१॥
करुनी नमस्कार । बाई आलें मी शरण पायीं ग ।
आतां काळजी माझी । बाई प्रभु तुम्हा ठायीं ग । मोहन०
॥७२॥
*(संस्कृत-मराठी मिश्र)*
यतोऽस्य विश्वस्यास्ति । प्रभवं प्रलयादि ग ।
तदेव ज्ञात्वा जीवे । न भवति त्रिविध व्याधी ग । मोहन०
॥७३॥
श्रीकृष्ण श्रीकृष्ण बहूतांचा । नांदत ठायीं ठायीं ग सखुगडणी ।
माझा तो माझा तो ज्ञानेश्वर । एकलीच्या हृदयीं ग
सखु०॥७४॥
चोरीतां दही दूध । बाई अंतरी न ये लाज ग ।
तुम्हास कृष्णा आम्ही । बाई देऊं स्त्रियांचा साज ग
।मोहन०॥७५॥
गोपीका गोपीका आधी वंदू । मग नमूं कृष्णराव ग सखुगडणी ।
श्रीज्ञानेश श्रीज्ञानेश कृपायोगे । मज ये पत्निभाव ग
सखु०॥७६॥
पांडवाघरीं श्रम । पात्र काढितां झालें मास ग ।
आतां मुकुंदा यावे । तुम्हां चारिते प्रेमघास ग । मोहन० ॥७७॥

५३



सुखाचा सुखाचा गुरुराणा । सुखची सर्वा मिळे ग सखुगडणी ।
सुखाची सुखाची अहंकृती । सद्गुरु सुखें मिळे ग सखुगडणी
॥७८॥
एक तो एक तो बाळभावें । एक तो चतुर्थक ग सखुगडणी ।
संबंध संबंध मिळवीतां । दोन्ही अर्थ एक ग सखुगडणी ॥७९॥
ऐक्यत्व तैसें तैसें । शोभेचा लाभ होय ।
यास्तव जाणुनी ब्रह्म ग बाई । आठवूं कृष्णपाय ॥६८०॥
योगानें योगानें स्थिरबुद्धि । ज्ञानानें साक्षीपण ग सखुगडणी ।
सगुण सगुण कृष्ण ध्यातां । अन्वय भक्तिभान ग सखुगडणी
॥८१॥
कोमळ कोमळ कृष्णपाय । कोमळ चित्तप्रेम ग सखुगडणी ।
कोमळ कोमळ प्राणामध्यें । शुद्धात्मा आत्माराम ग
सखु०॥८२॥
स्तवन किंवा निंदा । बाई योजावी नारायणीं ग ।
अन्यत्र सर्व भावें । मौन धरावें जनीं ग । मोहन० ॥८३॥
संतांच्या पायावरी । बाई घालावें लोटांगण ग । (य४-६४)
पाहूंचि नये मग । बाई विषय गृहांगण ग ॥८४॥
नीती ते नीती ते रामनामीं । श्रीकृष्णनामीं प्रीति ग सखुगडणी ।
दोन्हीही दोन्हीही मिळोनिया । मर्यादा पुष्टी ती ग सखु०
॥८५॥
जयाचें ब्रह्मज्ञान । तयाचें घरीं राहो ग ।

मागणें मला हेंची । श्रीकृष्णकांत पावो ग । मोहन० ॥८६॥
आवडी हरीपायीं । बाई अर्पण केली काया ग ।
सप्रेम हृदयीं येतां । नाशे अविद्या माया ग । मोहन० ॥८७॥
कठोर ज्ञानगर्व । बाई करितां नरकीं जाय ग ।
कोमळ हरीपाय । मनीं स्मरतां मुक्त होय ग । मोहन० ॥८८॥
ईश्वरा पासोनिया । बाई विषम झाली सृष्टी ग ।
सद्गुरुकृपा होतां । मिळे सर्वत्र समदृष्टी ग मोहन० ॥८९॥
श्रीहरी श्रीहरी नाम घेतां । रूप तें डोळा दिसे ग सखुगडणी ।
जागृतीं जागृतीं आणि स्वप्नीं । सगुण प्रीति भासे ग
सखु०॥६९०॥
मुखानें मुखानें घ्यावें नाम । पहावें रूप डोळा ग सखुगडणी ।
चित्तीं तो चित्तीं तो यावा प्रेम । एकत्वीं सुखसोहळा ग
सखु०॥९१॥
साधन करितां योगी । पडलें अभिमानीं ।
श्रीकृष्णभक्तीवीण ग बाई । तरलें नाहीं कोणी ॥९२॥
श्रीकृष्णभक्तीसुख । व्यतिरेकांत नाहीं ग ।
सर्वदा निजदासा । देतो अभय शेषशायी ग । मोहन० ॥९३॥

*राम नाम*

'र' कार मध्य स्थानीं । 'म' कार दोन्ही दिशा ।
व्यापक बिंदुरूप ग बाई । ॐ कार बद्धपाशा ॥९४॥
रकार रकार अग्निमय । आकार प्रजापती ग सखुगडणी ।





बिंदु तो बिंदु तो उमाकांत । ॐकार कृष्णमूर्ती ग सखु०॥९५॥
*अग्नीनें पाप हानी । *विधीनें पुण्यप्राप्ती ।
*शिव दे परमानंद ग बाई । *श्रीकृष्णीं पराभक्ती ॥९६॥
ऐसे हे मिळुनी चारी । झालेंसे रामनाम ।
ध्यातां तो चित्तीं प्रेमें ग बाई । पुरती सर्व काम ॥९७॥
अंतरीं ब्रह्मनिष्ठा । श्रीकृष्णीं पूर्ण प्रेम ।
सर्वदा जगा मध्यें ग बाई । तो असे निष्काम ॥९८॥ (य४-६५)
दोन्हींही डोळेभरी । सावळी मूर्ती पाहूं ।
त्यजूनी प्रपंचासी ग बाई । सर्वही चला जाऊं ॥९९॥
कोमळ पाय तुझे । रुतती तया कांटें ।
जाऊं नको वनांतरीं ग बाई । जीव तीळ तीळ तुटे ॥७००॥
सांगतें घडी घडी । जपावा कृष्णनाथ ।
होऊनी बहिणी माझ्या ग बाई । रास खेळूं धरुनी हात ॥१॥
लोकांची मुलें बाळें । खेळती गिल्लीदंडू ।
माझ्या श्रीकृष्णासाठीं ग बाई । मोत्यांचा केला चेंडू ॥२॥
विरहदशा माझा । बाई प्राणची घेऊं पाहे ।
श्रीकृष्ण कोठें आहे । साजणि बाई ।
कृष्णाला विडे देती । गवळ्याची राई० ॥३॥
कृष्णाला कृष्णाला नमस्कार । करूं जोडोनि हात ग
सखुगडणी ।
गोपीका गोपीका ऐशा वंदूं । लोटांगणें आणि दंडवते ग

सखु०॥४॥
कृष्णाला स्पर्शावया । नाहींच अधिकार ।
गोपीकावरी प्रेमें ग बाई । वारूचि लघुचीर ॥५॥
गोकुळीं कृष्णमूर्ती । राहो अथवा जावो ।
गोपीचिया येथें ग बाई । राहूं सेवोनिया पाय ॥६॥
अद्वैतज्ञानाविण । भक्ती ती कामनीक ।
निजात्म बोध होतां ग बाई । निष्काम प्रेमसुख ॥७॥
झालें जें झालें जें काव्य कांहीं । अर्पीलें गुरुपायीं ग सखुगडणी ।
करूनी करूनी कन्या ठेवी । मज ज्ञानेश्वर आई ग सखु ० ॥८॥
अलंकार हे खोटे। परि स्त्रियांसी आवडती ग ।
येणें सौंदर्य आम्हां । नेवो पर्णूनि गोपीपती ग मोहन० ॥९॥
माहेर कांचनाचें । बाई सासर अलंकारीं ग ।
सुंदरपण कृष्णीं । मुख्य मोल तें ज्ञानेश्वरीं ग । मोहन० ॥७१०॥
महिमान जाणोनी कां । प्रमाद नाही कदा ग ।
तरी तूं मागसी क्षमा । येऊनी ऐक्यबोधा ग । मोहन० ॥११॥
सखा हें ऐसें जरी । बोलीलें प्रणयानें ।
तरी तें उचितची ग बाई । अष्टमी भक्तिमानें ॥१२॥
मायेचा प्रेम बाळा । दुग्ध होवोनि पाळी । (य४-६६)





तैसा मी भक्तचित्तीं ग बाई । परमप्रेमारण्यमाळी ॥१३॥
आपण निराकार । साकार भोग्यजाती ।
अन्वयध्यानयोगें ग बाई । सर्वही कृष्णप्रीती ॥१४॥
तुम्हा पुरुषा हरी । बाई प्रकृती देते ताप ग ।
म्हणोनि कपील वाटे । बाई आम्हा सवतीचा बाप ग ।मोहन०॥१५॥
असोनि तुम्ही राजे । बाई कुलाल ऐसें म्हणे ग ।
ऐसा तो भेदवादी । बाई न्याय न आम्हा माने ग । मोहन० ॥१६॥
तुम्हा भेटीं ही माया । बाई लज्जायमान होते ग ।
म्हणुनी व्यासकुळीं आम्हा । सुजन्म मानवते ग । मोहन० ॥१७॥
एक ते तापदात्री । बाई लाजोनि एक पळे ग ।
म्हणोनि देवराया । यावे खेळाया आम्हा मेळे ग । मोहन० ॥१८॥
भाऊ तो ब्रह्मचारी । बाई बहीण मुखीं राहे ग ।
तुमच्या ठायीं ठाव । आम्हा बापेंचि दिला आहे ग । मोहन० ॥१९॥
गर्भाच्या अज्ञानानें । आंगीं ये मायपण ।
तैसेंचि तवज्ञानें ग बाई । हृदयी प्रेमखूण ॥७२०॥
ज्ञान्याचि कठीणता । बाई खुपेल तुझ्या पाया ग ।

म्हणोनि आम्हा मुक्ती । नको ती व्रजराया ग । मोहन० ॥२१॥
केवल ज्ञानाग्नीनें । हृदय तप्त होते ।
शीतळ तुझे पाय ग बाई । तयाते दुःखदाते ॥२२॥
पाय हे पाय हे सुकुमार । वैराग्य कंटकांत ग सखु० ।
रोविती रोविती सदा मुनी । म्हणोनि हो आम्हां कांत ग सखु०॥२३॥
ज्ञान्याच्या ज्ञान्याच्या हृदयांत । सतर्क शस्त्र भाऊ ग सखुगडणी ।
म्हणोनि म्हणोनि तेथें कृष्णा । तुह्मा न जाऊं देऊं ग सखु०॥२४॥
ज्ञान्याना मोह नाहीं । नाही तो कळवळा ।
म्हणोनी तुम्हा तेथें ग बाई । कोण रक्षी घननीळा ॥२५॥
आपुल्या मायबापा । सोडोनी वनीं जाती ।
ते ज्ञानी तुम्हा कैसे ग बाई । रक्षिती श्याममूर्ती ॥२६॥
असो ही ज्ञानी-निंदा । वंदनमिषें केली ग ।
परि हरी या स्थळीं तुम्ही । राहोनि करा केली ग । मोहन०॥२७॥
(य४-६७) ज्ञानी ते ज्ञानेश्वर । तिहीं केलें कन्यादान ।
म्हणुनी मज तुम्ही आतां ग बाई । उरलें द्या प्रेमदान ॥२८॥
पाहिजे जरी प्रेम । तरी हें एक करा ।
आपुली आत्मप्रीति ग बाई । समर्पा गोपीवरा ॥२९॥
यशोदा पाजी दूध । पोट न भरे तेथ ।





म्हणोनी अस्मत्करीं ग बाई । जेवावा दहीभात ॥७३०॥
नंद तो चाहोडीये । यशोदा मामी घरीं ।
वनांत सांभळाया ग बाई । आम्हीच पूतनारी ॥३१॥
आजची चित्तवृत्ती । बाई ऐसीच राहो सदा ।
संसार भोग घेतां । मिळो परमार्थ संपदा ग । मोहन०॥३२॥
गंगा आणि यमुनेचा । बाई संगम तीर्थासाठीं ग ।
इंद्राणि यमुनेचा । संग भक्तीची परिपाटी ग । मोहन०॥३३॥
गंगायमुनासंगें । बाई जाताती क्षारमेळी ग ।
इंद्राणि यमुनेचा । संग पर्णिता वनमाळी ग । मोहन०॥३४॥
कविताकीर्ति ताता । वाहिली पायापाशीं ग ।
सेवाया कृष्णनाथा । द्यावी आंदण मुक्तिदासी ग । मोहन०॥३५॥
सगुण विरलावस्था । व्यापक तें निर्गुण ।
निर्गुणी घनीभाव ग बाई । साकार नारायण ॥३६॥
मिळवुनी खाई माय । मोठिया पोरा सांगे ग ।
लहान बाळकाला । ग्रास चारी आपुल्या आंगें ग । मोहन०॥३७॥
ज्ञानाभिमानी जनां । नित्य अभ्यास श्रुती सांगे ग ।
श्रीहरीभक्ता दीनां । हरि सांभाळी निज आंगें ग । मोहन०॥३८॥
अभ्यास भावबळें । कर्तृत्व वाढवितो ग ।

अकर्ता आत्मा म्हणुनी । अनभ्यासें फळ देतो ग ।
मोहन०॥३९॥
मन तें ध्यानीं हावी । बाई बुद्धीस दे विवेक ग ।
वाणी ते नामीं ठेवी । प्राणें घेयावें शक्तिसुख ग ।
मोहन०॥७४०॥
शरीरमन सारें । आज धर्मार्थ खर्ची पार्था ग ।
संसारी बाह्य होई । चित्तीं धरूनी परमार्था ग । मोहन०
॥४१॥
ज्ञानिया ज्ञानिया पुसो आम्ही । काय तुम्हां अनुभव
ग।सखु०।(य४.६८) केवळ केवळ शब्दब्रह्मे । वाढल्या दिसे भव ग
। सखु०॥४२॥
आमुचा आमुचा अनुभव । ऐकावा कैशापरी ग । सखुगडणी० ।
सर्वत्र सर्वत्र सुख मिळे । संकटीं साह्य हरी ग । सखु० ॥४३॥
दळण दळतां । दळलें सर्व कांहीं ।
आतां तें एक उरलें ग बाई । पुजाया शेषशायी ॥४॥
बाई दळण माझें झालें । आतां संमार्जन तें काई ग ।
उठोनि कृष्णा तुह्मी । दोहाया जावें गाई ग । मोहन० ॥४५॥
बाई जोंधळे दळती घरी । बाई सासुसासरे ऋणी ग ।
तुह्मासाठीं मी कृष्णा । गहुं दळले हे चोरुनी ग ।
मोहन०॥४६॥
बाई दोघी गडणीचा । गळा तो पडे फिका ग ।

५७



बाई यशोदानंदनाने । मज आणिला रत्नटीका ग ।
मोहन०॥४७॥
बाई दोघी गडणीचा । बाई गळा तो जोड लागे ग ।
येवोनी कृष्ण घरी । प्रेमसंभ्रमे दही मागे ग ॥४८॥
बाई सांवळ्या पायांसाठी । बाई जन्म जन्मही आम्ही दळूं ग ।
घेवोनि कडे हरी । बाई संसारदुःख जाळू ग । मोहन० ॥४९॥
दळण दळावया । सखे निसून देई बाई ग ।
जेवीतां कृष्ण माझा । खडा न लागो कांहीं ग ।
मोहन०॥७५०॥
मुक्तीच्या माथ्यावरी । बाई देऊनि दृढ पाय ग ।
मुक्ताही मुक्त करी । माझी मुक्ताबाई ती माय ग ।
मोहन०॥७५१॥
बाई मिळोनी कुमारीका । कात्यायनीव्रत केलें ग ।
त्या स्मरणें मुक्ताबाई । लग्न न करूनी राहिली ग ।
मोहन०॥५२॥
दळण दळण सुखकर । एका श्रीकृष्णासाठीं ग । सखुगडणी ।
मोक्ष तो मोाक्ष तो लागे पाठीं । माझ्या गोपी बहिणीच्या ग
सखु०॥५३
दळण दळतां । हाताला आले फोड ।
तेणें कळवळोनी हरी ग बाई । बोलती बहु गोड ॥५४॥
येवोनि पतिगृहीं । झिजवीतिना काया ।

तयांना यमराव ग बाई । देतसे गजपाया ॥५५॥



एकला हा देव बाई । राधेसहित पावे शोभा ग ।
श्यामतनु कृष्ण माझा । यमुनेच्या तीरीं उभा ग । मोहन०॥५६॥
(य४-६९) पहिले अवतारीं । राम वल्कले जटाधारी ग ।
त्या संस्काराच्या बळें । कृष्णअवतारीं ब्रह्मचारी ग ।
मोहन०॥५७॥
तत्पद तत्पद बह्मलक्ष्य । त्वंपद जीवलक्ष्य ग सखुगडणी० ।
दोहींचें दोहींचें ऐक्य होय । सांडीतां वाच्यपक्ष ग सखुगडणी
॥५८॥
तेजस्वी तेजस्वी कृष्ण माझा । निस्तेज जग सारें ग सखुगडणी
।
सद्भावें सद्भावें घेतां नाम । नाशतें अघ सारें ग सखुग०॥५९॥
वीणा घेउनी करी । बाई गोविंद मुखीं गाऊं ग ।
जीतांची ब्रह्मपदीं । जन्म मृत्यु तोडोनि जाऊं ग । मोहन०
॥७६०॥
रडतां रडतांचि । बाई पांजरा झाली तनु ग ।
तिसही जाळावया । आला हा उद्धव भानू ग । मोहन० ॥६१॥
नको नको ही म्हणतां । बाई झडप घाली हरी ग ।
यशोदे आजि याला । बांधोनि ठेवीन मी घरीं ग । मोहन०
॥६२॥
रडतां गेलों आह्मी । बाई मथुरे कुब्जा हांसे ग ।



हें काय बरें सांगा । तुह्मी उद्धवा! कृष्णा ऐसें ग । मोहन०
॥६३॥
पिवळा पितांबर । बाई आज मी नेसवीला ग ।
जाऊनी झाडावरी । फाडुनि हरिने आणिला ग ।
मोहन०॥६४॥
तें तें म्हणुनी जरी । दाखविलें अंगुली निर्दिष्ट ग ।
तरी तें तैसें नोहे । यास्तव सेवि सद्गुरू श्रेष्ठ ग । मोहन०
॥६५॥
ईश्वर माझा सखा । साधक अज्ञानाचा ।
सद्गुरू सत्ताबळें ग बाई । प्रकाश विज्ञानाचा ॥६६॥
बंधन बंधन देहबुद्धी । मुक्तता ब्रह्मपण ग सखुगडणी ।
श्रीहरी श्रीहरी भजतां प्रेमें । चित्तीं ये नारायण ग सखु०॥६७॥
बुद्धि ती बुद्धि ती देहरूप । चित्त तें देशमात्र ग सखुगडणी० ।
सद्गुरू सद्गुरू कृपाबळें । श्रवण साम्य पात्र ग सखुगडणी०
॥६८॥
आधार नारायण । बाई आधेय विश्वसार ग ।
सद्गुरुकृपा होतां । एकी एकत्वें ॐकार ग । मोहन० ॥६९॥
रमतां विषयातें । बाई रमण चुकू नका ग । (य४-७०)
गोविंद नांव घेतां । जीव होतसे ब्रह्मीं एक ग । मोहन०
॥७७०॥
कारुण्य कारुण्य अभ्यासितां । धारणा ध्यान साधे ग

सखुगडणी ।

पुढील पुढील शांतिरसें । सुखसमाधी बोधे ग सखुगडणी० ॥७१॥

टाकुनी टाकुनी अहंकृती । टाळी द्या रामनामीं ग सखुगडणी० ।

शब्दाचा शब्दाचा साक्षी होत । जीवंत मोक्षधामीं ग सखुग०॥७२॥

रंगतां रंगतां हरीपायीं । हरिची होय देह ग सखुगडणी० ।

गोष्पद गोष्पद सम वाटे । एवढा भवडोह ग सखुगडणी० ॥७३॥

वेगीं या वेगीं या नारायणा । आयुष्य आहे थोडें ग सखुगडणी० ॥

वाटतें वाटतें जीवेंभावें । घेऊं त्वन्नामिं गोडी ग सखुगडणी० ॥७४॥

यावया यावया नरजन्मीं । आत्महितार्थ गूढ ग सखुगडणी० ॥

परी तो परी तो सोडुनि जन । होताती विषयमुढ ग सखुग०॥७५॥

रूपत्रिपुटीमाजीं । बाई व्यवस्था ऐसी व्हावी ग ।

हृदयीं स्थूळध्यानें । गति ब्रह्मांडावरी जावी ग । मोहन० ॥७६॥

शरीर भाव येतां । बाई मिळावे सगुणांत ग ।



अंतर जातां वृत्ती । साह्य न्यावा श्रीसद्गुरु नाथ ग ।

मोहन०॥७७॥

घट शरावामध्यें । मृत्तिकासाम्य आहे ग ।

तैसेंचि ब्रह्म भूतीं । भूतपणानें साम्य नोहे ग । मोहन० ॥७८॥

सांख्यानें सांख्यानें ब्रह्म (आत्म) श्रद्धा । योगानें वृत्तिरोध ग सखु०।

वेदांत वेदांत अभ्यासीतां । सर्वत्र बह्मबोध ग सखुगडणी ॥७९॥

गोविंद गोविंद नाम गातां । गोविंदमय वृत्ती ग सखुगडणी ।

क्षण एक क्षण एक स्थिर होतां । गोविंद सर्वांभूतीं ग सखु० ॥७८०॥

विषय विषय तमोमय । इंद्रिय रजोगुण ग सखुगडणी ।

चित्त तें चित्त तें सत्त्व वृत्ति । आत्मा याहुनी निर्गुण ग सखु०॥८१॥

*अनाहत नादापासून वेदोत्पत्ती*

*स्वतःप्रामाण्य*

नादाच्या नादाच्या उत्कर्षानें । श्रुतीचा प्रादुर्भाव ग सखुगडणी ।

त्याविण त्याविण अन्यशास्त्रा । स्वतःप्रामाण्याऽभाव ग सखु०॥८२॥

सांख्यानें सांख्यानें व्यतिरेक । योगानें स्थिर होणें ग सखुगडणी

वेदांतें वेदांतें विश्व सारें । ब्रह्मान्वय पाहणें ग सखु०॥८३॥(य४-७१)

नामानें नामानें पापनाश । ध्यानानें एकाग्रता ग सखुगडणी० ।
ज्ञानानें ज्ञानानें जीवन्मुक्ती । सिद्ध हीस श्रुतीता ग
सखु०॥८४॥
चौघडा चौघडा वाजे द्वारीं । जागवी गांवलोकां ग सखुगडणी०
।
जागे व्हा जागे व्हा उभा काळ । सद्गुरु मारी हाका ग
सखु०॥८५।
(य४-७१) सोडवी सोडवी नारायणा । संसारीं जाच बहु ग
सखु०।
मागतां मागतां दैन्यवाणें । जाळी हा रिपु मोह ग
सखुग०॥८६॥
नंदन यशोदेचा । कालिंदितीरीं खेळे ग ।
पाहुनी गोपीकांनां । गोपाळासह मिळे ग । मोहन० ॥८७॥
नामाला नामाला शब्दभाव । रूपाला ध्यानयोग ग सखुगडणी ।
ज्ञान तें ज्ञान तें अपरोक्ष । प्रेमाने सौख्यभोग ग सखुगडणी
॥८८॥
सद्गुरु सद्गुरु ज्ञानदाता । रक्षक संतगण ग सखुगडणी ।
श्रीकृष्णीं श्रीकृष्णीं प्रेम देतां । जीवातें ब्रह्मपण ग सखु०॥८९॥
मोकळें मन होतां । बाई मोकळें सारें जग ग ।
बंधन कोठें नाहीं । सद्गुरुपायाचा अनुराग ग । मोहन०
॥७९०॥





ॐकार ॐकार श्वासामध्यें । गोविंद मुखीं गावा ग
सखुगडणी० ।
मनानें मनानें कृष्ण ध्यातां । ब्रह्मत्व मिळे जीवा ग
सखुगड०॥९१॥
ज्ञानेश शिरावरी । श्रीकृष्ण हृदयांत ।
मग कोपल्या महाकाळ ग बाई । सर्वथा नव्हे घात ॥९२॥
ज्ञानेश ज्ञानेश तात माझा । श्रीकृष्ण प्रिय कांत ग सखुगडणी०
।
दृश्य तें दृश्य तें द्रष्टृरूप । ब्रह्मणीं तो एकांत ग सखुग०
॥९३॥
पंढरपुरामध्यें । बाई कान्ह्याचा कल्ला होतो ग ।
नुतन ऋतुस्नात । बाई रुक्मिणी चुडा लेते ग । मोहन० ॥९४॥
देखिला डोळेभरीं । हृदयीं रामराणा ग सखुगडणी० ।
पावलें पावलें नादध्याना । पावलें नादध्याना ॥९५॥
सत्पदीं नामखेळ । चित्पदीं कृष्णमूर्ती ।
स्वानंद स्वभावानें ग बाई । दोघांची एक प्रीति ॥९६॥
ईश्वर प्रणिधान । योगें सांगति पतंजली ग ।
गोकुळ वृंदावनीं । तेचि समाधी बाह्य आली ग । मोहन०
॥७९७॥
जोंवरी देहभाव । प्रेम तोवरी सांडूं नये ग ।
पाहुनी कृष्णमूर्ती । जीवें कृष्णचि व्हावें स्वयें ग । मोहन०

॥९८॥

सकळ सकळ माझें गोत । नांदतें अलकावतीं ग सखुगडणी०

।

वैकुंठी वैकुंठी नाहीं प्रीति । वैकुंठी नाहीं प्रीति ॥९९॥

सकळ सकळ श्रोतृपाया । ऐसीच विनवणी ग सखु०। (य४-७२)

म्हणावा म्हणावा चक्रपाणी । म्हणावा चक्रपाणी ॥८००॥

चाराया जासी गाई । रुतती कांटें पायीं ।

म्हणोनि चित्त कृष्णा ग बाई । शोकातें भावें घेई ॥१॥

हांसणें हांसणें आणि क्रीडा । पाहणें नेत्रभरी ग सखुगडणी० ।

कपट कपट भुलवी नारी । कपट भुलवी नारी ॥२॥

सृष्टि ही नादमय । बाई जीव तो बिंदुरूप ग ।

माया ती कळामयी । ब्रह्म सगुण चित्स्वरूप ग । मोहन० ॥३॥

बाई हांसणे नाममय । बाई पाहणे बिंदुध्यान ग ।

क्रीडण सर्वकळा । एक ब्रह्मचि कृष्णाकार ग । मोहन० ॥४॥

शारीरसूत्री व्यास । ब्रह्मचि उपास्य सांगे ग ।

तैसा नोहे हा जीव । मुक्ता कर्तृत्व तें न लागे ग ॥५॥

बाई सद्गुरु वाक्यामध्यें । सर्व शास्त्रें ती झाली चोर ग ।

हांसण्या खेळण्यानें । देह होतसे कृष्णाकार ग । मोहन०

॥८०६॥

प्रत्यक्ष अनुभव । बाई पाहावा आतां डोळां ग ।

अंजुळीमध्यें घ्यावा । नीलवर्ण हा नभगोळा ग । मोहन० ॥७॥

६१



बोलिल्या बोलण्याची । सर्व संत ते करा क्षमा ग ।

वानिता बुद्धिबळे । नाही वक्तृत्व सामर्थ्य आह्मा ग । मोहन०

॥८॥

सकळ अनुभव । वाहूं सद्गुरुपायावरी ग ।

जन्मोजन्मी ते पाय । निष्कामचि ठेवूं शिरीं ग । मोहन० ॥९॥

उतराया मृगजळ । बांधल्या कोणी नावा ग ।

तैसें ह्या सृष्टीमध्यें । नाहीं बद्धमोक्षाचा ठेवा ग ॥८१०॥

साधु आणि पापीया । बाई समान ज्याची दृष्टी ग ।

त्याचिया मागें पुढें । हरि धांउनी करी गोष्टी ग । मोहन०

॥११॥

शब्दाची शक्तिवृत्ति । बाई आकाशियाचा गुण ग ।

लक्षणा बुद्धिबळें । दोन्हि मायिक युक्तज्ञान ग । मोहन० ॥१२॥

बाई मायेला ओळखतां । बाई मायचि नाहीं होय ग ।

निर्गुण सगुणानें । एक हृदयीं गुरुपाय ग । मोहन०॥१३॥

सकळ ध्यानमूर्ति । ध्यानींच आटताती ।

मोहन कृष्ण माझा । हालतां नये पाती ।

हरीनें मुरली वाजविली कोणीकडे ।

रमलं ग माझं मन । चंद्रभागेच्या पलीकडे ॥१४॥

इतर लेंकरें तीं । वरिष्ठ तुमची देवा ।

सान मी कन्या मज ग बाई । स्वपायावरी ठेवा ॥१५॥

भ्रतार ऐसा केला । त्रिभुवना विटले मन ग ।

बाई वृत्तीच्या पाळण्यांत । बाई निजविलें अवघे जन ग ।
मोहन०॥१६॥
मधूर मधूर हरीनामें । गातातीं वेदश्रुती ग सखुगडणी० ।
वर्णिती वर्णिती मुनि कीर्ति । वर्णिती मुनि कीर्ति ॥१७॥
सुलभ सुलभ हरिनाम । अन्यत्र नाना कष्ट ग सखुगडणी० ।
बोलीले बोलीले ऋषि स्पष्ट । बोलीले ऋषि स्पष्ट ॥१८॥
ज्ञात्वैवं ज्ञात्वैवं संकेतेन । द्रष्टादृश्ययोरैक्यं ग सखुगडणी० ।
लक्ष्यैत्वा लक्ष्यैत्वा महद्वाक्यम् । लक्ष्यैत्वा महद्वाक्यम् ॥१९॥
श्रीकृष्ण श्रीकृष्ण स्वयं वरी । जयांचे आगमन ग सखुगडणी० ।
त्याना हो त्याना हो ब्रह्मज्ञान । त्याना हो ब्रह्मज्ञान ॥८२०॥
वेदांच्या वेदांच्या संहितेंत । ईशावास्यादि मंत्र ग सखुगडणी० ।
सर्वदा सर्वदा ब्रह्मतंत्र । सर्वदा ब्रह्मतंत्र ॥२१॥
पुरुष पुरुष देहीं वीर्य । विराट पत्निभाव ग सखुगडणी ।
म्हणूनी म्हणूनी श्रुति सिद्ध । पति हा वासुदेव ग सखु०॥२२॥
उत्क्षेप उत्क्षेप आणिक अवक्षेप । आकुंचन गमन ग सखुगडणी ।
पांचवें पांचवें प्रसारण । पांचवें प्रसारण ॥२३॥
भूम्यंब्वग्न्यनिलख(१) । दिक्काल आत्मा मन ग सखुगडणी ।
नव द्रव्य नव द्रव्य अभिधान । नव द्रव्य अभिधान ॥२४॥

*(१. भूमि,अंब,अग्नि,अनिल,ख)*

द्रव्यगुण द्रव्यगुण कर्मजाती । विशेष समवाय ग सखुगडणी ।

६२



सातवें सातवें शून्य होय । सातवें शून्य होय ॥२५॥
बाई कोणि पुत्र धन । तुज मागती बहु माय ग ।
मज नको तें कांहीं । परि दावि ते हरिपाय ग । मोहन०॥२६॥
सकळ आनंदाचें । सद्गुरु अधिष्टान ।
तयाच्या शब्दबळें ग बाई । होतसे ब्रह्मी स्थान ॥२७॥
सद्गुरु कृपाबळें । कृष्णार्धांगीं बैसावें । (य४-७४)
मग हें विश्वसारें ग बाई । तद्रूपीं आकर्षावें ॥२८॥
इतर इतर अरण्यात । फिरती यती नाना ग सखुगडणी० ।
कालिंदी कालिंदीं वृंदावनीं । श्रीकृष्ण कांत राणा ग सखु०॥२९॥
क्षिप्तादि भूमि सप्त । भक्तीनें सिद्ध होती ।
आकृष्ट निर्गुणभाव ग बाई । कांत तो कृष्णमूर्ती ॥८३०॥
राम तो सोहंरूप । श्रीकृष्ण नादमय ।
सगुण ज्ञानेश्वर ग बाई । व्यापुनी राही त्रय ॥३१॥
संतांच्या संतांच्या वचनानें । बाई फळलें नंदतप ग सखुगडणी० ।
अवतरले अवतरले विष्णुदीप । अवतरले विष्णुदीप ॥३२॥
बाई माझा राजबिंड राजबिंड । गोकुळी अवतार ग राधे ।
पाहुनी रूपा तया । मोहीत होती ग राधे ॥३३॥
प्रणव-वाच्य ब्रह्म ग राधे । अत्यंत निराकार अत्यंत निराकार ।

गोकुळी तें साकार ग राधे । गोकुळीं तें साकार ॥३४॥
जयाच्या आम्ही दासी बाई दासी । तोचि हा चित्तीं नांदे ।
वारूनी बंध मोक्ष बंध मोक्ष । प्रेमानें उगी नांदे ग राधे ॥३५॥
सुदीन सुदीन उगवला । गगनी नित्य दिवो ग सखुगडणी० ।
नांव ठेवीलें नांव ठेवीलें वासुदेव । नांव ठेवीलें वासुदेव ॥३६॥
योगीयांचा राणा । बाई ब्राह्मण जेथ आहे ग ।
रक्षिता क्षत्रीय तो । नरस्वरूपी राहे ग । मोहन० ॥३७॥
ब्राह्मण क्षत्रीयांची । मिळणी एकाकारी ग ।
संजय म्हणे राया । तेथ गुढी जय उभारी ग । मोहन० ॥३८॥
कोवळ्या मूर्तिसाठी । बाई कोवळें व्हावें मन ग ।
श्रीहरि गर्भी येतां । नको श्रम तो अधिष्ठान ग । मोहन०
॥३९॥
प्रभात प्रभात काळ होतां । चाराया जासी गाई ग सखुगडणी ।
वनांत वनांत अन्न द्याया । दुसरे कोणी नाही ग
सखुगडणी॥८४०॥
अंतर अंतर विष्णुरूप । बाहेरी इंद्रमय ग सखुगडणी ।
आकाश आकाश तात माझा । कनवाळु मही माय ग
सखु०॥४१॥
राम तो राम तो चापपाणी । सर्वांते हितकर्ता ग सखुगडणी ।
त्वत्तात त्वत्तात वेणुपाणी । आपुले जठरभर्ता ग सखु०॥४२॥(य४-
७५)





तुमच्या पितयाची । बाई अवश्यकता नाहीं ग ।
यवना भेणे पळे । त्याला स्मरोनि आजि काई ग । मोहन०
॥४३॥
यवन वारुनिया । योनि ही चुकवितां ग ।
राम सखा तो माझा । त्याची गाऊं शुद्ध कविता ग
मोहन०॥४४॥
जडाला जीववीता । बाई चेतन तोचि जाणा ग ।
चेतनीं अंश मानी । तो तो चढे देहाभिमान ग । मोहन०॥४५॥
राम तो राम तो रमवि जीवा । कर्षण कृष्ण करी ग
सखुगडणी०।
दोन्ही ही दोन्ही ही अधिष्टानी । एकत्व ज्ञानेश्वरी ग
सखु०॥४६॥
सर्वही सर्वही मिळोनिया सद्गुरु नाथ माझा ग सखुगडणी० ।
अर्पिली अर्पिली कविता त्याला । जो आळंदीचा राजा ग ।
सखु०॥४७
अर्पुनी नाशिवंत । बाई अविनाश हें घेणें ग ।
सेवा न करितां उलटी । श्रीगुरुचि नागवणें ग । मोहन०
॥४८॥
ऐसेंही असोनिया । आम्ही सेवक म्हणवितो ग ।
परि हें उदारत्व । गुरु ब्रह्मत्वें घडवीतो ग । मोहन० ॥४९॥

*मनाचा कारभार*

राजाच्या समोरची । चाकर करी घात ।
तरि हे दुर्बलत्व ग बाई । रायाच्या आंगीं येत ॥८५०॥
तेवीं तूं पहासी मना । आणि तें करी घात ।
तरी हें लांछनचि ग बाई । तुझीया जीवीं येत ॥५१॥
चोराच्या हातीं राजा । दिलीया नागवण ।
तैसा तूं पंगु झाला ग बाई । अधिकारी करुनी मन ॥५२॥
मनाचा कारभार । आपुल्या करीं घेई ।
मन न वळवितां ग बाई । मनची पडल पायीं ॥५३॥
दर्पणीं न पाहतां । मुखत्वीं जैसे मुख ।
करुनी प्रेम तैसा ग बाई । भेटीचें भोगी सुख ॥५४॥

*सत्संगतीं*

मुखची पाहावया । दर्पण साह्य घ्यावें ।
तैसि घ्याया हरिभेटी ग बाई । सत्संगतीं मिळावें ॥५५॥
आपुलें मुख जैसें । दर्पणामध्यें वसे ।
तैसा स्वहृदयस्थ ग बाई । सत्संगें डोळां दिसे ॥५६॥
नाशाया कलीमान । व्यवहार उलटाही । (य४-७६)
जगांत करूं तरी ग बाई । न मोडूं नीती कांहीं ॥५७॥
मातृत्वदृष्टीमुळें । वेश्येचा घेणें मुका ।
परी ते विपरीत ग बाई । वाटत जैसें लोकां ॥५८॥
तैशाचि व्यवहारें । निंदकां विस्मयांत ।
टाकुनी निज-जना ग बाई । नेऊं वृंदावनांत ॥५९॥

६४



ज्या स्थळीं स्थीर पाणी । तेथेंचि डोहो पडे ।
प्रेमाच्या विनोदानें ग बाई । तैसाचि प्रेम वाढे ॥८६०॥
रााक्षसा पळवुनी । तारणें इंद्रादिकां ।
हें त्याच्या भावनेंनें ग बाई । हरि तो पूर्ण निका ॥६१॥
सर्वांचा पिता ऐसी । मायापेक्षें गरीमा ।
अनाथा माझ्या रूपीं ग बाई । नाहीं हें नातें सीमा ॥६२॥
अज्ञान मारावया । ज्ञानची एक थोर ।
तें कैसें पुससी जरी ग बाई । तरी तें तवान्तर ॥६३॥
आपुली प्रसन्नता । हरिसुखा मेळवावी ।
मग प्रियप्रियभाव ग बाई । एकत्वें आकळावी ॥६४॥
गोष्पद हा संसार । भ्रमिष्टांचें बोलणें ।
ऐलचि तीरीं माया ग बाई । नाहीं हें गुरु म्हणे ॥६५॥
चाराया जासी गाई । रुतती कांटे पायीं ग ।
तुम्हां पुरती काय । आमुच्या हृदयीं जागा नाहीं ग ।
मोहन०॥६६॥
जेवीतां तिखट खारें । बाई आंतड्याला न रूपे ग ।
मूर्ति हे सकुमार । काय आमुच्या चित्तीं खुपे ग ॥६७॥
गेलासी सोडोनीया । आम्हां पाहोनि रात्रवेळ ग ।
त्यजुनी पति आलो । दिलें काय त्याचें हें फळ ग । मोहन०
॥६८॥
रज्जुत्व सर्पत्वाचा । आश्रय रज्जू आहे ग ।

म्हणोनि दीप व्हावा । जेणें सर्पत्व भ्रम न साहे ग । मोहन०
॥६९॥

विद्या अविद्या तैसी । दोन्ही राहति सामान्यांत ग ।
म्हणोनि विशेष भक्ती । व्हावि अविद्यानिरसनार्थ ग ।
मोहन०॥८७०॥

विशेष देव कोणी । जरि असेल हृदयांत ग ।
तरि गा त्याचे गूण । मग आह्मीही गाऊं गीत ग । मोहन०
॥७१॥

मुमुक्षा जरी झाली । द्विविध तिचें रूप ग । (य४-७७)
स्वतःसिद्ध एक । एक परवाक्यानुताप ग । मोहन० ॥७२॥

चंद्राचि शीतळता । बाई शोभते आंधारांत ग ।
सद्गुरु शीतळ माझा । असुनी अनुतापवंत ग । मोहन० ॥७३॥

सूर्याच्या उष्णतेने । जळ अवघे आटुनी जाय ग
गुरूच्या उष्णतेनें । नेत्रभरुनी पाणी राहे ग । मोहन० ॥७४॥

अग्नीमध्यें जळतां । राख तरी ती उरे ग ।
सद्गुरुज्ञानाग्नीत । द्वैत जळतां कांहीं न उरे ग । मोहन०
॥७५॥

म्हणुनी सूर्य चंद्र । अग्नी मिळुनी तिन्ही ग ।
जया न भासविती । गुरुकृपें त्याचि मी राणी ग । मोहन०
॥७६॥

लाजुनी श्रीकृष्णांतें । आज जेवण नाहीं झालें ग ।



म्हणुनी तातगृहीं । नित्य ज्ञानेश्वर मी बोले ग । मोहन० ॥७७॥

ज्ञानामृतभोजन । द्याया लागती ज्ञानेश्वर ग ।
यशोदे तुझा सुत । व्हावा प्रेमाच्या शय्येवर ग । मोहन० ॥७८॥

गुरु परब्रह्म जैसा । शिष्यही तैसा जाण ग ।
मग काय गाइलें त्वां । अधिक गुरुगुण ग । मोहन० ॥७९॥

ब्रह्माचें अज्ञान तें । ब्रह्माकडुनी न जाय ग ।
सद्गुरु सर्व वारी । म्हणुनी तो श्रेष्ठ होय ग । मोहन० ॥८८०॥

सांडोनि श्रुतीशास्त्रें । संसारीं ज्याचें मन ।
ते येथ पशुसम ग बाई । परत्रीं कीटक जाण ॥८१॥

जीवासी जन्म कैसा । कैसें कर्म हें बाधे तया ग ।
दृष्टान्त सिद्धान्तांनीं । यांचि ऐकावी ती प्रक्रिया ग ।
मोहन०॥८२॥

*श्लोक*

*"स्वप्ने यथा पश्यति देहमीदृशं मनोरथेनाभिनिविष्टचेतनः ।*
*दृष्टश्रुताभ्यां मनसानुचिंतयन्प्रपद्यते तत्किमपि ह्यपस्मृतिः ॥"*

जन्मासी अधिष्ठान । कोणतें उपादान ।
प्रेरक कोण येथ ग बाई । कीजे तें निरूपण ॥८३॥

*श्लोक*

*यतो यतो धावति दैवचोदितं मनो विकारात्मकमाप पञ्चसु ।*
*गुणेषु मायारचितेषु देह्यसौ प्रपद्यमानः सह तेन जायते" ॥*

जोवरीं लिंगदेह । तोंवरी आत्मा पाही ।

कर्मी वा भोगी तरी ग बाई । शरीराविण नाहीं ॥८४॥

*श्लोक*

*"देहे पश्यत्वमापने देही कर्मानुगोऽवशः ।*

*देहान्तरमनुप्राप्य प्राक्तनं त्यजते वपुः"॥*

सांडूनी अनुमान । प्रत्यक्ष दृष्टांतानें ।

जन्माची सिद्धि होय ग बाई । आत्मत्वीं होतां ठाणें ॥८५॥

*श्लोक*

*"देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।*

*तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति" ॥ गीता.*

आत्म्याचें जाणें येणें । घडते ज्या पद्धति । (य४-७८)

दृष्टान्त देऊनियां ग बाई । सांगू ती शुद्ध रीती ॥८६॥

*श्लोक*

*"वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।*

*तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही"॥*

जन्म खंडन व्हाया । श्रुति उपाय सर्व सांगे ग ।

परि आह्मां दुर्दैवानें । सिद्ध जन्मचि करणें लागे ग ।

मोहन०॥८७।

अज्ञानीं अज्ञानीं देहगर्व । ज्ञानीं ब्रह्माभिमान ग सखुगडणी ।

करितां करितां कृष्णभक्ती । सर्वथा निरभिमान ग सखु०॥८८॥

अज्ञानीं अहंभाव । बाई सोहं कठीण ज्ञानीं ग ।





श्रीकृष्ण प्रेमामध्यें । मिळे अनिर्वाच्यता गुणीं ग । मोहन०

॥८९॥

समुद्रीं मिळूनिही । नदी न तुटुनी जाय ।

म्हणुनी प्रवाहाचें ग बाई । गोडसें पाणी होय ॥९०॥

तैसें होवोनी ज्ञान । हरिभक्तीचा लोट राहे ।

प्रेमळ तोचि जगा ग बाई । मुक्ति दे लवलाहे ॥९१॥

सोन्याचि आवडी ती । बाई अलंकाराच्या साठीं ग ।

तैसें हें ब्रह्मज्ञान । बाई श्रीकृष्णप्रेमापोटीं ग । मोहन० ॥९२॥

सकळ ही कविता । ज्ञानेश्वरी अर्पण ।

श्रोतिया शुद्ध जना ग बाई । मिळो का प्रेमपण ॥९३॥

झालिया पट्टराणी । जेवि करिते कांतसेवा ग ।

मुक्तही होवोनियां । तेवि स्मरती वासुदेवा ग । मोहन० ॥९४॥

संसारी असोनीही । जया चैन न तेथ वाटे ग ।

तयाच्या मार्गांतील । गुरु काढीती हस्तें काटे ग । मोहन०

॥९५॥

तैसेची मुक्तजन । आणिक सिद्ध जाण ।

परि त्यांत दुर्लभ ग बाई । तो विष्णुपरायण ॥९६॥

देव तो देव तो धर्माघरीं । उच्छिष्ट पात्रें काढी ग सखुगडणी ।

श्रीगुरु श्रीगुरु त्याहुनी श्रेष्ठ । आमुचे मळ झाडी ग

सखु०॥९७॥

देव तो देव तो अभिमानी । भजनाविण न दिसे ग सखुगडणी ।

सद्गुरु सद्गुरु आह्मांसाटीं । मानवलोकीं वसे ग सखुगडणी ॥९८॥

देव तो देव तो तीर्थोतीर्थी ।

बैसला होउनी जड ग सखुगडणी । (य४-७९)

सद्गुरु सद्गुरु आह्मांसाठी । उघडी प्रेमाचीं कवाड ग सखु०॥९९॥

देवाच्या देवाच्या सामर्थ्यानें । वैकुंठी मेल्या जाणें ग सखुगडणी ।

सद्गुरु सद्गुरु कृपावशें । पायातळीं हरि येणें ग सखुगडणी॥९००॥

गुरूच्या गुरूच्या कृपाकरीं । चवदाही विद्या येती ग सखुगडणी ।

देवाच्या देवाच्या करीं दोही । शंखाचे नाद होती ग सखुगडणी॥१॥

देव तो आंधळ्याचा । हात धरोनि नेतो ग ।

सद्गुरु धरितां कर । बाई आंधळ्या डोळे देतो ग । मोहन० ॥२॥

देवाच्या पितृपणीं । बाई इंदिरा दुजी माय ग ।

सद्गुरु नाथ माझा । झाला आपण बापमाय ग । मोहन० ॥३॥

(१)देवपुत्राच्या संगें । बाई लागतां नरकीं जाती ग ।

गुरुपुत्राच्या संगें । चारि मुक्ति त्या दासी होती ग । मोहन०

(१)मदन

६७



॥४॥

सद्गुरु श्रेष्ठ माझा । येथें नाहींच अर्थवाद ग ।

पहा जयाच्या कृपें । माझीं वाणी निघे अबाध ग । मोहन० ॥५॥

सद्गुरु ओळखुनी । पुढें खुंटल बोलण ग ।

कविता कवीसह । पायीं केली ही समर्पण ग । मोहन० ॥६॥

माझिया भातामध्यें । बाई तिखट आहे बहु ग ।

झालिया जेवण माझें । तुह्मां घालते गोड जेऊं ग । मोहन० ॥७॥

सर्वही सुख तेथें । जेथें राहति कृष्णबाळ ग ।

प्रसंग होतां प्राप्त । चरण तोही वंदितो काळ ग । मोहन० ॥८॥

हृदयीं धरूं देव । बाई मस्तकीं ठेवूं गुरू ग ।

डोळ्यानें पाहूं साधू । जनां ब्रह्मत्वें नमस्कारूं ग । मोहन० ॥९॥

होउनी जीवन्मुक्त । सदा क्रीडती साधूजन ग ।

तयांच्या खेळासाटीं । लळा पाळितो नारायण ग । मोहन० ॥९१०॥

झालिया जीवन्मुक्त । बाई विदेहमुक्ती भावी ग ।

श्रीकृष्णरूपीं ऐसी । स्थिति नयेचि भावाभावी ग । मोहन० ॥११॥

दहीं दूध खाऊं खाऊं । बाई वदन स्निग्ध झालें ग ।
म्हणुनी कृष्ण येथें । बाई कढी प्यावया आले ग । मोहन०
॥१२॥
फिरतो व्रजामध्यें । बाई नंदगृहीचा सोट ग ।
विनोद करी ऐसा । हांसू हांसुनी दुखवी पोट ग ॥१३॥
कोवळ्या मूर्तिसाठीं । जानकीं लंके गेली ग सखु० । (य४-८०)
प्रतिज्ञा प्रतिज्ञा श्रीरामाची । सुरकार्यार्थ सिद्ध केली ग
।सखु०॥१४
श्रीराम श्रीराम सद्दर्शन । कोवळें व्हावें मन ग सखुगडणी० ।
मस्तकीं मस्तकीं सुनमन । मस्तकीं सुनमन ॥१५॥
जेवितां जेवितां तिखट खारें । राजाला योग्य नाहीं ग ।
म्हणुनी म्हणुनी षड्रसान्न । सेवुनी तृप्ति घ्यावी ग सखु० ॥१६॥
श्रीकृष्ण स्वयंवरीं । श्रीराम श्रेष्ठराणा ग ।
लाजवी श्रीकृष्णाला । करी दावुनी धनुष्यबाणा ग । मोहन०
॥१७॥
श्रीकृष्णलग्नासाठीं । स्त्रीपत्रें नगरी धुंडी ग । मोहन० ।
श्रीराम सीता पर्णी । सभेमाजी कोदंड खंडी ग । मोहन०
॥१८॥
विवर्त तो द्विविध । अध्यस्त अनध्यस्त ग ।
अध्यस्त विश्व सारें । अस्मत्कान्त तो अनध्यस्त ग ।
मोहन०॥१९॥





वियोगदशेमाजी । रागाची वृद्धि पाही ।
म्हणोनी कृष्णमनीं ग बाई । उपेक्षा कधींही नाही ।
मोहन०॥९२०॥
चौरंगीं डोलाऱ्यांत । निजविला घनश्याम ।
पहाती येउनी गोपी । सोडुनी गृहकाम ग । मोहन० ॥२१॥
कोंवळ्या संयोगानें । कोंवळें होय मन ग ।
कोंवळ्या संतासंगें । प्रेमाही समाधान ग । मोहन० ॥२२॥
नवरी सदना येतां । पाउली जंव जंव चाले ग ।
तंव तंव पतिपक्षाचें । कुळपण अंगीं आलें ग । मोहन० ॥२३॥
तैसाचि भक्तीपंथें । जंव जंव चढे जीव ।
तंव तंव कृष्णसंगें ग बाई । जगीं आणी गोत्रभाव ॥२४॥
आधींच बंध नाहीं । मुक्तचि विश्व सारे ।
परि एक उरलें आहे ग बाई । हरिचरणीं प्रेमवारे ॥२५॥
आजीच्या सुखाहुनी । भक्ति त्वां श्रेष्ठ केली ।
कळलें अनुमान ग बाई । वृत्ती जैं फाफावली ॥२६॥
सुरतीं प्रेमेक्षण । बाई भोजनीं प्रहसन ग ।
निद्रेंत विहरण । सुख ऐक्याचि भक्ति खूण । मोहन० ॥२७॥
चोरुनी तुमचा पिता । करी भीमकी नय । (य४.८१)
कोदंड भंगूनी रामें ग बाई । केलासे भूप जय ॥२८॥
सद्गुणीं आरुढ । श्रीराम माझा जाण ।
श्रीकृष्ण तुमचा पिता ग बाई । अवगूणा अधिष्टान ॥२९॥

रामाचें सत्यपण । वाणीति सर्व जन ।
श्रीकृष्ण गुणग्राही ग बाई । कोण आहेती सज्जन ॥९३०॥
उचलोनी गोवर्धन । श्रीकृष्ण मिरवी थोरी ।
श्रीरामदूत बळें ग बाई । उचलीत द्रोणागिरी ॥३१॥
चमक नमकाची । करोनी भावैक्यता ।
सद्गुरुमुखांतुनी ग बाई । ऐकावी हरिकथा ॥३२॥
तो मज आवडता । जो नित्य करी थट्टा ।
चालवी अवघें जग ग बाई । नटन जैसें नटा ॥३३॥
सकळ योगीयांचा । राणा तो दीनबंधु ।
करोनि कृपा आम्हां ग बाई । मिळवावे सौख्यसिंधु ॥३४॥
बाळाचें कवतुक । करणें माउलीला ।
समानभाव जगीं ग बाई । पुरुष सावलीला ॥३५॥
द्रवल्या सद्गुरूच्या । पायीं हें शिर वाहा ।
मिळवोनि निजसुख ग बाई । हरिप्रेम धरूनी रहा ॥३६॥
वेग तो तीव्र व्हावा । टाकुनी भवदोषा ।
साधावें पूर्णतत्त्व ग बाई । हृदयीं आत्मतोषा ॥३७॥
धांवत येई रामा । माझी पाहुनी दीनसंज्ञा ग ।
करुनी मुक्त मज । देई स्वपादसेवे आज्ञा ग ॥३८॥
केवल तत्त्वामध्यें । अविद्या वाटे उणी ।
म्हणोनी शुद्ध ब्रह्म ग बाई । नयेचीं तें प्रमाणीं ॥३९॥
सकळ देवामध्यें । देव तो विष्णु मोठा ।





परि पाही अन्य करुनी ग बाई । आत्मत्वीं देह कोठा ॥९४०॥
देहाहुनीही आत्मया । वेगळें शीघ्र काढा ।
मनासी मिळवूं नका ग बाई । वास्तव्य जेथें मूढा ॥४१॥
जयाच्या वृत्तिलागीं । लागला कृष्णओघ ।
त्याला न मिळे कदा ग बाई । स्थान हें महाऽमोघ ॥४२॥(य४-८२)
नामावरी चित्त । जयाचें झालें दृढ ।
कल्पांतीं त्या न छळिती ग बाई । इंद्रिय महामूढ ॥४३॥
ळकार डकाराचा । वेदान्त सिद्ध होतो ।
"अग्निमीळें" या रीती ग बाई । उदाहरण देतो ॥४४॥
तरळ होवोनियां । कीर्तनीं राहे उभा ।
तयाच्या शिरीं नाचे ग बाई । यशोदा-गर्भगाभा ॥४५॥
टाकुनी सर्व कांहीं । ऐकावी कृष्णकथा ।
तयाला मग नाहीं ग बाई । विश्वप्रलयीं व्यथा ॥४६॥
ज्ञानीया अव्यक्ताची । गति ती दुःखदात्री ।
सद्भक्ता कृष्णमाय ग बाई । सगूण जगद्धात्री ॥४७॥
अव्यक्त व्याप्त सारें । विश्वची तया आंत ग ।
म्हणोनि सगुणमूर्ती । सोपी राहे हृदयांत ग । मोहन० ॥४८॥
अव्यक्तप्राप्तिसाठीं । कोंडिती योगी काम ग ।
गोपीकाप्रेमें सगूणी । कामचि दे मोक्ष धाम ग ॥४९॥
निर्गूण ब्रह्म ध्यातां । उपवास कष्ट बहु ग ।

सगूण श्रीकृष्णातें । निजहस्तें घालुं जेऊं ग । मोहन० ॥९५०॥
व्यतिरेक करितां योगी । सिद्धीतें भुलुनी जाती ग ।
श्रीकृष्ण भक्तियुक्तां । चारी मुक्ति दासी होती ग । मोहन० ॥५१॥
अज्ञानीं देहगर्व । ज्ञानीं ब्रह्माभिमान ।
श्रीकृष्ण सगूण स्मरतां ग बाई । त्वमहं हें होय लीन ॥५२॥
वैराग्य आणि ज्ञान । भक्तीच्या पोटीं येती ।
म्हणुनीयां संतजन ग बाई । श्रीकृष्ण सेवा घेती ॥५३॥
देव करी भक्तसेवा । भक्त देवा हृदयीं ठेवी ।
एकत्वें दोन्ही रूपें ग बाई । दिव्यत्वें हृदयीं भावी ॥५४॥
माहेर गुरुगृही । सासर कृष्णमूर्ती ।
अभेद म्हणुनी आजी ग बाई । रूपकीं नये स्फूर्ती ॥५५॥
सासर त्यागोनिया । माहेरीं जरी जाये ।
तरि तो कुळकीर्तीचा बाई । कलंकु अवघा होय ॥५६॥
मायेचें शिकवणें । नांदणें कन्येहातीं । (य४-८३)
रक्षण दोन्ही म्हणुनी ग बाई । पितृत्वें फावे पती ॥५७॥
इंद्राणीमुळें बाई । माहेर इंद्रस्थान ।
क्रीडाया आम्हासाठीं ग बाई । नंदनवृंदावन ॥५८॥
स्त्रीधर्मपणें बाई । पूजिते देवीदेवा ग ।
मागणें हेंचि तयां । वाढो आयुष्य वासुदेवा ग । मोहन०॥५९॥
देवि माते! आम्हांसाठीं । घाली उडी* येवढी ग । (*उंडी?)





गोपीका सोडुनी कृष्णा । नसो निजधामीं आवडी ग । मोहन.॥९६०
कोमळ बोलणें हें । बाई मोठ्यानें तरी बोला ग ।
स्पष्ट न ऐकूं येतें । काय म्हणतां घृत घाला ग । मोहन०॥६१॥
उपकार स्मरुनी तूज । जरि होणे उतराई ग ।
तरि मिळुनी घालूं जेऊं । हरिला धरुनियां बाही ग । मोहन.॥६२॥
आधी त्वांचि निजावे । मग संती जागवावे ।
उपकार ते मानोनिया ग बाई । उतराई कैसे व्हावे ॥६३॥
जागृती नित्य व्हावी । मनीं प्रीति पूर्ण यावी ।
धरुनियां गोपी कर ग बाई । राससौख्यीं बुडी द्यावी ॥६४॥
मनांत आल्यावीण । बोलेल कैसी वाणी ।
यास्तव मनोमय ग बाई । हृदीं ध्यावा चक्रपाणी ॥६५॥
जाणता अवगुणांचा । अवगुणी कैसा राहे ग ।
यास्तव सोडुनी हेतु । नंदनंदना वाहे ग । मोहन० ॥६६॥
माराया मिथ्या सर्प । कष्टवीसी कां देवा ।
घेउनी अर्धांगता ग बाई । करी शुद्धप्रेमें सेवा ॥६७॥
शिवाच्या माथां चंद्र । असत्य येथें नाहीं ग ।
आत्मानुभवी तैसे । बाई रूपक नको कांहीं ग मोहन० ॥६८॥
नेणत्या नाहींपणा । जाणसी जरी बापा ।

तरी तूं कृष्ण सेवी ग बाई । आतां सोडोनि सर्व तापा ॥६९॥
बाई आमुच्या हृदयीचें । ब्रह्मज्ञान तें तुम्हीं घ्यावें ग ।
कृपेनें हरिपाय । मज उसणें नित्य द्यावे ग । मोहन० ॥९७०॥
बाई हांसतां लज्ञा जाते । बाई रडतां कृपा लोका ग ।
म्हणुनी सत्संगांत । आम्ही कृष्णार्थ करूं शोका ग ।
मोहन०॥७१॥
(य४-८४) ज्ञानाच्या बळे तुम्ही । हांसा घेउनी ब्रह्मठेवा ग ।
श्रीकृष्णपायीं आम्ही । मिळवुं रडुनी प्रेमभावा ग ।
मोहन०॥७२॥
ऐकुनी नवे शब्द । जेवीं टाळीला मिळे टाळी ग ।
तैसा तो नित्यनवा । ध्यावा हृदयीं वनमाळी ग । मोहन०
॥७३॥
तुमच्या संगें देवा । आम्हां पुत्राची इच्छा नाहीं ग ।
सोडोनि झणी तुम्हां । देणे लागेल तया दहीं ग । मोहन०
॥७४॥
कोमळ पायासाठीं । बाई कोमळ केलें मन ग ।
तंव तें येवढें झालें । मन झालें कृष्णपण ग । मोहन० ॥७५॥
दर्शनें देवांचिया । बाई विषयद्वेष घडे ग ।
मनातें ध्यातां तया । विषयपणची कृष्णीं जडे ग । मोहन०
॥७६॥
हरिरूप हा संसार । घालिसी पायांतळी ग ।





मग काय हें मस्तक । कोरड्या ज्ञाना देशी बळी ग
।मोहन०॥७७॥
माझ्या तो ताटामध्यें । मिश्रित तेलभात ग ।
पोळेल जीभ देवा । दहीं देतील कीं तात ग । मोहन० ॥७८॥
बाई मुक्तीच्या साधनांत । कांहीं मोह न देहीं जडे ग ।
बाई कृष्णीं आमुचें मन । मोहानें होय वेडें ग । मोहन० ॥७९॥
म्हणोनि मुक्ति आणी । आम्हासीं विरोधता ग ।
मुक्त ते प्रारब्धाचे । आम्ही तो विष्णुकांता ग । मोहन०॥९८०॥
बाई भक्ति ही सखी होतां । मुक्ति मागत सुख तिसी ग ।
गृहस्थाघरीं जैसे । होती भिक्षुक ते संन्यासी ग ।
मोहन०॥८१॥
धीट या बोलण्याची । तुम्हीं ब्राह्मण करा क्षमा ग ।
मंत्रबळें व्हा सिद्ध । माझ्या कृष्णा नका देऊं श्रमा ग ।
मोहन०॥८२॥
कविता कवीसह । बाई अर्पिली ज्ञानेश्वरा ग ।
आतां मी लहान बाळा । फुटो कृष्णप्रेमाचा झरा ग ।
मोहन०॥८३॥
स्मरतां परंपरा । मिळावें तयांमाजीं ।
सेवाया मग कृष्ण ग बाई । जा गोपींच्या समाजीं ॥८४॥
आरंभ आणि अंत । येथें तो नाहीं काळ ।
कृष्णाच्या कंठामध्ये ग बाई । घालणें कळे माळ ॥८५॥

तिखट खातां खातां । माझ्या तोंडाची झाली होळी ग । (य४-८५)

म्हणोनि वासुदेवें । दिली उच्छिष्ट पुरणपोळी ग । मोहन० ॥८६॥

बाई असोनि मी लहान । माझा करिती कळवळा ग ।

म्हणोनि ताता तुम्ही । कृष्णा आशिर्वादार्थ वळा ग । मोहन० ॥८७॥

ज्ञानेश्वर माऊली । ऐसा देई तूं आशिर्वाद ग ।

सेवितां कृष्णनाथा । गोपीसवें न व्हावा वाद ग । मोहन० ॥८८॥

गोविंदचरण स्मरतां । संसारीं नाहीं भय ।

अंतर्बाह्य सगुण व्यापी ग बाई । कवळोनी भक्तहृदय ॥८९॥

माधव वनमाळा । घालोनी कंठी उभा ।

पाहतां दिव्यदृष्टी ग बाई । दिसते नभगाभा ॥९९०॥

वाङ् मन प्राण बुद्धि । आत्मा हे मिळुनी सारें ।

मिळवी जो मत्प्रेमार्थी ग बाई । तद्दासी मुक्ति बारे ॥९१॥

सनत्कुमारादीक बाई । मनाचे मांडे खाती ग ।

तें ब्रह्म गोपीमध्यें । खेळे होवोनि गौळीजाती ग । मोहन० ॥९२॥

बाई वेणूचें धन्य भाग्य । असुनी जड काष्ट ग सखुगडणी० ।





जियेच्या जियेच्या साठीं वनीं । श्रीकृष्ण करी कष्ट ग । सखु०॥९९३॥

पोकळ पोकळ ब्रह्मज्ञान । व्यर्थ तो भोग्यत्याग ग सखुगडणी० ।

नाकळे नाकळे जों श्रीरंग । नाकळे जों श्रीरंग ॥९४॥

राळ्याच्या अग्राहुनी । कोवळें हरिचें रूप ।

मधुभावें सेविती जे का । होति अपवर्गभूप ग । मोहन० ॥९५॥

प्रिय तो शार्ङ्धर । बाई प्रिया ती राधाराणी ग ।

दोघाच्या सेवेसाठी । पंचलतिका वाहे पाणी ग । मोहन० ॥९६॥

सदेवे सदेवेत्यादिवाक्यें । ब्रह्मणः परोक्षता ग ।

गृहित्वा गृहित्वा 'तत्त्वमसि' । जायतेऽपरोक्षता ग सखु०॥९७॥

काळ तो काळ तो बुद्धिग्राह्य । सर्वथा जड आहे ग सखुगडणी ।

स्मरतां स्मरतां ज्ञानेश्वर । आम्हां तद्भय नोहे ग सखु०॥९८॥

काळ तो काळ तो असूरमूर्ती । तत्सैन्य रोगीं गाढें ग सखुगडणी ।

टिकेल टिकेल कैसा सांगा । श्रीराम बाणापुढें ग सखु०॥९९॥

आपुल्या पितयाचे । वर्णिसी काय गुण ग ।

राधेस समजावितां । तव करि ती अधिक मान ग ।

मोहन गिरधारी० ॥१०००॥ (य४-८६)

बाई राधेच्या घरीं थोर । होतसे तुझा पिता ग ।
केवळ कामासाठीं । योगसिद्धि खर्चीत होता ग ॥१॥
पितया ऐसे सूत । मज लाजतां कळों आलें ग ।
तरि म्हणा श्रीराम । जो कां सीतेसी सदा बोले ग । मोहन०
॥२॥

भक्तिज्ञानसमुच्चय । बहु श्लोकीं निरूपिला ।
मुमुक्षूंसी भक्तियोग ग बाई । श्रुतिसंमति आणीला ॥३॥
श्रुतीच्या बळें आजी । मुमुक्षूभक्ति केली ।
सिद्धांसी भक्तियोग ग बाई । पुढील श्लोकीं बोली ॥४॥

*श्लोक / वामन पंडित*

''आत्माराम असे शुकादिक मुनी ज्यांचे अविद्यामय ।
ग्रंथी सर्वही सूटले जितचि जे मुक्त स्वयें अद्वय ।
भक्ति श्रीहरिची उगीच करिती तीही निमित्ताविण ।
कीं मुक्तीहुनि गोड फार असती श्रीमाधवाचे गुण'' ॥१॥

*ओवी*

सर्वांसी भक्ति आतां । बोलूं कीं अनुमानें ।
देऊनी नाना हेतु ग बाई । परि तें पामरा न माने ॥५॥

*श्लोक*

''निवृत्ततर्षैरुपगीयमानाद् भवौषधाच्छ्रोत्रमनोभिरामात् ।
क उत्तमश्लोकगुणानुवादात् पुमान्विरज्येत् विनापशुघ्नात्'' ।

७३



दुसऱ्यासाठीं पुरे । आतां हें निरूपण ।
आमुच्या प्रिया करूं ग बाई । आप्तोक्तीनें नमन ॥६॥
सांगितल्या गोष्टीची । व्हावया आठवण ।
पुढती श्लोकें सांगू ग बाई । श्रोतीयां हरिचें ध्यान ॥७॥

*श्लोक*

''संचिन्तयेद्भगवतश्चरणारविन्दं
वज्रांकुशध्वजसरोरुहलांछनाढ्यम् ।
उत्तुंगरक्तविलसन्नरवचक्रवाल-जोत्स्नाभिराहत
महद्हृदयांधकारम्''।

ध्यानाची व्हाया पुष्टी । साधाया पूर्ण ज्ञान ।
विश्वाचें दाऊं शुद्ध ग बाई । श्रीहरि अधिष्ठान ॥८॥

*श्लोक*

''स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ।(य४-८७)
रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः'' ॥
गीता

हरि हा अधिष्टान । पहावें कोठें लागे ।
या शंकेवरी श्लोकें ग बाई । कौंतेया प्रिय सांगे ॥९॥

*श्लोक*

''सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ।
वेदैश्च सर्वैहरमेव वेद्यो वेदान्तकृद्वेदविदेव चाहम्'॥

ऐसिया अधिष्टानीं । पावती कैसे कोणी ।
तयाचीं चिन्हें श्लोकें ग बाई । निरूपी शार्ङ्गपाणी ॥१०१०॥

*गीताश्लोक*

*''निर्माणमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ।
द्वन्द्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छन्त्यमूढाः पदमव्ययं तत्'' ।*

ऐसीया पदा तुझ्या । जाऊनी करिती काय ।
हें सांगें श्लोकबद्धें ग बाई । स्वप्रेष्ठ पुत्रमाय ॥११॥

*गीताश्लोक*

*''ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्'' ॥*

ऐसी ही पराभक्ती । उपाय मिळवाया ।
साधन श्लोकें वदती ग बाई । मत्प्रीय उद्धवा या ॥१२॥

*श्लोक*

*''न मां रोधयति योगो न सांख्यं धर्म एव च ।
न स्वाध्यायस्तपस्त्यागो नेष्टापूर्तं न दक्षिणा ॥
व्रताानि यज्ञच्छंदांसि तीर्थाणि नियमा यमाः ।
यथाऽवरुन्धे सत्संगः सर्वसंगापहो हि माम्''॥*

७४



तुमच्या दोषयोगें । साधुला लेप नाहीं ।
परि दे साधुत्वाची ग बाई । तुमचें चित्त ग्वाही ॥१३॥
ऐसीया सत्संगांत । कोणाची उपासना ।
करावी अनुकरणी ग बाई । तें सांगे व्रजराणा ॥१४॥

*भागवत श्लोक*

*''तस्माद्गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् । (य४-८८)
शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपसमाश्रयम्''॥ भाग.११-३-*

मग त्या सद्गुरूतें । प्रसन्न कीजे कैसें ।
आणिक सांगें तेहीं ग बाई । जो कांहीं उपदेशे ॥१५॥

*गीताश्लोक*

*''तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः''॥ ४-३४*

शूद्रातें ब्रह्मविद्या । करितां नये अर्पण ।
यास्तव स्तवुनी तुज ग बाई । यथाधी करितों दान ॥१६॥
तुझा हा भ्रम तैसा । जाईल हळु हळू ।
त्यासही उपायाचा ग बाई । काढूं पीयूष गुळू ॥१७॥

विवेकचूडामणि श्लोक

*'यथा यथा प्रत्यगवस्थितं मनस्तथा तथा मुञ्चति बाह्यवासनाम् ।
निश्शेषमोक्षे सति वासनानामात्मानुभूतिः प्रतिबन्धशून्या'
॥२७७॥*

तुझीया शुद्धरूपीं । वासना नसे कोठें ।

परि ते भासे कैसी ग बाई । आचार्य वदती नेटें ॥१८॥

*वि.चूडामणि श्लोक*

*''ज्ञाते वस्तुन्यपि बलवती वासनाऽनादिरेषा ।*
*कर्ता भोक्ताप्यहमिति दृढा यास्य संसारहेतुः ।*
*प्रत्यग् दृष्ट्यात्मनि निवसता सापनेया प्रयत्ना- ।*
*न्मुक्तिं प्राहुस्तदिह मुनयो वासनातानवं यत्' ॥२६८॥*

इतर साधनांचा । करूनियां निषेध ।
प्रयत्न तोचि सांगूं ग बाई । ज्ञानार्थीयासी शुद्ध ॥१९॥

श्लोक

*''अर्थस्य निश्चयो दृष्टो विचारेण हितोक्तितः ।*
*न स्नानेन न दानेन प्राणायामशतेन वा ॥१॥*
*चार्वाकाश्चतुराः स्वधर्मनिपुणा देहात्मवादे रताः ।*
*नानातर्ककुतर्कभावसहिता निष्ठापरास्तार्किकाः ॥*
*वेदार्थप्रतिपादकाः सुकुशलाः कर्तेति नैय्यायिका- ।*
*स्तेषां स्वल्पफलं भवेत्तु सततं सत्यं न मोक्षः परः''॥२॥ (य४-८९)*

तुजला जो जो भ्रम । आणुनी व्यभिचार ।
तयाचा नाश करूं ग बाई । व्हाया ज्ञानविचार ॥१०२०॥

*श्लोक*

*''भाषांतरीं कल्पित नाम जेथें । श्रद्धानुरूपेंचि कळेल तेथें ।*





*प्रताप नैसर्गिक त्यास नाहीं । प्रसिद्ध नामीं फळ सर्वदांही'' ।*

ज्ञानाच्या मिषें तुज । न व्हावा कपिलभ्रम ।
वेदान्त सांख्य कळो ग बाई । म्हणोनि बोलूं वर्म ॥२१॥

*श्लोक*

*''अनादि अविवेक हा तरी न कां अविद्या म्हणा ।*
*प्रधान नर चेतनाकळित हें न माने मना ।*
*असंगिं गुणसंगता वचनरुद्ध वाणी करी ।*
*न काय पुलिका गृहीं रचनबद्ध वाणी करी''॥*

खंडन मंडनाचें । मननीं पडे काम ।
ध्यानाच्या साठीं सांगूं ग बाई । भक्तीचें ऐक्यवर्म ॥२२॥

*भागवत श्लोक*

*''असेवयायं प्रकृतेर्गुणानां ज्ञानेन वैराग्यविजृम्भितेन ।*
*योगेन मय्यर्पितया च भक्त्या मां प्रत्यगात्मानमिहावरुन्धे''॥*

*भाग.३-२५-२७.*

भक्तीच्या साठीं प्रिय । करूनी कोण घ्यावा ।
आप्तोक्ती युक्तिबळें ग बाई । निर्णय आयकावा ॥२३॥

*भागवत श्लोक*

*''सत्त्वं रजस्तम इति प्रकृतेर्गुणा-*
*स्तैर्युक्तः परः पुरुष एक इहास्य धत्ते ।*
*स्थित्यादये हरिविरिंचिहरेति संज्ञाः*
*श्रेयांसि तत्र खलु सत्त्वतनोर्नृणांस्युः''॥*

*(भाग.१-२-२३)*

७६

शुद्धाची सांडोनीयां । मायावी ईश्वराची ।
भक्ति ते कां सांगतां ग बाई । शंका नसे ही साची ॥२४॥
ज्ञानाचें फळ यया । सांगती ऐशा रीती ।
निश्चय भावबळें ग बाई । मजवरी ज्याची प्रीती ॥२५॥
आपुल्या मनाची मी । सांगेन आतां स्थीति ।
ऐकुनी विप्रराया ग बाई । वरद व्हावें चित्तीं ॥२६॥ (य४-९०)

*श्लोक*

*''उदयते दयते दयते शशिस्सखिकरैरकरैस्तिमिराकरैः ।*
*दिषमिमां चरमां चरमारमं कमल कोमल लोलय लोचनम्''॥*

विरह म्हणोनियां । सकाम नाहीं भक्ती ।
विरह जयासाठीं ग बाई । ती ऐका अस्मदोक्ती ॥२७॥

**श्लोक**

*''चलसि यद्व्रजाच्चारयन्पशून्नलिनसुन्दरं नाथ ते पदम् ।*
*शिलतृणांकुरैः सीदतीति नः कलिलतां मनः कांत गच्छति''॥*

*भाग.१०-३१-११*

कोमळ या पायाचा । तुज कैसा अनुभव ।
पुससी जरी ऐसें ग बाई । तरी तो ऐका भाव ॥२८॥

*श्लोक*

*''यत्ते सुजातचरणाम्बुरुहं स्तनेषु*
*भीताः शनैः प्रिय दधीमहि कर्कशेषु ।*
*तेनाटवीमटसि तद्व्यथते न किंस्वित्*



*कूर्पादिभिर्भ्रमति धीर्भवदायुषां नः ॥*

*भाग.१०-३१-१९*

येवढ्या काळजीची । आमुची ती तूं कोण ।
पुसतां ऐसें जरी ग बाई । तरि सांगे अनभिमान ॥२९॥

*श्लोक*

*''व्रजवनौकसां व्यक्तिरङ्ग ते वृजिनहन्त्र्यलं विश्वमङ्गलम् ।*
*त्यज मनाक्‍चनस्त्वत्स्पृहात्मनां स्वजनहृद्रुजां यन्निषूदनम्'' ॥*

*भाग.१०-३१-१८*

तुझीया काळजीची । परीक्षा मज कैसी ।
तरी तें दीनबंधु ग बाई । अवधारा हृषीकेशी ॥१०३०॥

*श्लोक*

*''पतिसुतान्वयभ्रातृबान्धवानतिविलङ्घ्यतेऽन्त्यच्युतागताः ।*
*गतिविदस्तवोद्गीतमोहिताः कितव योषितः कस्त्यजेन्निशि''*

*भाग.१०-३१-१६*

माझीया रूपीं ऐसे । जडाया तुझें मन ।
तुजला काय कळे ग बाई । माझें तें महिमान ॥३१॥
तुमच्या माहात्म्याची । गुरूच्या मुखें सिद्धि ।
जाणोनी तुम्हांवरी ग बाई । ठेविली प्रेमबुद्धि ॥३२॥

*श्लोक*

*''तव कथामृतं तप्तजीवनं कविभिरीडितं कल्मषापहम् ।*
*श्रवणमंगलं श्रीमदाततं भुवि गृणन्ति ते भूरिदा जनाः''* (य४-

९१)

भाग.१०-३१-९

७७

महात्म्य कळवावया । गुरू तो  तुझा कोण ।
मागसी काय तया ग बाई । कैसें तव भक्तिध्यान ॥३३॥
पतिव्रतेचा धर्म । पतीच्या बोलें चाले ।
तयाच्या योगे ग बाई । श्रीकृष्ण मान डोले ॥३४॥
प्रत्यक्ष अनुमानें । सामान्य होय भान  ।
आप्ताच्या  वचनानें ग बाई । निश्चित होय ज्ञान ॥३५॥
सांवळी गोजिरवाणी । श्रीकृष्णाची पाउली ग ।
पैंजण वाजताती । ऐकोनि चित्त धालें ग । मोहन० ॥३६॥
गोविंद गोविंद नाम घेतां । चालतां विदीहूनि ग सखुगडणी० ।
मंजूळ मंजूळ  पाय वाजे । कोल्हार हरिचे गाजे ग
सखु०॥३७॥
पाळणा पाळणा पहूडले । प्रणवमय बीज ग सखुगडणी ।
यशोदा यशोदा म्हणे नीज । तया परब्रह्मा ग सखुगडणी
॥३८॥
घेउनी तूप भात । पूजीतां धरादेव ।
तेथें न मन घाली ग बाई । जया गोपिका म्हणति जेव ॥३९॥
बिदींत मातीवरी । पायांच्या सान खुणा ।
वाटतें याचिवाटे ग राधे । यमुने गेला कान्हा ॥४०॥
फुललीं फुलझाडें । सुटला मधुगंध ।
वाजवितल केव्हां । मुरली सुखकंद ग बाई ।



राधे चाल बाई चाल० ॥४१॥
सौभाग्य माझें सारें । वृंदावनींची मूर्ती ।
जयाची चारीमुखें ग बाई । गाताती वेदकीर्ती ॥४२॥
सांगती सख्या मज । संसारबंध  तोडी ग  ।
पिसाट होऊनी घेई । श्रीकृष्णांगुष्ठ गोडी ग । मोहन०॥४३॥
सांगते कृष्णा मला । जोंवरी तुझी नारी ।
तोंवरी राहो ग बाई । आवडी श्यामपाई ॥४४॥
तोंवरी प्राणायाम ग राधे । करूनी फळ नाहीं ।
जोंवरी तुटी नाहीं । माधव माधव ही ॥४५॥
गाउनी नामें रडे । त्याविण पाहशिल ।
कोणाच्या मुखाकडे । ग राधे ॥४६॥
साधनें मनुष्याला । परतंत्र आम्ही नारी । (य४-९२)
जीवींची सखी कोण ग बाई । भेटवी पूतनारी ॥४७॥
आभाळ आलें तैसें । आघवी निळी छाया ।
वाटतें विश्वभरीं ग बाई । व्यापिली श्यामकाया ॥४८॥
ब्रह्म मी ब्रह्म मी ही । गर्विष्ट मूर्खवाणी ।
जाणोनी ब्रह्म सावूं (१) । गाताती सारंगपाणी ॥४९॥

(टीप :-१ सावू=साधू. सावू हा शब्द बालभाषेंत साधूचा वाचक आहे.)

मंगळसूत्र माझें । अखंड सौभाग्याचें ग ।
तयाच्या योगें देव । हृदयीं नित्य नाचे ग । मोहन० ॥१०५०॥
आम्ही तों कृष्णनारी । सर्वदां समाधान ग ।

लोकांस रीझवाया । कोणि करोत वेश्यापण ग । मोहन०
॥५१॥
गोविंद गोपीनाथ । केशवा नारायणा ग ।
मंगल नांवाचें या । वाणीनें करा गाना ग । मोहन० ॥५२॥
सुंदर श्यामतनु । पाहुनी डोळेभरी ग ।
मोहीले जीवन्मुक्त । काय अन्यायी आम्ही नारी ग ।
मोहन०॥५३॥
धोतर लुगड्याच्या । तंतूंत नाहीं भेद ग ।
समस्तधर्मी तैसा । एकचि ब्रह्मानंद ग । मोहन०॥५४॥
पाहतां डोळेभरी । सुंदर श्याम तनु ग ।
आनंद होय तैसा । वदूं न शके मन ग । मोहन०॥५५॥
संतांच्या आंगणांत । बाई काह्याचा कल्ला होते ।
विठ्ठलभेटीसाठीं । धावुनि राधा येते ग । मोहन०॥५६॥
आपुल्या वर्तनांत । जोंवरी नाहीं नेम ग ।
तोंवरी पांडुरंगी । दाखवूं नये प्रेम ग । मोहन०॥५७॥
सौभाग्यवती बाळा । भर्तार देव त्यांना ।
पतीच्या आज्ञेविण ग बाई । नमूंचि नये कोणा ॥५८॥
सौभाग्यवती बाला । हृदयीं निजपती ग ।
धरोनी सहजगती त्या । कैवल्य मेळविती ग ॥५९॥
बोलावी बोलावी सत्यवाणी । सोडोनी जीविताशा ग सखुगडणी
।





अंतरी अंतरी आठवावे । आदरें हृषीकेशा ग सखु०॥१०६०॥
(य४-९३)
आलीया आलीया मोठेपणा । टाकूनि बोलों नये ग सखुगडणी०
।
समयीं समयीं सर्वजण । वंदीती परपाय ग सखुगडणी० ॥६१॥
धना या दगडाचा । लोभ तो धरूं नये ग ।
भुकेल्या अतिथीचे । पुजावे प्रेमें पाय ग । मोहन० ॥६२॥
सद्गुरू आणि देव । दोघांत मोठा कोण ग ।
सद्गुरू श्रेष्ठ कृपें । घरा ये नारायण ग । मोहन० ॥६३॥
आपुल्या विद्याबळें । वडीलां बोलों नये ग ।
तयांच्या आशीर्वादें । साधूंची भेट होय ग । मोहन० ॥६४॥
सपन देखीयेल । दोन पाहेरा राती ग ।
येऊनी ज्ञानेश्वर । पादुका दिल्या हातीं ग । मोहन० ॥६५॥
सपन देखीयल । सांवळी तनु पुढें ग ।
पाहतां पाहतांचि । ऐक्य संचलें धडफुडे ग । मोहन० ॥६६॥
आचरणा वांचोनि । कोरड्या नको गोष्टी ।
जिंकील गोविंदाला ग बाई । गुरुचरणपुष्टी ॥६७॥
जीव तो जीव तो प्रतिबिंब । बिंब तो नारायण ग सखुगडणी० ।
ज्ञानेश ज्ञानेश बाप माझा । दोघा मायीकां अधिष्ठान ग ॥६८॥
देवाच्या भेटण्याची । करूंचि नये शंका ग ।
सद्गुरूकरूणा ती । करील भूप रंका ग मोहन० ॥६९॥

आपुल्या भक्तीसाठीं । सगुण झाला देव ग ।
दयालु अकारण । माझा ज्ञानेश गुरुराव ग । मोहन०
॥१०७०॥
मधुर बोलण्याला । अवघा लोक रिझे ग ।
परंतु हित बोल । आरंभी कडू वाटे ग । मोहन० ॥७१।
देवभक्ताची प्रीती । न वर्णवे अचाट ग ।
धांव घेतां न पाहे । प्रभु गरुडाचीही वाट ग । मोहन० ॥७२॥
स्वीकारी स्वीकारी पानफूल । भाव पाहुनी आधीं त्याचा ग
सखु०।
भक्ताच्या भक्ताच्या प्रेमासाठीं । देव चाकर यवनाचा ग
सखु०॥७३
जळो तें जळो तें मोठेपण । जळो तें ब्रह्मज्ञान ग ।
लोचनीं नये पाणी । गातां गोविंदगुण ग सखुगडणी० ॥७४॥
(य४-९४)
जोवरी जोवरी केली नाहीं । सगुण उपासना ग सखुगडणी०।
तोंवरी तोंवरी ज्ञानानळ । न जाळी कुवासना ग सखु०॥७५॥
जोंवरी जोंवरी नाहीं अंगी । दीनदु:खित दया ग सखुगडणी ।
तोंवरी तोंवरी ब्रह्मज्ञानें । तुटेंना मोहमाया ग सखुगडणी
॥७६॥
दावील कोण मज । यशोदासुत डोळा ग ।
दीनाचा कनवाळू । स्वामी आळंदीनाथ भोळा ग । मोहन०
॥७७॥
मोकळें माझें मन । मोकळें कृष्णगुण ।
गातांचि मुक्तपण । गंगाजमना० ॥७८॥
श्रीहरीपायासाठीं । पाहीजे पुण्य गाठीं ।
सेवावे संतकोटी । गंगाजमना० ॥७९॥
आवडी माझ्या मना । सावळ्या सगुणाची [१] ।
आज्ञा ऐकावी सज्ञनाची । गंगजमना० ॥१०८०॥
*(पाठांतर - बाई पाहावी मूर्ति ग सज्ञनाची.)*
गोविंदगोपाळ हा । अंतरीं करी जप ।
वारूनि खटाटोप । गंगाजमना०॥८१॥
सुंदर श्यामतनु । पहावी दिव्यदृष्टि ।
भासते ब्रह्मसृष्टि । गंगाजमना०॥८२॥
कामाचा सोडी चाळा । क्रोधाची नका आशा ।
लोभाच्या तोडी मिशा ॥ गंगाजमना० ॥ राजा बोले ॥८३॥
वाजवी वृंदावनीं । बाई मंजूळतर वेणू ग ।
अनंत जन्मतपें । त्याचे मिळती पदरेणू ग ॥ मोहन० ॥८४॥
मोकळें मोकळें मन करा । विषयांतुनी आधीं ग सखुगडणी०।
साधेल साधेल मग येथें । सहजची समाधी ग
सखुगडणी०॥८५॥
गोविंद गोविंद नाम घेतां । गोविंदरूप काया ग सखुगडणी०।

दीनांवर दया
जोंवरी जोंवरी नाहीं अंगी । दीनदु:खित दया ग सखुगडणी ।

# अनुक्रम

**श्रीगुलाबरावमहाराजांचा परिचय** १

*- श्रीनिवास रामचंद्र हरिदास*

**आठ चाली** ६

**स्त्रीगीत** (५ प्रकरणांचे विषयदिग्दर्शन) १२

(या खंडातील एकूण ओव्या १५४ + १०९२ + ९ + १ = ११५६ )

**स्त्रीगीत**

(ओव्या - ६+ २०+ २३+ २९+ ४०+ ४५ = १५४)

मंगलाचरण १३

प्रकरण १ ले सद्गुरु महिमा १४

प्रकरण २ रे गुरुसेवा १६

प्रकरण ३ रे श्रीगुरूंना विनंती १८

प्रकरण ४ थे साधनपूर्वक गुरूपदेश २१

प्रकरण ५ वें यथार्थ परीक्षापूर्वक सद्गुरु लक्षण २६

**स्त्रीगीत-संग्रह** (चवथी यष्टी) ३१ ते १६०

(ओव्या १०९२)

पदे (९) १४३

पाळणा (१) १५३

...............

श्रीगुलाबरावमहाराजांची साहित्यसूची १५५ ते १६०



**पाहतां पाहतां नष्ट झाली । अविद्या आणि माया ग सखुo॥८६॥**

**देखीलें देखीलें डोळेभरी । संदावे ताऱ्हें बाळ ग सखुगडणी ।**

## मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांच्या कार्याचा आलेख

* नाव : श्री गुलाब गोंदुजी मोहोड, इ.स.१८८१ ते १९१५.
* नवव्या महिन्यात अंधत्व.
* गोपीभाव : ज्ञानेश्वकन्या आणि कृष्णपत्नी.
* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वोच्चतेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्‌विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : वेदान्तातील नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.
* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्‌दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन. त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय आणि दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तुलना आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.
* इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.

* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादासंबंधी तौलनिक विवेचन.
* लो.टिळक, विवेकानंद, रामतीर्थ वगैरेंच्या काही मतांची परखड चिकित्सा.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्दर्शनानुसार प्रस्तुतीकरण..
* इतिहास कोणी कसा लिहावा आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा याचे मार्गदर्शन..
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सिद्धांतांचे मुद्देसूद प्रतिपादनः लो.टिळकांच्या उत्तरधृवीय मताचा परामर्श..
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या ऐतिहासिक सत्याची प्रमाण पुरस्सर पुनर्स्थापना.
* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडन.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना,भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* 'प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता' हे आधुनिक संकेत संत किंवा आर्ष वाङ्मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.
* मुलांसाठी उपदेश.
* स्त्रियांसाठी खास गीतांची निर्मिती.
* लोकगीतातून समाजप्रबोधन.
* नवीन १२३ मात्रावृत्तांची रचना.
* नवीन लघुलिपीची (सांकेतिकलिपी) निर्मिती.
* नवीन 'नावंग' भाषेची निर्मिती.
* नवीन व्याकरण सूत्रे.
* आत्मचरित्र लेखन.
* नाटक लेखन.
* आख्यानांची रचना.
* खेळातून परमार्थप्राप्तीचा उपाय : मोक्षपट.
* संस्कृत, हिंदी, मराठी, वऱ्हाडी आणि व्रजभाषेत एकूण १३५ ग्रंथांची रचना.

* अभंग-२०९९, * पदे-२२५२, * गीत-१२५०, * श्लोक-१०००, * ओव्या-२३०००,

* एकूण पृष्ठे ६००० चे वर

० ० ०

**श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहिसाथ, अमरावती.**
**दूरभाष : ०७२१-२६७६३०७**





# मंगलाचरण

**नमः श्री आदिनाथाय नमो मत्स्येन्द्ररूपिणे ।**
**गोरक्षप्रभवे गैनीनाथायाथ निवृत्तये ॥१॥**
**परं ब्रह्म परं धाम सच्चिदानंद विग्रहम् ।**
**ज्ञानेश्वरमितिख्यातं प्रणमामि गुरुं हरिम् ॥२॥**
**ज्ञानेशो भगवान् विष्णुर्निवृत्तिर्भगवान् हरः।**
**सोपानो भगवान्ब्रह्मा मुक्ताख्या ब्रह्मचित्कला ॥३॥**
**यद्वस्तुतस्सच्चिदकापकारी भक्त्यर्थमेवावयवीव भूतम् ।**
**ज्ञानेश्वराचार्यपदं हृदब्जे बिभ्राजते तन्मुनयोर्विशन्ति॥**
**कस्तूरीतिलकं ललाटपटले वक्षस्थले कौस्तुभम् ।**
**नासाग्रे नवमौक्तिकं करतले वेणुः करे कंकणम् ।**
**सर्वांगे हरिचंदनं सुललितं कंठे च मुक्तावलिः।**
**गोपस्त्रीपरिवेष्टितो विजयते गोपालचूडामणिः॥५॥**
**वंदे नंदव्रजस्त्रीणां पादरेणुमभीक्ष्णशः।**
**यासां हरिकथोद्गीतं पुनाति भुवनत्रयम् ॥६॥**
**श्रीमान् ज्ञानेश्वराचार्य, उमा माता, शिवः पिता ।**
**पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम॥७॥**
**पंचायतनम् इत्येतत् हृद्यास्थाप्य प्रपूज्य च ।**
**नमस्कृत्वा च याचेऽहं ज्ञानेश्वरसुतानुतिम् ॥८॥**
**॥ ऱ्हीं नारायणाय नमः ऱ्हीं ॥**
**॥ऱ्हीं हरये नमः ऱ्हीं ॥ ऱ्हीं दत्तात्रेयाय नमः ऱ्हीं ॥**
**ऱ्हीं व्यंकटेशाय नमः ऱ्हीं ॥ ऱ्हीं लक्ष्मणाय नमः ऱ्हीं ॥**
**वाचकं लेखकं वंदे गुरुं नारायणं हरिम् ।**
**दत्तात्रेयं व्यंकटेशं पुनर्लक्ष्मणमाभजेत् ॥९॥**
**नमो अन्येभ्यो लक्ष्मीनायककृष्णपर्यायादि पालकेभ्यः**
**नमः श्रीसच्चिदानन्दमात्रैकतनुधारिणे**
**श्रीपांडुरंगनाथाय नतःक्षेमकराय च ॥**
**संसारांबुधिनिमग्नानां लीलयोद्धारणाय वै ।**
**स्फुटीकृतं भक्तितत्त्वं भक्तेश्चालंबनं तथा ॥१०॥**
**गुरुभक्तिस्वरूपाय विशुद्धं ज्ञानमूर्तये ।**
**भक्तिमार्गप्रदीपाय स्कंददासाय ते नमः ॥११॥**

० ० ०

# श्रीगुलाबरावमहाराजांची विषयानुसार ग्रंथसूची



### सूत्रग्रंथ

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| १. अन्तर्विज्ञानसंहिता | (सं) | य १६ |
| २. ईश्वरदर्शनम् | (सं) | य १६ |
| ३. समसूत्री | (सं) | य १६ |
| ४. दुर्गातत्त्वम् | (सं) | य १६ |
| ५. काव्यसूत्रसंहिता | (सं) | य १६ |
| ६. शिशुबोधव्याकरणम् | (सं) | य १६ |
| ७. न्यायसूत्राणि | (सं) | य १६ |
| ८. एकादशीनिर्णयः | (सं) | य १६ |
| ९. पुराणमीमांसा | (सं) | य १६ |

### आकर ग्रंथ

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| १०. संप्रदाय सुरतरु, (भा.१ व २) | | य ११ |

### भाष्यग्रंथ

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ११. नारदीयभक्त्यधिकरण-न्यायमाला | (सं) | य १६ |
| १२. भक्तिसूत्रभाष्यम् | (सं) | य १६ |
| १३. भक्तिसूत्रभाष्यम् (मराठी) | | य १४ |
| १४. प्रियलीलामहोत्सव (भागवत स्कंध १) निमंत्रणविलास (वरील भाष्य) | | य ३ |
| १५. प्रियलीलामहोत्सव (भागवतभाष्य) आमंत्रणविलास | | य १४ |
| १६. श्रीधरोच्छिष्टपुष्टिः | (सं) | य १६ |
| १७. श्रीधरोच्छिष्टपुष्टिलेशः | (सं) | य १६ |
| १८. ब्रह्मसूत्रव्याख्या | | य १५ |
| १९. निगमांतसुभा | | य १५ |
| २०. ब्रह्मसूत्रांवर निरूपणे | | य १८ |
| २१. भगवद्गीतासंगति | | य १ |
| २२. मनोहारिणी (हिन्दी) | | य १८ |
| २३. गीतेवरील निरूपणे | | य १७ |
| २४. गीतेवरील प्रवचने | | य १७ |
| २५. गीतेवरील निरूपणे | | य १८ |
| २६. गीतेवरील स्फुट निरूपणे | | य १८ |
| २७. ऐश्वर्यार्थदीपिका (ईश्वरगीता) | | य १५ |
| २८. षट्पद्ध्वनिः | (सं) | य १६ |
| २९. ईशावास्योपनिषद् | (सं) | य १६ |
| ३०. ऋग्वेदटिप्पणी | (सं) | य १६ |
| ३१. चौसष्टी | | य १ |
| ३२. चिरंजीवपदाभ्यास | | य २ |
| ३३. बालवासिष्ठ | (सं) | य १६ |
| ३४. योगवासिष्ठ तत्त्व | | य १७ |
| ३५. योगवासिष्ठ निरूपणे | | य १८ |

### शास्त्रग्रंथ

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ३६. सुखवरसुधा | | य १३ |
| ३७. वेदान्तपदार्थोद्देशदीपिका | | य १३ |
| ३८. शास्त्रसमन्वयः | (सं) | य १६ |
| ३९. आगमदीपिका | (सं) | य १६ |
| ४०. युक्तितत्त्वानुशासनम् | (सं) | य १६ |
| ४१. प्रेमनिकुंज | | य १० |
| ४२. शांतिसुधाकर | | य २ |
| ४३. वेदान्तप्रक्रियासमुच्चय | | य १५ |
| ४४. वेदान्तनिरूपण | | य १५ |
| ४५. तत्त्वबोधः | (सं) | य १६ |
| ४६. षड्दर्शनलेशसंग्रहः | (सं) | य १६ |

### भक्तिग्रंथ

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ४७. भक्तिपदतीर्थामृत (तत्त्वमसि) | | य १ |
| ४८. निगमांतपथसंदीपक | | य १ |
| ४९. भगवद्भक्तिसौरभ | | य २ |
| ५०. प्रीतिनिर्तन | | य २ |
| ५१. नित्यतीर्थ | | य २ |
| ५२. प्रिय पाहुणेर | | य २ |
| ५३. भक्तितत्त्वविवेक | (सं) | य १६ |
| ५४. प्रियप्रेमोन्माद | (सं) | य १६ |
| ५५. गोपिकापादपीयूषलहरी | | य १५ |
| ५६. गोविंदानंदसुधा | (सं) | य २ |

### योग

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ५७. निदिध्यासनप्रकाश | | य १ |
| ५८. ध्यानयोगदिवाकर | | य २ |
| ५९. सोपानसिद्धि | | य २ |
| ६०. हिरण्ययोग (स्वप्नयोग) | | स १५ |
| ६१. योगांग यमलक्षण | | य १५ |
| ६२. योगप्रभाव (पद्य) | | य १५ |
| ६३. योगप्रभाव १-२ (गद्य) | | |
| ६४. ज्ञाने.कुंडलिनी निरूपण. | | य १५ |

### सांख्य

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ६५. सांख्यसुरेंद्र | | य १४ |
| ६६. सांख्यतत्त्व सूत्रावरील विचार | | य १५ |
| ६७. सांख्यसार एक निबंध | | य १५ |



| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ६८. सांख्यसार | | य १८ |

### संगीत

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ६९. छंद प्रदीप | | य १५ |
| ७०. गानसोपान | | य १५ |

### आयुर्वेद

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ७१. मानसायुर्वेद | (सं) | य १६ |
| ७२. मानसायुर्वेद | (मराठी) | य १५ |
| ७३. भिषगिंद्रशचीप्रभा | (सं) | य १६ |
| ७४. वैद्यवृंदावन | | य १५ |
| ७५. वैद्यनंदिनी | | य १५ |

### प्रकरणग्रंथ

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ७६. स्वमतनिर्णयः | (सं) | य १६ |
| ७७. संप्रदायकुसुममधु | (सं) | य १६ |
| ७८. सच्चिन्निर्णयः | (सं) | य १ |
| ७९. कांतकांतावाक्यपुष्पम् | (सं) | य २ |
| ८०. चित्तोपदेश | | य २ |
| ८१. सद्वैजयंती | | य २ |
| ८२. बाराखडी | | य २ |
| ८३. त्रिकांडसार | | य २ |
| ८४. प्रमादकल्लोळ | | य १५ |

### गाथा

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ८५. अभंगांची गाथा | | य ९ पू |
| ८६. पदांची गाथा | | य ९ उ |

### निबंध

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ८७. अलौकिक प्रवास | | य २ |
| ८८. अमोघनिरूपण | | य २ |
| ८९. बौद्ध निबंध | | य १५ |
| ९०. वेदान्तनिरूपण | | य १५ |
| ९१. सिद्धिसार | | य १५ |
| ९२. अलौकिकाख्यानमाला | | य ५ |
| ९३. युक्त्या | | य १७ |
| ९४. गुरुचरणकौमुदी | | य १८ |
| ९५. निरूपण | | य १७ |

### संवाद

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ९६. साधुबोध | | य ८ |
| ९७. मणिमंजुषा | | य १२ |
| ९८. सुवर्णकण | | य १७ |
| ९९. स्वमंतव्यांश-सिद्धान्त-तुषार | | य ६ |
| १००. दुर्मत-हृदयभंजन | | य १५ |
| १०१. प्रश्नोत्तरे | | य १५ |
| १०२. वृत्तिक्षीरसागर | | य १५ |
| १०३. बालबुद्धि विवर्धिनी | | य १७ |

### पत्रे ११८

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| १०४. अकरा पत्रे | | य १ |
| १०५. वीस पत्रे | | य २ |
| १०६. अडतीस पत्रे | | य ७ |
| १०७. सत्तेचाळीस पत्रे | | य १२ |
| १०८. एकपत्र | | य १५ |

### लोकगीते

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| १०९. स्त्रीगीते | | य ४ |
| ११०. स्त्रीगीतसंग्रह | | य ४ |
| १११. तुंबडी | | य २ |
| ११२. रुक्मिणी स्वयंवर | | य ९ |
| ११३. रुक्मिणी पत्रिका | | य ९ |

### स्तोत्रे

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ११४. ज्ञानेश्वर-मातृपितृ-भावनाष्टक | | य २ |
| ११५. कृष्णपंचपदी | | य २ |
| ११६. गुरुपंचपदी | | य २ |

### चरित्र - आख्याने

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| ११७. आत्मचरित्र | | य १५ |
| ११८. सूचना प्रकरण | | य १ |
| ११९. सूचना प्रकरण | | य २ |
| १२०. अभंगात्मक १९ आख्याने | | य ९ |
| १२१. पदात्मक ७ आख्याने | | य ९ |
| १२२. पतिव्रताचरितामृत | | य १५ |

### विविधरचना

| अनुक्रम | | यष्टी |
|---|---|---|
| १२३. सुखपर्व (नाटक) | | य १५ |
| १२४. मात्रामृतपानम् | (सं) | य १६ |
| १२५. पत्नीप्रेमपराग | | य २उ |
| १२६. नवीन भाषा - 'नावंग' | | य १६ |
| १२७. शब्दकोष (नावंगभाषेचा) | | य १५ |
| १२८. सांकेतिक भाषा (लघुलिपी) | | य १५ |
| १२९. मोक्षपट (क्रीडा) | | य १५ |
| १३०. हरिपाठाच्या प्रतिज्ञा | | य १५ |
| १३१. हरिपाठाचा अर्थक्रम | | य १५ |
| १३२. मायर्सवर टीपा | | य १५ |
| १३३. शिक्षणरत्नाकर (अप्रकाशित) | | (चरित्र) |
| १३४. ज्ञानबोध | | य ९ पू. |
| १३५. गायत्री अन्वयार्थ | | य १ |

|| श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ||

श्रीगुलाबरावमहाराजकृत सूक्तिरत्नावली - चतुर्थ यष्टी.



# || स्त्रीगीतसंग्रह ||

## स्त्रीगीत

(स्वतंत्र ग्रंथरूपाने पांच प्रकरणे)

## स्त्रीगीतसंग्रह

**(दळणकांडण करतेवेळीच्या आणि झोपाळ्यावरील वऱ्हाडी भाषेतील १०९२ ओव्या, ९ पदे व १ पाळणा)**

**सगुण विरलावस्था । व्यापक तें निर्गुण ।**

**प्रकाशक**

**ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ, दहिसाथ, अमरावती**

*दूरभाष - ०७२१-२६७६३०७*

@

रू.४०

१ ली आवृत्ती - १९१०
२ री आवृत्ती - १९७०
३ री आवृत्ती -
४ थी आवृत्ती - २००४

**श्रीगुलाबरावमहाराजांचे साहित्य मिळण्याची ठिकाणे**

**श्री ज्ञानेश्वर संस्थान**
दहिसाथ, **अमरावती.**
टेली. ०७२१-२६७६३०७
*

**श्री ज्ञानेश्वर संस्थान**
पाताळेश्वर मार्ग, महाल,
**नागपूर** ४४०००२
टेली. ०७१२-२७२०२७८
*

**सुधाकर फणसळकर,**
सिद्धान्त बी-३, सुयोग मंगलकार्यालयामागे,
शनिवार, **पुणे** ३०
टेली. ०२०-२४४८०६४५
*

**श्रीरंग घटाटे**
'गोकुळ' घटाटे-लेआउट,
सिव्हिल लाईन्स,
**नागपूर** - ४४०००१.
टेली. ०७१२ -२५२९७७०,
०७१२ -२५३३९९७.
*

**मुद्रक**
श्रीहरि गोखले,
ऋचा ग्राफिक्स, नागपूर
*

*

## धर्मान्तर

**प्रश्न :** सर्व धर्म समान आहेत तर आपल्या धर्मात कां राहवे ?

**उत्तर :** सर्व धर्म समान आहेत तर आपल्याच धर्माला कां सोडावे ?

*

## श्रीगुलाबरावमहाराजांची जीवन भूमिका

'आर्यांचे म्हणणे बरोबर आहे'
हे सिद्ध करण्याशिवाय मला व
आपणप्रभृति माझ्या हितचिंतकांना
दुसरे कोणतेही काम नाही''

*

*माधुर्यमधुकोशातील पृष्ठक्रमांक पहिल्या आवृत्तीनुसार असल्याने या आवृत्तीत कोणता विषय कोणत्या पानावर आला आहे त्या संदर्भाचे पहिल्या आवृत्तीनुसार पृष्ठ क्रमांक दिले आहेत.*

***पहिल्या आवृत्तीतील पान जेथे संपते तेथे - कंसात - त्या जुन्या आवृत्तीतील पृष्ठक्रमांक दिला आहे.*** *उदा. (य२पू.२४) इ.*

**|| इंटरनेट वेबसाइट ||**

www.gulabraomaharaj.org

**श्रीगुलाबरावमहाराजांच्या**

**सूक्तिरत्नावलि-यष्टीनुसार**

## विक्री साहित्य

**(यष्टि १) रु ४०**

(१) भक्तिपदतीर्थामृत
(२) निगमान्तपथसंदीपक
(३) चौसष्टी (अमृ.अ.१चे निरूपण)
(४) योगसाधनेची ११ पत्र (योग)
(५) भगवद्गीतासंगति
(६) निदिध्यासनप्रकाश (योग)
(७) कान्तकान्तावाक्यपुष्पम् (संस्कृत)
(८) सूचनाप्रकरणम् -१
(९) गायत्री-अन्वयार्थ (नवोपलब्धि)

**(यष्टी २ - पूर्वार्ध) रु.४०**

(१०) कृष्णपंचपदी
(११) सद्वैजयंती
(१२) बाराखडी
(१३) चित्तोपदेश
(१४) त्रिकांडसार
(१५) तुंबडी
(१६) चिरंजीवपदाभ्यास
(१७) शांतिसुधाकर
(१८) सोपानसिद्धि (योग)
(१९) नित्यतीर्थ
(२०) मणिमंजुषा
(२१) प्रियपाहुणेर
(२२) अलौकिक प्रवास
(२३) अमोघनिरूपण (ॐकारसाधना)
(२४) स्त्रीगीत
(२५) श्रीज्ञानेश्वरक्षमापनस्तोत्र

**(यष्टी २) उत्तरार्ध रु.५०**

(२६) गुरुपंचपदी
(२७) २० पत्रे
(२८) ध्यानयोगदिवाकर (योग)
(२९) भगवद्भक्तिसौरभ (रुक्मि.पत्रिका)
(३०) प्रीतिनर्तन
(३१) गोविन्दानंदसुधा
(३२) मातृपितृभावनाष्टक
(३३) सूचनाप्रकरण - २

**(यष्टी ३) रु.१००**

प्रियलीलामहोत्सव भाग-१
(३४) आमंत्रणविलास
(३५) सूचनाप्रकरण - ३
(०) ~~आममनविलास - (यष्टी१४)~~

**(यष्टी ४) रु.३०**

(३६) स्त्रीगीतसंग्रह २ भाग

**(यष्टी ५) रु.३०**

(३७) अलौकिक व्याख्यानमाला
*(मानसशास्त्रीय विवेचन)*

**(यष्टी ६) रु.१०**

(३८) स्वमंतव्यांशसिद्धान्ततुषार (हिंदी)

**(यष्टी ७) रु. ३०**

(३९) एकूण ३८पत्रे
योग, बुवाबाजी, धर्मसुधारक, धर्म, तत्त्वज्ञान समीक्षा, भौतिक विज्ञान, स्वजाति बांधवांना विनंती.~~(५६पत्रे ?)~~

**(यष्टी ८) रु.५०**

(४०) साधुबोध- ९३८ प्रश्नोत्तरे

**(यष्टी ९ पूर्वार्ध) रु.१००**

**अभंगांची गाथा**

(४१) एकूण अभंग- २१५७.
(४२) मानसपूजा
(४३) शुक-परिक्षित संवाद
(४४) ज्ञानपाठ १६ अभंग
(४५) ज्ञानेश्वरमहिमा पंचक
(४६) गीतासार (९८४)
(४७) गोपी गीत (१४३३-५०)
(४८) रामचरित (१४८४-९५)
(४९) योगसाधना (१४९६-१५११)
(५०) गंगापंचपदी (१६१७-२१)
(५१) गंगापंचरत्न (२०६९-७४)
(५२) आत्मचरित्र (२०३९)
(५३) सोपानदेव (२०४६-४९)

**१९ आख्याने**

(५४) १.पूतनामोक्ष
(५५) २.कृष्णतुला
(५६) ३.पुण्यधाम
(५७) * गंगापंचपदी
(५८) ४.चिंधीची कथा
(५९) ५.भिल्लिणी पार्थ
(६०) ६.मृत्तिका भक्षण
(६१) ७. गोपींचा नौकाविहार
(६२) ८.निळ्या नारी
(६३) ९.बिल्वमंगल
(६४) १०. सुरथ सुधन्वा
(६५) ११.कर्माबाई
(६६) १२.अजापाल
(६७) १३.शुकगणिका
(६८) १४.रंतिदेव
(६९) १५.कुशिष्याचे आख्यान
(७०) १६.उपमन्यू-संभूति कथा
(७१) १७.नारायणदास
(७२) १८.विमलासुशिला
(७३) १९.पार्थ गर्वहरण
(७४) १८.विमलासुशिला
(७५) १९.पार्थ गर्वहरण

**(यष्टी ९ उत्तरार्ध) रु.१००**

**पदांची गाथा**

(७६) वृत्तबंधनाचे टिप्पण-१२२ वृत्ते
(७७) पदांची गाथा एकूण पदे- २२४४
(७८) हिंदी पदसंग्रह (३०४)
(७९) संस्कृत पदे (४०)
(८०) लोकगीते : तुंबडी प्रकरण
(८१) अक्कलकोटस्वामी (३५-४५)
(८२) ज्ञानेश्वर मंत्राक्षरी (९४)
(८३) ॐनमोभगवतेवासुदेवाय
(८४) कात्यायनीपूजन (१०६)
(८५) नमःशिवाय-मंत्राक्षरी (१२९)
(८६) पत्नीस बोध (१६३-१७२)
(८७) लोकगीते
(८८) करुणाकलरव स्तोत्र
(८९) पार्थकृष्णसंवाद (३८१-४३२)
(९०) राम-वसिष्ठ संवाद
(९१) गुरुशिष्य संवाद
(९२) मनीषापंचक (५३१- )
(९३) व्यंकटशास्त्रींशी प्रश्नोत्तरे
(९४) मुरलीगीत (७१५-१७)
(९५) द्रौपदीचा धावा
(९६) बुढी-कृष्ण संवाद (७६६-६८)
(९७) रुक्मिणीचे पत्र (७६९-७६)
(९८) रुक्मिणीपत्रिका
(९९) बालरक्षा
(१००) उद्धव-गोपी संवाद
(१०१) रासक्रीडा
(१०२) भागवत-दशमसार
(१०३) रुक्मिणीस्वयंवर
(१०४) रामचरित्
(१०५) श्रीवाल्मिकीय सारोद्धार
(१०६) श्रावण कथा
(१०७) शिव-करुणाकलरव

**आख्याने ७**

(१०८) १ जंबूफल आख्यान ३६४
(१०९) २ चिंधीचें आख्यान ३७८
(११०) ३ सखु आख्यान ३९०
(१११) ४ राधाविलास आख्यान ४१०
(११२) ५ उलूखलबंधन आख्यान
(यमलार्जुनोद्धारवर्णनम्)
४१८
(११३) ६ यज्ञपत्न्याख्यान ... ... .४२५
(११४) ७ हरिहराख्यान ४३५
(११४) तुंबडी प्रकरण ४८२
(११५) स्त्रीगीत प्रकरण ३८६
(११६) सयनाजी
(११७) आरतीसंग्रह ४९४

**(यष्टी १०)**

**रु.१००**

(११८) प्रेमनिकुंज

**(यष्टी ११) रु.१६०**

(११९) संप्रदायसुरतरू भाग १-२

**(यष्टी १२) रु.३०**

(१२०) पत्रे ४७
संस्कृत-काव्य-गद्य (६२पत्रे?)

**(यष्टी १३)**
**रु.२०**

(१२१) सुखवरसुधा.
(१२२) वेदान्तपदार्थोद्देशदीपिका

**(यष्टी १४)**

(१२३) गानसोपान
(१२४) सांख्यसुरेन्द्र
(१२५) प्रियलीलामहोत्सव भा.२ -
~~आममनविलास (य३)~~

**(यष्टी १५)**

(१२६) ईशावास्योपनिषद्
(१२७) ज्ञानेश्वरी निरूपण
(१२८) निगमान्तसुभा
(१२९) ऐश्वर्यार्थदीपिका
(१३०) ब्रह्मसूत्रव्याख्या
(१३१) छंदप्रदीप
(१३२) प्रमाद-कल्लोळ
(१३३) योगप्रभाव-ओवी (योग)
(१३४) हिरण्ययोग- स्वप्नयोग
(१३५) पतिव्रता चरितामृत
(१३६) षट्पदध्वनि
(१३७) गोपिकापादपीयूषलहरी
(१३८) वेदान्त निरूपण
(१३९) गान सोपान
(१४०) योगांग-यम-लक्षण

(१४१) दुर्मत हृदयभंजन
(१४२) सिद्धिसार
(१४३) ईशावास्योपनिषद्
(१४४) वेदान्तप्रक्रियासमुच्चय
(१४५) वृत्तिक्षीरसागर
(१४६) सुखपर्व
(१४७) सांख्य सूत्रावर विचार
(१४८) एक निबंध (सांख्य)
(१४९) बौद्ध निबंध
(१५०) आत्मचरित्र
(१५१) नवीन भाषा - नावंग
(१५२) प्रश्नोत्तरे
(१५३) श्री खापरेंना पत्र....
(१५४) मानसायुर्वेद २ लेख

**(यष्टी १६) संस्कृत**

**संस्कृतरचना** भा.१ **रु.२०**

सूत्रग्रंथा

(१५५) अन्तर्विज्ञानसंहिता
(१५६) ईश्वरदर्शनम्
(१५७) समसूत्री
(१५८) दुर्गात्त्वम्
(१५९) काव्यसूत्रसंहिता
(१६०) शिशुबोधव्याकरणम्
(१६१) न्यायसूत्राणि
(१६२) एकादशीनिर्णयः
(१६३) पुराणमीमांसा
(१६४) आगमदीपिका
(१६५) शास्त्रसमन्वयः
(१६६) युक्तितत्त्वानुशासनम्
(१६७) षड्दर्शनलेशसंग्रहः
(१६८) तत्त्वबोधः

**(यष्टी १६) संस्कृत**
**संस्कृतरचना भा.२ रु.५०**

(१६९) स्वमतनिर्णयः
(१७०) संप्रदाय-कुसुम-मधु
(१७१) ऋग्वेदटिप्पणी
(१७२) सच्चिन्निर्णयः
(१७३) गंगामृतपानम्
(१७४) भिषगीन्द्रशचीप्रभा
(१७५) कान्तकान्ता-वाक्यपुष्पम्
(१७६) उच्छिष्टपुष्टिलेशः
(१७७) श्रीधरोच्छिष्टपुष्टिः
(१७८) संस्कृतपदानि
(१७९) नारदीयभक्तिसूत्रभाष्य
(१८०) भक्त्यधिकरणन्यायमाला
(१८१) बालवासिष्ठ
(१८२) गंगास्थितिनिर्णय
(१८३) भक्तिभाष्य
(१८४) मानसायुर्वेद.
(+) ११पत्रे (यष्टी.७:९+ यष्टी.१२=२)

**(यष्टी १७) रु.१००**

**समयोपदेश** (सुबोध हिंदुधर्म)

(१८५) गीता निरूपणे
(१८६) योगवासिष्ठ निरूपणे
(१८७) ब्रह्मसूत्र निरूपणे
(१८८) बोधवाक्ये
(१८९) सुवर्णकण
(१९०) पंचदशीनिरूपणे
(१९१) गुरुचरणकौमुदी
(१९२) बालबुद्धिविवर्धिनी

**(यष्टी १८)**
**रु.२०**

(१९३) भिषगीन्द्रशचीप्रभा
(१९४) वैद्यवृन्दावन
(१९५) वैद्यनन्दिनी
(१९६) भिषग्पाटवोपपत्तिः
(१९७) नावंग लिपी (सांकेतिक)
(१९८) हरिपाठ-अर्थक्रम
(१९९) हरिपाठ-प्रतिज्ञा
(२००) मोक्षपट
(२०१) स्वसमाज-नियम
(२०२) मायर्सची समीक्षा
(२०३) मननार्थ गीता-प्रश्न
(२०४) शिक्षण रत्नाकर

**(यष्टी १९)**
**रु.१०**

(२०५) मनोहरिणी गीता (हिंदी)

**(यष्टी २०) रु.१२०**

(२०६) योगप्रभाव (मराठी गद्य)
श्री पतंजलींच्या ४० सूत्रांवर निरूपण

---

## श्री बाबाजीमहाराज पंडित
### लिखित व अनुवादित ग्रंथ

१. हरिपाठ रहस्य (रु.६०)
२. अमृतानुभव कौमुदी. (रु.१००)
३. ज्ञानेश्वरी गूढार्थदीपिका (रु.३००)





('') गीताप्रेस-प्रत (रु.१२५)
४. अभंगगाथा (रु.५०)
५. आर्यधर्मोपपत्ति
६. विविध लेखसंग्रह
७. संतकथा (रु.६)
८. वेदस्तुतिदीपिका
९. पंचदशीप्रवचने
१०. भागवतप्रवचने

**अनुवादित ग्रंथ**

११. भगवद्भक्तिसौरभ-रुक्मिणीपत्रिका
१२. प्रीतिनर्तन
१३. स्वमतनिर्णयः (रु.५)
१४. भक्तिपदतीर्थामृत (रु.८)
१५. निगमान्तपथसंदीपक (रु.५०)
१६. चित्तोपदेश (रु.५)
१७. हरिपाठ (रु.५)
१८. गीता

---

* कै. द. ग. खापरे रचित
**माधुर्यमधुकोष**पृ.७०० (रु.३००)
कोणता विषय कोठे आहे याचा संदर्भग्रंथ

* कै त्रिपुरवारलिखित
**श्रीगुलाबरावमहाराजांचे चरित्र**
अधिकृत मूळप्रत पृ.४३२ (रु.९०)

---

## श्रीगुलाबरावमहाराजांच्या ग्रंथांतील निवडक प्रकाशने

भगवद्भक्तिसौरभ (रुक्मिणीपत्रिका)
* योगरहस्य- १०ग्रंथ (रु.३०)
* योगसाधना - ११ पत्रे (रु.१०)
* आख्यानसंग्रह (रु.२०)
* मोक्षपट - सापशिडी (रु.२०)
* बुवाबाजी (रु.२०)
* मणिमंजुषा (रु.६)
* मौलिकविचार (रु२०)
* गीतगुलाब (निवडक पदे)(रु.२०)
* गीता निरूपण (रु.८०)
* योगवासिष्ठ निरूपण (रु.३०)
* लोकगीते-लावणी संग्रह(रु.३०)
* आख्यानसंग्रह (रु.३०)
* ज्ञानपाठ (रु.२)
* हरिपाठ-सार्थ / अर्थक्रम (रु.३)
* रुक्मिणीस्वयंवर (रु.३)
* नित्यपाठ (रु.३०)
* मौलिक विचार (रु.२०)
* आंधळी गौळण कॅसेट (रु.५०)
शोभा जोशी,अजित कडकडे,यशवंत देव
* आळंदीवल्लभा कॅसेट (रु.५०)
शोभा जोशी- यशवंत देव
पदांच्या २ कॅसेट (रु.५०+५०)
डॉ. माधवराव खापरे

**डॉ. वा. ना. पंडित कृत ग्रंथ**

१. शांकरतत्त्वज्ञानात भक्तीचे स्थान
२. चिद्विलास
३. अद्वैतभक्ती
५. माधुर्यकल्लोळ
६. भक्तित्त्वविवेक
७. श्रीगुलाबरावमहाराज – विभूति आणि तत्त्वज्ञान (रु.७०)

**डॉ. राम पंडित कृत**

*श्रीबाबाजीमहाराज पंडितांचे चरित्र
ह्रीं नारायणाय नमः ह्रीं (रु.३०)

**डॉ. कृष्ण माधव घटाटे कृत**

१. श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा (रु.७५) (पीएच.डी.चा प्रबंध)
२. १३० ग्रंथांचा सारांश मराठी / हिंदी (रु.२०)
३. श्रीमहाराजका दर्शनिकयोगदान- (हिंदी) (रु.२२५)
४.(,,) लहान चरित्र(म/हिं) (रु.६)
५. सर्वधर्मसमन्वय(म/हिं/इं)(रु.१०)
६. भक्तिशास्त्र (म/हिं) (रु.२०)
७. Perfect Harmony (Rs.10)
८. विश्वव्यापिनी हिंदुसंस्कृति (मराठी / हिंदी) (रु.१५)
९.Universl Hindu Culture (R.20)

श्री. दादासाहेब पोफळीकृत
Blind Leads Unblind (Rs.60)
भारतभारती प्रकाशन

श्री. डॉ. लीला रस्तोगीकृत
१. श्रीगुलाबरावमहाराज-हिंदी (रु.६)
डॉ. सुनीती आफळेकृत
२. श्रीगुलाबरावमहाराज मराठी (रु.६)
डॉ. म. रा. जोशीकृत
वाङ्.परंपरा आणिज्ञानेश्वरकन्या (३०)
प्रा.डॉ.रूपा कुलकर्णीकृत

*ग्रंथांचे मूल्य + पोस्टेज खर्चाचा ड्राफ्ट पाठवावा.*
*''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ''*
*दहिसाथ, अमरावती.*

तयाच्या तयाच्या प्रभावानें । नाहींसा झाला काळ ग
सखु०॥८७॥
श्रीहरी नाम घेतां । बाई उमळे मंत्रशक्ती ग । (य४-९५)
ध्यानाचे बळें योग । साधे वैराग्य आणि भक्ती ग ।
मोहन०॥८८॥
गोविंद गोविंद नाम गातां । गोविंद सर्वांभूतीं ग सखुगडणी० ।
जाणती जाणती संतजन । श्रुतिस्थ स्वानुभूती ग सखु०॥८९॥
शुकसे जीवन्मुक्त । सगुण ध्याती मनीं ।
प्रेमें त्या श्रीकृष्णाच्या ग बाई । होऊं आह्मीं रमणी ॥१०९०॥
सगुणमय ध्यातां । ध्यानची ध्येय होय ।
सद्गुरुकृपाबळें ग बाई । लाधती हरीपाय ॥९१॥
ज्ञानेश्वराची कन्या । जालें मी जेव्हां बाई ।
तेव्हांची कांतापणें ग बाई । राहीलें कृष्णापायीं ॥१०९२॥
॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥
॥ स्त्रीगीतसंग्रह समाप्त ॥
० ० ०



# पदे

*१ / कपटपटूपण सोडा*

हें कपटपटूपण सोडा यदुनायका ।
प्रभु शरण तुम्हाला श्रीमुरली गायका ॥धृ०॥
सासुरवासिनी सकळहि आम्हीं कामिनी ।
परित्यजुनि सदन पातलों महायामिनी ।
ना इच्छूं व्हाया रमासमहि स्वामिनी ।
तूं स्वप्रेमें करि आह्मां निजभामिनी ।
एवढी विनंती करुणाघन आयका ।
हें कपटपटूपण सोडा यदुनायका० ॥१॥
निज कोमल चरण दावा डोळेभरी ।
ध्यातातित जया नारदशुक मुनि सौभरी ।
अस्मद्हृदयीं युष्मद्हृदयीं युष्मद् वेणूरव भरी ।
सकलही कुमारी आम्ही परि नवभरी ।
येऊं द्या कृपा  हरि सुजन स्वपद दायका ।
हें कपटपटूपण सोडा यदुनायका०॥२॥
पति पुत्र गोत्रकुळ त्यजुनी आह्मी गड्या ।
रजनींत  पातलों घालाया फूगड्या ।
जातातित तुह्माविण आमुच्या व्यर्थचि घड्या ।
श्रीकृष्णपत्नि घालिते प्रभुपदघड्या ।
ज्ञानेश्वरकन्या तुम्हां सकळ बायका ।
हें कपटपटूपण सोडा यदुनायका० ॥३॥

*२ / ध्यातो शिव भोळा*

अग सखे । कधीं पाहिन मी । पाहिन हरि डोळां ।
जयाला ध्यातो शिव भोळा । कधीं० ॥धृ.॥
अग सखें कुंजवनीं खेळे । मुरलीधर पुतनारी ।
पाहुनी मोहित पूतनारी । तिथें आपुला ।
अग सखे तिथें आपुला । कायसा पाड भारी ।
नमिति ज्या नित्य निराहारी । अग सखे प्रभू तो आह्मां ।
करि दान सौख्यसोहळा । जयाला ध्यातो शिव भोळा ॥१॥
अग सखे कोटिकामाचा । कामाचा काढोनि सार ।
ओतिली मूर्ती सुंदर । अग सखे पूर्ण काम हा ।
काम हा गोपिवर । चला जाऊं तेथवर ।
दर्शनें होऊं । अग सखे दर्शनें होऊं ।
निष्काम सर्व अबला । जयाला ध्यातो शिव भोळा० ॥२॥
अग सखे सावळी तनू । तनू सुकुमार ।
हरि वृषभानुसुतामार । श्रुतीवर्णीति ।
अग सखे श्रुतीवर्णिति । वर्णिती सर्वाधार ।
तोचि हा यशोदाकुमर । दैवयोगानें ।
अग सखे दैवयोगानें । लाधला गोकुळा । जयाला ध्यातो० ॥३॥
अग सखे निघूं पाहती । पाहती नयन दोन्ही ।
चांचरी जाते बाई वाणी । कधीं तरि सखा । (य४-९७)
अग सखे कधीं तरि सखा । सखाचक्रपाणी ।
करिल तरि ग्रहण मदीयपाणी । अग सखे प्रेमें ज्ञानेश्वर ।
ज्ञानेश्वरपदि लोळा । जयाला० ॥४॥

*३ / प्रीति दिशा*

तूं जाउनि पाही व्रजजनप्रीतिदिशा ।
ज्या जडल्या सगुण ब्रह्मीं पूर्ण सादिशा हो ॥धृ०॥
मत्प्रेमजळीं ज्या तळपती सौदामिनी ।
सर्वदां प्रिया मम मदनबद्धदामिनी ।
वाटे मज त्यजितिल कीं प्राणचि कामिनी ।
मी करिनचि त्यांनां अपवर्गी स्वामिनी।
ज्या बाळपणापासुनि माझ्या भामिनी ।
त्यांवांचुनि मजला वाटे युगसम निशा हो ॥१॥
अक्रुरें आणिलें म थुरे जेव्हां मला ।
तैं झाल्या दुःखित अत्यंतचि विमला ।
अक्रुरा निंदिती लावुनियां क्रुर मला ।
म्हणती कां नेसी गोकुळिंची जिवकळा।
त्या पतिसुत त्यजुनी मम चरणांबुज वशा हो । तूं जाउनि पाही०॥२॥
उद्धवा असें मी मैंदचि बारे खरा ।
किती दिलें दुःख त्या गोकुळीं नारीनरां ।
बहु आठविती मज गोपी विरहातुरा ।
मद्ध्यानें झाल्या साक्षिरूप सुंदरा ।
त्या भक्तिबळें पावल्या विभुक्तिदशा हो ।
तूं जाउनि पाही० ॥३॥
मज भासे मी दुर्दैविच परि नेटका ।
मिळेलचि पुढती गोपीप्रेम घोट का ।
मत्प्राप्त्यर्थ वसविली वृजीं प्रीति दाट कां ।

परि गेलों विसरुन निजगुण सगुणाटकां ।
तत्सेधें न दिलें फल शुल्कहि म्यां टका ।
श्रीज्ञानेश्वर वारितील संसृतिविषा हो । तूं जाउनि पाही०॥४॥

*४ / संसारिक जीवेश्वर*

स्वप्नामध्यें जसा भिकारी आणिक तो नृपवर ।
तसे संसारिक जीवेश्वर ॥धृ०॥
स्वप्न निमाल्या जागृतिमध्यें नरचि मंचकावर ।
तसें हें ब्रह्मचि सर्वांवर ।
अजुनी कसा तुज उमज न पाटे अशुद्ध तव अंतर ।
देइं तूं सांडुनि धर्मान्तर ।
चाल । करुनियां प्रथम कर्में तीं अति आवडी ।
निज मनोमळांची करि गगनीं वावडी ।
मग उपासनेनें हरिपदकण सांवडी ।
जाइल तो विक्षेप चित्त मग सोडिल दोषाकर ।
होइं तूं श्रीगुरुचा चाकर । स्वप्नामध्यें० ॥१॥
स्वप्निं जसी कामिनी पाहुनी काम मनीं अति भरे ।
तसें हें अमरपूर तूं वरे । (य४-९८)
यास्तव सोडुनि कामफलातें गुरुपद सेवे करें ।
तोडिं षड्वैरीस्थळ नीकरें । चाल।
या मनुष्यजन्मीं साधी परमार्थता ।
मग पुढें न ऐसी अमोल संधी आतां ।
निज करून भोगी संसारी स्वार्थता ।
करुनि विवेक विरक्ति शमादि षट्क् मुमुक्षापर ।
होउनी गुरुपदीं ठेवी शिर । स्वप्नामध्यें ॥२॥
स्थूल लिंग कारण हे वारी जीवदेह पैं त्रय ।
वारि तूं ईश्वरदेहहि त्रय ।
मायामय ईश्वरवाच्यांश तत्पद जाणुनि स्वयें ।
अविद्या जिव त्वंपद वाच्य ये । चाल ।
माया अविद्या दोन्ही तूं सांडुनी ।
मग घेंई आपुली परब्रह्मता जुनी ।
येथ जीवेशपणातें होय अवघी धुनी ।
स्थळ पाहुनि सच्चिद्घन स्वानंदमय सत्वर ।
होउनी प्रेमें भरि अन्तर । स्वप्नामध्यें० ॥३॥
यापरी लक्ष्यांश घेउनी तूं ब्रह्म होशि जेधवां ।
उरे मग हरिभक्तिच तेधवां ।
जसी कुमारी लग्न होउनी पट्टराणी आसवा ।
उरे मग भजणें आपुल्या धवा ।
चाल । त्या परी मुक्ति झालिया भक्ती आचरी ।
तुज वाटे त्या त्या स्थळिं स्वसुखें संचरी ।
जन दीन पाहुनी करिं धरुनी उद्धरी।
ज्ञानेश्वरप्रभुचरणसलिल तूं पानकरी सत्वर ।
आणि सिंचन करी दीनांवर । स्वप्नामध्यें० ॥४॥

*५ / ज्ञानकला पुजिति प्रेमानें*

कृष्ण कृष्ण हें नाम वदोनी गोपी जळीं शिरती ।
स्नान करोनी पुजिती देवी कृष्णीं धरुनी रती ॥ध्रु० ॥
ऊढांचा अनुराग पाहूनी अनुढा वृजनंदिनी ।
ज्ञानकला पुजिति प्रेमानें कृष्ण धरूनि मनीं ।

हांव नसे संसार सार परी भाव कृष्णचरणीं ।
देह गेह हरिपायीं अर्पुनी इच्छा सुरती रणीं । चाल ।
जो अर्जुनासि प्रभु गीतेमाजीं वदला ।
कीं मार्गशीर्ष हा मत्स्वरुपी गमला ।
तो ऋतु हेमंत लक्षुंनियां विमला । चालपाहिली ।
सकलही बाला स्मरति अजेला धरुनि अजाची प्रिती ।
अक्षय ज्या श्रुती उक्ति रक्ति तैं नंदनंदनाकृती ॥१॥
नवार्णवादिक जपकष्टातें खष्ठ मानुनी सदा ।
त्यागुनियां संकष्ट सकामें तुष्ट श्रीहरीपदा ।
मागाति हेंचि नित्यप्रसादें नंदनंदनीं मुदा ।
हे देवि पति व्हावा हरि तो वंदितसों तव पदा । चाल ।
यापरि सकलहि वृजनारी बोलती ।
अनुराग धरुनियां मनीं हरितें मागती । (य४-९९)
नम या मंत्रें त्या देविचरणीं लागती । चालपहिली ।
ब्रह्मसनातन सर्वांतरतनु जाणुनि साक्षी अति ।
अन्वययोगें सगुण करोनि श्यामरूप चिंतिती ॥२॥
अलातादिक चक्रा त्यजुनी एकी एकल्यासुखें ।
कात्यायनी महामाय इति म ंत्र वर्णिती मुखें ।
विषय विषधरा दूर घालुनी उभारिती खगटके ।
वालूकामय प्रतिमाग्रीं स्मरति रूप सांवळें निकें । चाल ।
जे परब्रह्म सच्चिदानंदमूर्ती । तेत्तिरीयैतरेय वर्णिति ज्या श्रुती ।
जे योगियांसही ध्यानीं नयें स्मृती ।
चाल पहिली । तें रूप अंतरीं धरुनि निरंतर पायीं चित्त ठेविती ।
ज्ञानेश्वरप्रभुतात दयालू इष्ट इच्छि त्यांप्रती ॥३॥

*६ / तूं पहिले पासुनि उघडा*

निजमानसीं हा विचार करिरे दगडा ।
तूं पहिले पासुनि उघडा ॥धृ०॥
ममता विवशें धैर्य तुझें कां खचलें । कनकादि भोग तुज रुचले ।
स्त्री मिळवाया उपाय किति तरी रचले । परि यमाजवळि हें न चले ।
।चाल। तव कर्महि निरखुनी फुटकें । यमदूर मारतिल फटके ।
मग कोणि सहायक न टके ।
चल फिर मागें टाकुनि लटिका झगडा । तूं पहिले० ॥१॥
हा संग कसा गोड वाटतो अझुनी ।ओळख पाहसी कां न जुनी ।
हो सावधरे अलभ नरतनु समजुनी । युगुल किशोर पदां भजुनी ।
चाल । कांहींतरी सोय धरावी । ही भवनदि पार तरावी ।
चुकी ऐसी कधिं न करावी ।
नाहींतरी बापा पुनरपि होईल रगडा । तूं पहिले० ॥२॥
सज्ञनसंगें मारुनि मायाकुंजर । मोडी हा भवभयमय पंजर ।
सद्गुरुपद तें ध्यानीं आणुनी सुंदर । शोभवी हृदयमणिमंदिर ।
चाल । उमजोनि आत्मसुख साचें । हरिकीर्तनीं निर्भय नाचे ।

श्रीकृष्णगुण म्हणवी वाचे । ज्ञानेश्वर या नामाचा जनिं पगडा ।
तूं पहिले पासुनि उघडा० ॥३॥

*७ / क्षणेक जीवित कीं*

नको नको करूं चुकी सदा तूं क्षणेक जीवित कीं ।
जंव जंव हरिला विस्मरसी रे तंव तंव काल तकी ॥धृ०॥
हरिहर श्रीगुरु एक करुनियां प्रेमें साम्य तुकी ।
जीव आपुला स्वयें मिळवुनी ब्रह्मी होय सुखी । (य४-१००)
अजुनि तुला हें कैसें न कळे आपलेंच हित कीं ।
शेवटीं सोडवि कोण तुझी अति होइल दुर्गति कीं ।
चाल । मग अहा अहा करिसील जरी कांहीं ।
तरि कोणि न देइल तुझी पुरी ग्वाही ।
अनुताप होउनी फळ मग तें नाहीं ।
चालपहिली । यास्तव आधिच नाम ग्रहण करी सुशास्त्रसम्मत कीं ।
जंव जंव हरिला विस्मरसी० ॥१॥
व्यर्थ काय बायका मुलें तूं घेउनियां बसला ।
मेळविला काढा भोंवतीं हा आणुनियां नसला ।
येतां वृद्धपणा मग तूं जाशिल रे गिंवसला ।
यास्तव मारुनी लाभ भवातें जाइं दुरीं कसला ।
।चाल। वैराग्यावांचुनि भाग्य नसे काही ।
यापरिची देती श्रुति मुनिवर ग्वाही ।
गुरु सांगतील ती मति घे लवलाही ।
। चाल१ली । आत्मविचारावांचुनि जीवन नाहींच शोभत कीं ।
जंव जंव हरिला विस्मरसी०॥२॥
घेऊं नको नाना मतवादें विटाळुनी ।



चित्त देऊं नको रांडिच्या घराप्रति नेउनियां वित्त ।
सांडु नको वर्णाश्रमकर्म्मे होऊनियां मत्त ।
जनीं करुनि अपकीर्ति नको वाढवूं उगी पित्त ।
चाल । यापरि धर्माचा करितां अवलंब ।
जालिया चित्तशुद्धि घे निरालंब ।
मग तूंचि होउनी राहे हेरंब ।
चालपहिली । ज्ञानेश्वरप्रभुतात दयालु साहाय अखंडित कीं ॥३॥
जंव जंव हरिला विस्मरसी ० ॥धृ.॥

*८ / कृष्ण सगुण मूर्ती*

सकल सुप्रेमें भजन कराया कृष्ण सगुण मूर्ती ।
धर्म तोचि आमुचा नित्य मुनी वर्णिति यत्कीर्ति ॥धृ०॥
श्रीशुक परीक्षितिप्रति सांगे भागवतीं गोष्टी ।
वर्णाश्रमधर्म ते अर्पणें हरिपदसंपुष्टीं।
हरीचरणध्यानाविण नाहीं परब्रह्मीं तुष्टी ।
श्वेताश्वराद्युपनिषन्निरूपिती याचि गोष्टी ।
नारदाप्रति सनत्कुमारें कथिली नामप्रीती ॥ धर्म तोचि० ॥१॥
शूरसेनसुतसुकृतबळें जो यदुकुळीं अवतरला ।
नंदपुण्यतरुवरसद्भावें गोकुळीं अवतरला ।
पदमुद्रा शिरीं धरूनि ज्याच्या कालिय फणी तरला ।
सांडुनि सकलही गोत गोपीनीं कुंजवनीं वरिला ।
यागिं न घे अवदान नंदगृहीं पय दधि घृत प्रीती । धर्म तोचि० ॥२॥